# माणूस

शनिवार
१ डिसेंबर १९७९
७५ पैसे

## ामांतर विशेषांक

र हे आता
एक निमित्त
आहे.
संघर्ष आहे
अस्मितांचा.
घर्षाचा शोध




'माणूस' प्रतिनिधींनी मराठवाड्यात जाऊन घेतलेला

# दडपशाही !

मराठवाड्यातील लोकमत विद्यापीठ नामांतराला अनुकूल झाले आहे म्हणून ६ डिसेंबरला नामातर करून टाकावे, असे नामातरवाद्यांचे म्हणणे आहे. हा नामातरवाद्याचा समज वस्तुस्थितीला कितपत धरून आहे, हे समक्ष पडताळून पाहावे या उद्देशाने 'माणूस'ने आपल्या प्रतिनिधीना मराठवाड्यात पाठविले. हे पडताळून पाहणे एकागी व एकट्याचे राहू नये म्हणून एकाऐवजी तिघाची योजना यासाठी केली. हे तिघेही या प्रश्नाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहत असलेले असे होते. पण एका बाबतीत तिघाचेही एकमत झाले. मराठवाड्यातील लोकमत नामांतराला अद्याप तरी अनुकूल झालेले नाही. उलट दोन्ही बाजूची एकातिकता वाढलेली असल्याचे प्रतिनिधीच्या निदर्शनास आले तरीही नामातर करायचे का ? आत्ताच करायचे का ? प्रत्येकाचे उत्तर वेगवेगळे आहे. ते स्वतंत्र लेखाच्या स्वरूपात या अंकात प्रत्येकाने वेगवेगळे माडलेले आहे.

एस् एम्. जोशी यानी ६ डिसेंबरचा नियोजित सत्याग्रह पुढे ढकलावा, त्यानंतर मराठवाड्यातील लोकमत अनुकूल करून घेण्यासाठी पुन्हा प्रयत्न करावेत व विशिष्ट कालमर्यादेत या दिशेने काही प्रगती झाली नाही तर पवाराच्या पुलोदमधून नामांतरवाद्यानी बाहेर पडावे, असा एक तोडगा सुचवला आहे व रामभाऊ म्हाळगीसारख्यानी याला पाठिंबाही व्यक्त केला आहे. मराठवाड्यातील उभय पक्षाच्या मडळीशी बोलत असता हा तोडगा कुणी विचारात घेत असल्याचे 'माणूस' प्रतिनिधीना जाणवले नाही.

तेव्हा पवारासमोर सध्या पर्याय दोनच ६ डिसेंबरचा सत्याग्रह–सविनय कायदेभंग–लाँगमार्च अडवणे, आंदोलन दडपणे किंवा नामातर जाहीर करून पुलोद सरकारने दिलेला शब्द खरा करून दाखवणे. पवाराचे सरकार पहिला पर्याय स्वीकारील हे आता स्पष्ट झालेले आहे. पुलोदचे इतर घटकही पवाराच्या या दडपशाहीला निमूटपणे मान तुकवतील यातही शंका नाही कारण निवडणुकीपेक्षाही नामातराचा, वचनपूर्तीचा प्रश्न महत्त्वाचा मानणारा एकही घटक, घटकातला एकही महाभाग पुलोदमध्ये नाही.

नामातर व्हायला हवे कारण पुलोदने शब्द दिलेला आहे. एकमुखाने ठराव केलेला आहे. ठरावावर जोरदार भाषणेही दिलेली आहेत. पण वचनपूर्तीचे राजकारण करायला जी नैतिकता लागते, जी दानत लागते तिचाच सर्वत्र अभाव आहे. त्यामुळे नामातर सध्यातरी होत नाही. पुढचीही शाश्वती देता येत नाही, कारण मराठवाड्यातील लोकमत नजिकच्या भविष्यकाळात तरी अनुकूल होण्याची शक्यता फार कमी दिसते. मग मराठवाडा दैनिकाचे सपादक अनंतराव भालेराव सुचवतात, त्याप्रमाणे या प्रश्नाचा संपूर्ण पुनर्विचार तटस्थ व नि.पक्षपाती व्यक्तीकडून नव्याने होणे, एवढाच पर्याय सध्यातरी उपलब्ध दिसतो. पुलोदने दिलेला शब्द पाळणे, शब्द पाळता येत नसल्यास राजिनामा देऊन आपली असमर्थता प्रामाणिक आहे हे सिद्ध करणे, हा सर्वोत्कृष्ट पर्याय तो स्वीकारण्याचे नैतिक व राजकीय धैर्य पुलोदजवळ नसेल तर भालेरावांच्या सूचनेचा विचार सद्य:स्थितीत व्हायला हरकत नाही. दडपशाहीने प्रश्न सुटण्याऐवजी जखम मात्र अधिक चिरत जाण्याचा धोका आहे आणि तो दृष्टिआड करून कसे चालेल ?

दलिताची अस्मिता नामातरापेक्षा अधिक भरीव व पायाशुद्ध प्रश्नावर संघटित व्हायला हवी होती असे मात्र या चळवळीकडे पाहता वाटते आहेच दलिताचा एकही तातडीचा, जीवनमरणाचा प्रश्न यामुळे सुटणार आहे असे नाही. चळवळ भावनेवर उभी आहे भावनेलाही महत्त्व आहेच व ते येथेही दिले गेले पाहिजे हे निश्चित पण मग भावना अल्पसंख्याकाना असतात तशा बहुसंख्याकानाही असतात असे का मानायचे नाही ? म्हणून विवेकाचीही थोडीफार कास धरावी लागते, जो आज उभय बाजूकडून कमी दाखवला जात आहे. यावेळी निदान एवढा तरी विवेक साभाळला जावा की, औरंगाबादेत, आसपास काहीही घडो, आपल्या गावात, खेड्यात, वस्त्यातून असलेल्या दलिताच्या घरादाराना, संसाराना कुठलाही धोका पोचणार नाही. ही जबाबदारी केवळ सरकारची नाही. कुठलेही सरक शेवटी या कामी अपुरेच पडणार. गाव तल्या सवर्णांनीच पुढे येऊन हे दोन विष अलग करून दाखवले पाहिजे. औरंगाबाद काहीही घडो, गावातील गरिबाच्या–दलि ताच्या झोपड्या सुरक्षित राहतील एव काळजी वाहणे, जबाबदारी स्वीकार सुसंस्कृतता दाखविणे ज्ञानेश्वराच्या भूमी अशक्य आहे का ?

— संपाद


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकोणिसावे

अंक : सत्ताविसावा

१ डिसेंबर १९७९

किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

# मुक्काम औरंगाबाद : दि. १५, १६, १७ नोव्हेंबर

सतीश कामत

गुरुवारी सकाळी औरंगाबादला पोचलो तेव्हा हवा पुष्कळशी ढगाळच होती. हवेत गारवाही बऱ्यापैकी जाणवत होता. कुठे तरी कप–दोन कप चहा ढोसणं आवश्यक होतं. एस. टी. स्टँडसमोरच्याच हॉटेलात शिरलो. पुण्यातल्या 'शीतल गार्डन'सारखे याही हॉटेलला एक 'गार्डन' होतं. पण पुष्कळच जुनं झालेलं. ब्रिटिश काळातली लाकडी गोल टेबलं आणि खुर्च्या. चहाची ऑर्डर दिली आणि शेजारच्या पेपर स्टॉलवरून 'मराठवाडा' घेतला. 'मराठवाडा' म्हणजे औरंगाबादचा 'सकाळ!' पेपरमध्ये इतरही बातम्या होत्या. पण आमची नजर विद्यापीठ नामांतराच्या बातमीसाठी भिरभिरत होती. आजच संध्याकाळी नामांतरवाद्यांची एक महत्त्वाची बैठक औरंगाबादमध्ये होणार होती. साऱ्या महाराष्ट्रातून प्रतिनिधी येणार होते. आम्हालाही तोच मुहूर्त गाठायचा होता.

हॉटेलातून बाहेर पडल्यावर तडक यूथ होस्टेल गाठलं. यूथ होस्टेल्स असोसिएशन या भारतव्यापी संस्थेची ही औरंगाबादमधील शाखा. इथे कोणालाही दर दिवशी ७ रु. देऊन राहता येतं. फक्त स्वतंत्र खोली मिळत नाही. एका लांब–रुंद डॉर्मिटरीमध्ये दहा कॉटस् टाकलेल्या असतात. त्यापैकी एक मिळते; पण स्वच्छता आणि टापटीप दृष्ट लागण्यासारखी. सर्व प्रकारच्या सुविधा. न्याहारी-भोजन, चहा-पाणी सर्व बाबी उत्कृष्ट दर्जाच्या. लेफ्टनंट कर्नल पी. एन, मोडक या होस्टेलचे वॉर्डन आहेत. लष्करातून सेवानिवृत्त झालेले. पण शिस्त अंगात भिनलेली. तीच होस्टेलच्या व्यवस्थेतही दिसत होती. जिना चढून डॉर्मिटरीकडे जायला लागलं की, समोरच्या भिंतीवरील वाक्य पुढे यायचं–This world belongs to the energetic.

होस्टेलमधून बाहेर पडलो तेव्हा ११ वाजून गेले होते. मागल्या शनिवार-रविवारी पुण्यामध्ये दलित साहित्य संसद भरली होती. तिथे औरंगाबादचे प्रा. अविनाश डोळस भेटले होते. त्यांच्याकडूनच तिथल्या विद्यापीठ नामांतर चळवळीमधील काही दलित नेत्यांचे पत्ते मिळवत होते. प्रा. बाबूराव जगताप त्यांच्यापैकीच एक. प्रा. बाबूराव जगताप, 'मनिषा', नूतन कॉलनी, औरंगाबाद. पत्ता शोधायला लागलो. रस्ता सरळ होता. क्रांती चौकातून डाव्या हाताला वळायचं. कॉलनीतलं टोकाचं घर. याच क्रांती चौकातून सहा डिसेंबरचा नामांतरवादी मोर्चा निघणार आहे चौक सर्व बाजूंनी निरखून पाहिला. मधलं आयलंड भरपूरच मोठं. बाजूला दुकानं वाहतूक शांतपणे चाललेली. उगीचच ६ डिसेंबर डोळ्यांसमोर आणायचा प्रयत्न केला.

औरंगाबादमध्ये अजूनही उंच इमारती फारशा दिसत नाहीत. सर्वत्र एक किंवा दुमजली धाब्याची घरं. बऱ्याच ठिकाणी जुन्या बांधकामाचे अवशेष शनिवारवाड्याच्या विटांच्या भिंतीसारख्या पडक्या भिंती. हिंदीतल्या 'खँडहर' या शब्दाची समुचितता या अवशेषाकडे पाहून मनोमन जाणवत होती.

बापूराव जगताप दुसऱ्या मजल्यावर राहतात. वरती काही तरी जोरदार चर्चा चालली असावी. खाली आवाज ऐकू येत होते. जिना चढून वर गेलो. प्रा. म. भि. चिटणीस आणि मनोहर गरुड बापूरावांकडे आले होते. आम्हाला पाहून चर्चा एकदम थांबली. आम्ही आत शिरलो. औरंगाबादला येण्यामागचा उद्देश सांगितला. लगेच चर्चेला सुरुवात झाली. चिटणीससाहेब स्पष्टपणे नामांतरामागील भूमिका मांडत होते. गरुडसाहेब गॅप्स भरत होते. बापूराव मात्र पूर्णपणे गप्प होते. सुमारे दोन-अडीच तास चर्चा झाली. भरपूर प्रश्न, भरपूर उत्तरं. [ पहा : मुलाखत ] प्रा. चिटणीसांचा आणि मराठवाडा विद्यापीठाचा अतिशय जवळचा संबंध. विद्यापीठाच्या स्थापनेपूर्वीच विद्यापीठाला कोणतं नाव द्यावं याची शिफारस करण्यासाठी जी समिती स्थापन करण्यात आली होती, त्या समितीचे प्रा. चिटणीस सदस्य होते. मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव म्हणूनही त्यांनी दहा वर्षं काम केलेलं आहे. नामांतराच्या प्रश्नाबाबत ही तिघंही मंडळी अतिशय ठाम वाटली. आता काहीही झालं तरी माघार नाही असा स्पष्ट निश्चय त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होता. संभाव्य धोक्याची किंवा अत्याचाराची त्यांना कल्पना नव्हतं असं नाही. पण आता नमतं घ्यायची तयारी नव्हती. सतत बैठका होत होत्या, चर्चा चालू होत्या, परिस्थितीचा अंदाज घेतला जात होता, आरोपांना उत्तरं दिली जात होती, नामांतरासाठी सर्व बाजूंनी रान उठवायची योजना आकार घेत होती.

गुरुवारी संध्याकाळी नामांतरवाद्यांची एक महत्त्वाची बैठक औरंगाबादमध्ये होणार होती. महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी नामांतरवादी कृती समित्या स्थापन झाल्या आहेत त्या सर्व ठिकाणांहून प्रतिनिधी बैठकीसाठी येणार होते आम्हाला प्रत्यक्ष बैठकीला उपस्थित राहायची परवानगी मिळाली नाही. पण बैठक ज्या ठिकाणी होणार होती तिथे बाहेरच्या खोलीत बसून एकेका प्रतिनिधीशी चर्चा करता येणार होती. बैठकीचे ठिकाणही गुप्त ठेवण्यात आले होते. 'तुम्ही होस्टेलवरच थांबा, संध्याकाळी सातच्या सुमाराला कोणी तरी न्यायला येईल,' असा निरोप आम्हाला मिळाला होता यूथ होस्टेलच्या डायनिंग टेबलवर बसून आम्ही गप्पा मारीत होतो. पण लक्ष दाराकडे होतं. दाढी-

मिश्या वाढवलेला, काही तरी नजरेनंच शोधत असलेला कोणीही मनुष्य आत आला की, क्षणभर पुढे होऊन कोणाकडून आलास असं विचारावंसं वाटायचं.

सव्वा सातच्या सुमाराला दारात एक मोटारसायकल थावली. गुलाबी कुडता घातलेला, दाढी-मिश्या वाढवलेला एक तरुण लगबगीने होस्टेलमध्ये शिरला. आम्हीही झटकन पुढे झालो. तो बैठकीला नेण्यासाठीच आला होता. सुरेश पुरी त्याचं नाव. भटक्या जाती-जमातीची उत्तम माहिती देणाऱ्या 'विमुक्तजन' या त्रैमासिकाचा संपादक. आमच्यातला एकजण त्याच्यामागे मोटारसायकलवर बसला दोघंजण रिक्षात बसले. मोटारसायकलच्या मागोमाग रिक्षा घ्यायला सांगितली निश्चित कुठे जायचं हे सुरेश सोडता बाकी कोणालाच माहिती नव्हतं. औरंगाबादच्या रस्त्यावरील प्रचंड खड्डे व मातीचे ढिगारे चुकवत रिक्षावाला चालला होता. मोटारसायकलवर नजर ठेवून होता. रस्त्यात मध्येच मोटारसायकल उजव्या हाताला वळली. बारीकशी बोळकांड. दिवे कुठेच नाहीत. पावसामुळे चिखल झालेला. बोळकांडीच्या टोकाला जाऊन मोटरसायकल थावली. तशी तिथं बरीच वाहनं दिसत होती. काही सायकली, काही स्कूटर्स, काही मोटरसायकली. रिक्षावाल्याला पैसे दिले आणि आम्ही सुरेशच्या मागोमाग एका बंगल्याच्या प्रवेशद्वारातून आत शिरलो.

बंगला लहानसाच होता. झाडी भरपूर. एखाद्या देवळाच्या किंवा मंगल कार्यालयाच्या बाहेर असावा तसा वहाणाचा खच पडलेला. काही मंडळी दारातच उभी होती. काही व्हराडयात. बैठकीच्या खोलीत शिरायलासुद्धा जागा नव्हती. बहुतेक सर्वजण तरुणच होते. बैठकीतल्या चर्चेवर बाहेर उभं राहून लक्ष ठेवत होते. कुणाचा आवाज वढल्यासारखा वाटला की आत डोकवत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उत्साह होता, उत्कंठा होती, थोडीशी सचिंततताही वाटत होती. सहा डिसेंबरला आपण काही तरी फार मोठं करणार आहोत असा भाव सर्वांच्या चेहऱ्यावर होता. वागण्या-बोलण्यात गांभीर्य होतं. आमच्याकडे पाहिल्यावर संशयाची एखादी तिरीप चेहऱ्यावर चमकून जात होती. घोळक्या-घोळक्याने चर्चाही चालू होती.

## कम्युनिस्ट सत्यशोधक

आम्ही ज्या प्रतिनिधींशी बोललो त्यापैकी बहुतेकानी सकाळी चिटणीस – गरुडानी मांडलेले मुद्देच माडले. नामांतराचा प्रश्न गौण आहे, सामाजिक न्यायाचाच प्रश्न आता निर्माण झाला आहे, हे प्रत्येकजण बजावत होता. धुळयाच्या सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या शरद पाटलांनी जातिव्यवस्थेविरुद्धचा लढा या दृष्टिकोनातून आपण या संघर्षाकडे पाहात असल्याचं सांगितलं. ते म्हणाले, 'नामांतर लढा हा जातिव्यवस्थेच्या सपूर्ण निर्मूलनापर्यंत गेला पाहिजे. राखीव जागा व सवलतींचा अंत होईपर्यंत तो चालला पाहिजे. आजपर्यंत जातीय संघर्षाचा वापर वर्गलढे चालू ठेवण्यासाठी करण्यात आला. हे नष्ट झाले पाहिजे.' आपण मार्क्सवादी पक्षातून बाहेर पडून सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना का केली याचं स्पष्टीकरण देताना श्री. पाटील म्हणाले की, 'ब्रिटिशांनी इथे वर्गपद्धती आणल्यावरही इथली उत्पादनयंत्रणा जातिनिहाय आहे हे मार्क्सवाद्यांनी आजपर्यंत ध्यानातच घेतलं नाही. वर्गव्यवस्था उच्छेदात सर्वात जास्त हितसंबंध कामगारवर्गाचे असल्याने या लढयाचं नेतृत्व ज्याप्रमाणे कामगारवर्गच करू शकतो ज्याप्रमाणे जातिव्यवस्था मोडून काढण्यात सर्वात जास्त हितसंबंध अतिशूद्रांचा असल्यामुळे या लढयाचं नेतृत्व हरिजन-आदिवासीच करू शकतात. भारतीय लोकशाही क्रांती जमीनदारीच्या अंताबरोबरच जातिव्यवस्थाही नष्ट केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नसल्यामुळे या क्रांतीचं नेतृत्व कामगारवर्ग व अतिशूद्र जाती-जमातींना करावं लागेल. म्हणून सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष कामगारवर्गाप्रमाणेच अतिशूद्र जाती-जमातींच्याही अग्रभागी राहील. याच विचाराने आम्ही या नामांतर लढयातही सामील होत आहोत.'

१९७४ मध्ये जयप्रकाशजींनी भ्रष्टाचारविरोधी आंदोलन करण्यासाठी छात्रयुवा संघर्ष वाहिनीची स्थापना केली. या वाहिनीचा महाराष्ट्र शाखेचा संयोजकही बैठकीला आला होता. चंद्रकांत वानखेडे त्याचं नाव. त्याच्या मते ज्याप्रमाणे गांधीजींनी केलेला मिठाचा सत्याग्रह प्रतिकात्मक होता, तसाच हा नामांतराचाही लढा प्रतिकात्मक आहे. त्यातून लोकशिक्षण झालं पाहिजे—म्हणून प्रथमपासूनच या लढयात सवर्णही जास्तीत जास्त सहभागी होतील असा प्रयत्न आम्ही केला आहे. तसंच हा केवळ मराठवाडयापुरता मर्यादित असलेला विभागीय लढा आहे असं मला वाटत नाही म्हणूनच बिहारमध्ये बोधगयाला महंताविरुद्ध झालेल्या लढयातील वाहिनीचे सुमारे पंचवीस कार्यकर्ते या नामांतराच्या सत्याग्रहासाठी येणार आहेत.

आंबेजोगाईच्या एका प्राचार्यांनी मात्र सुरुवातीला खूप आढेवेढे घेतले. मी काहीही बोलणार नाही, कृती समितीतर्फे अधिकृत पत्रक निघेल असं सांगितलं या बाबतीत ते समितीतल्या लोकांचंही ऐकायला तयार नव्हते. राष्ट्रीय पातळीवरील सध्याच्या राजकीय नेत्यांच्या वर्तनातून प्राध्यापकसाहेब हे शहाणपण शिकले की काय कोणास ठाऊक, पण राजकीय नेत्यांनी जर हे शहाणपण शिकलं तर फार बर होईल असं मात्र वाटलं. शेवटी प्राचार्य बोलायला तयार झाले. दलितांचा कळवळा केवळ बोलून दाखवून भागणार नाही, तशी कृतीही झाली पाहिजे म्हणून सांगितलं. आपल्याला कॉलेजने रजा दिली नाही तर प्राचार्यपदाचा राजीनामा देऊन ६ डिसेंबरच्या सत्याग्रहात भाग घेऊ असही ठणकावलं. आणखीही काहीजणांशी बोललो. तेच शब्द, तेच विचार, तोच अभिनिवेश, तसच गांभीर्य! तास-दीड तासाने आम्ही सर्वांचा निरोप घेतला.

रात्री जेवता जेवता दिवसभरातल्या कमाईचा अंदाज घेत होतो. सकाळी चिटणीस गरुड–बापूराव भेटले होते. दुपारी 'मराठवाडा' चे सपादक अनंतराव भालेरावांशी सविस्तर चर्चा झाली होती; सध्याकाळी नामांतरवाद्यांची महत्त्वाची बैठक पाहून आलो होतो. आता झोपायला हरकत नव्हती आदल्या रात्रीचं जागरण डोळ्यांवर होतंच यूथ हॉटेलमधील स्वच्छ मच्छरदाण्या खाली सोडल्या, उबदार रग अंगावर ओढले, निद्रादेवीची आराधना करावी लागलीच नाही.

□

आज सकाळी प्रा. मनोहर गरुडाकडे जायचं होतं. मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोरच प्रा. गरूडांचं घर आहे. आम्हाला विद्यापीठही प्रत्यक्ष पाहयचं होतंच. काही जणांना भेटायचंही होतं. त्यामुळे हे

निमंत्रण आम्ही तावडतोब स्वीकारलं.

विद्यापीठाच्या प्रवेशदारावर एक सुंदर कमान आहे व त्या कमानीवर 'मराठवाडा विद्यापीठ' ही अक्षरं लाल रंगात झळकत आहेत. कमानीतून आत शिरलं की लगेचच डाव्या हाताला सिमेंट कॉंक्रीटची पोलीस चौकी आहे. चौकीतला पोलीस वायरलेसवरून काहीतरी मेसेज घेत होता. या चौकीच्या अलीकडेच अॅसबेसटॉसचे पत्रे वापरून एक तंबू उभारलेला आहे. या तंबूत काही पोलीस विश्रांती घेत होते. दंगलीनंतर हा तंबू उभारण्यात आला असावा व दगडफेक किंवा बाटल्यांच्या माऱ्याने आतील व्यक्ती जखमी होऊ नयेत म्हणून सर्व बाजूंनी अॅसबेसटॉसचा पत्रा वापरला असावा.

पोलीस चौकीवरून थोडं पुढं गेलं की रस्त्याच्या दोन्ही बाजूंना विद्यापीठातील प्राध्यापकांच्या क्वार्टर्स सुरू होतात. प्रोफेसर, रीडर आणि लेक्चरर या तिघानाही हुद्यानुसार घरं दिली आहेत. प्राध्यापकांना सुंदर टुमदार बंगले आहेत, तर रीडर्स व लेक्चरर्ससाठी तीन मजली इमारती उभारून प्रत्येक मजल्यावर दोन-दोन ब्लॉक्स बांधण्यात आले आहेत. विद्यापीठात झाडीही बऱ्यापैकी आहे. काही ठिकाणी पुणे विद्यापीठाच्या परिसराची आठवण होते. पण त्या मानाने हे विद्यापीठ पुष्कळच लहान आणि अविकसित आहे.

## सरकारची जबाबदारी

विद्यापीठाच्या शेवटल्या भागात निरनिराळे विभाग, मुख्य इमारत, कॅंटीन, वाचनालय इत्यादी आहेत. त्यामुळे यापैकी कुठेही पोचण्यापूर्वी भरपूर रपेट करावी लागते मराठी विभागातील प्रा. गंगाधर पानतावणे यांची भेट घेण्याचा इरादा होता. सुदैवाने भेट घडलीही नामांतराच्या चळवळीपेक्षा दलित साहित्यावरच जास्त चर्चा झाली. तरीही या संदर्भात प्रा. पानतावणे म्हणाले की, 'एकदा नामांतराचा ठराव सरकारने मान्य केल्यावर हे सर्व सरकारनेच निस्तरलं पाहिजे. पण या दृष्टीने गेल्या दीड-दोन वर्षांत काहीही हालचाल झाली नाही. मराठवाड्याच्या अस्मितेचा मुद्दा वारंवार उपस्थित केला जातो. पण त्यापैकी कित्येकांना त्या शब्दाचा अर्थही माहीत नसावा. आणि ही अस्मिता अशी मूठभर लोकांपुरतीच मर्यादित कशी राहील ? हा अस्मितेचा केवळ बागुलबुवा उभा केला जातोय.

'दलितांच्या दृष्टीने हा प्रश्न भावनिक आहे. पण जीवन-मरणाचा नाही. नामांतरविरोधकांनीच त्याला तसं स्वरूप दिलं आहे. पण एक गोष्ट निश्चित, या संपूर्ण लढ्यामुळे दलितांचं नैतिक बळ वाढेल.

'आज होतंय असं की, मुख्य प्रश्न बाजूलाच पडलाय आणि भयानक व अक्षम्य पद्धतीने गैरसमज पसरवले जातात. त्या दृष्टीने 'मराठवाड्याबाहेरच्या लोकांची चळवळ' हा शब्दप्रयोगच चुकीचा आहे. आंबेडकर किंवा दलित समाज याविषयी खरं प्रेम किती आहे हे या भूमिकांवरूनच स्पष्ट होतं.'

विद्यापीठ नामांतराच्या प्रश्नावर अनेकांनी अनेक बाजूंनी मतं, विचार व्यक्त केले होते. पण या सबंध प्रश्नाकडे संपूर्ण तटस्थतेने पाहणाऱ्या काही व्यक्तीशी बोलायचं होतं. त्यातूनही अशी व्यक्ती विद्यापीठातच राहणारी, शिकवणारी असेल तर जास्त सोईचं होतं. कोणी तरी मॅथेमॅटिक्सच्या प्रा. व्ही. के. देशपांड्यांचं नाव सुचवलं. विद्यापीठातल्या क्वार्टर्समध्ये राहणारे. त्यांच्याकडे गेलो तेव्हा पाऊस भुरभुरत होता. प्रा. देशपांडे डोक्यावर छत्री धरून काही तरी बागकाम करत होते. आम्हाला पाहताच बाहेर आले. घरात घेऊन गेले. विद्यापीठ नामांतराबाबत विद्यापीठातल्या प्राध्यापकांची काय भूमिका आहे असं विचारल्यावर प्रा. देशपांडे सांगू लागले—

'या प्रश्नाकडे प्राध्यापकमंडळी तीन दृष्टिकोनांमधून पाहतात. काहींना हा केवळ दोन्ही बाजूंचा हट्टाग्रह वाटतो. काहीजणांना तो सामाजिक समतेच्या वादाचा एक भाग आहे असं वाटतं, तर काही प्राध्यापक म्हणतात की, या प्रश्नाच्या निमित्ताने आमच्या पुरोगामित्वाचीच चाचणी घेण्याचा प्रयत्न केला जातोय. जे प्राध्यापक नामांतराला पाठिंबा देतील ते पुरोगामी विचारसरणीचे आणि जे विरोध करतील ते जातीयवादी, प्रतिगामी, पेटीबूर्ज्वा इत्यादी इत्यादी. काही जण असंही म्हणतात की, असलेलं नाव वादग्रस्त नसताना या नव्या नावाचा मुद्दा उकरून काढलाच कशाला ?

'माझं या लढ्याबद्दलचं मत विचाराल तर अजूनही वातावरण बदलल आहे किंवा निवळलं आहे असं मला स्वत:ला वाटत नाही. शासनाचा निर्णय मराठवाड्यावर लादला जाणार नाही, हा प्रश्न चर्चेनेच सोडवला जाईल अशी आश्वासनं मुख्यमंत्र्यांनी दिल्यामुळे ही सध्याची शांतता आहे, पण त्या शांततेखाली जुना द्वेष आणि असंतोष धुमसतोच आहे. तेव्हा आता औरंगाबाद किंवा मराठवाडा शांत आहे याचा अर्थ इथल्या बहुसंख्य जनतेचं नामांतराच्या बाजूने परिवर्तन झालं आहे असा समज कोणी करून घेतल्यास तो चुकीचा ठरण्याचीच शक्यता अधिक आहे.

प्रा. देशपांड्यांकडून बाहेर पडलो तेव्हा पावसाचा जोर बराच वाढला होता मुंबईला चक्री वादळाचा तडाखा बसणार असल्याचं सकाळीच वाचलं होतं. त्याचाच हा परिणाम असावा अशी स्वत:ची समजूत करून घेऊन पाऊस थांबण्याची वाट पहात इमारतीच्या दारातच उभे राहिलो.

## गुराख्याचे तत्त्वज्ञान

इमारतीच्या मागल्या बाजूने काही गुरं पुढे आली. पावसात भिजत निवारा शोधत होती: थोडा वेळ समोरच्याच शेवग्याच्या झाडाखाली उभी राहिली. पण उपयोग होत नव्हता. पुन्हा पुढे निघाली. त्यांच्यामागून एक गुराखी आला. पासष्ट-सत्तर वर्षांचं वय असावं. डोक्याला मुंडासं, अंगात कुडता, धोतर गुडघ्यावर ओढलेलं, धारदार नाक, घारे डोळे, तांबूस रंग, हनुवटीवर सुरेख दाढी राखलेली. तोही इमारतीच्या दारात शिरला. चिंब भिजला होता. थरथरत होता. थोडा वेळ गेला. पाऊस थांबत नव्हता. गुराख्याशी गप्पा सुरु केल्या. विद्यापीठाच्या मागल्याच बाजूला त्याची झोपडी होती. बोलता बोलता विद्यापीठ नामांतराचा विषय निघाला. गुराखी म्हणाला— 'कुदरतने सब इंतजाम कर दिया है। यदि गुंडेगिरी ज्यादा हो गयी हो तो कम हो जाएगी। लोगोंने पाप ज्यादा किया होगा तो वो पापी मर जायेंगे। हमारे हातमे कुछ भी नही। सब अल्लामियाँकी दुवासे चलता है। ये बारीश भी हमारे लिये हो रही है। इससे जानवरोको

अच्छा खानेको मिलेगा। जानवर तो हमारे ही है...'

आम्ही नुसतं ऐकत होतो. म्हातारबाबांचं विमान उडाल होतं भारतात तत्त्वज्ञानाने गरिबी सहन करायला शिकवलं की गरिबीतून तत्त्वज्ञान जन्माला आलं ?

◻

विद्यापीठाच्या प्रवेशद्वारातून बाहेर पडत असताना दोघं सायकलस्वार आत शिरत होते. एकजण 'मराठवाडा विद्यापीठ' ही अक्षरं वाचत दुसऱ्याला म्हणत होता. 'एकदा नाव वाचून घेतो. सहा तारखेनंतर राहील की नाही कुणास ठाऊक !'

विद्यापीठातून बाहेर पडलं की लगेचच उजव्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी स्थापन केलेल्या मिलिंद कॉलेजचं कॅम्पस सुरू होत, अनेक लहान मोठया इमारती, होस्टेल्स, प्राध्यापकांच्या क्वार्टर्स. आज सुमारे आठ-दहा हजार दलित विद्यार्थी या ठिकाणी शिक्षण घेत आहेत. त्यामुळेच विद्यापीठाला भौगोलिकदृष्टया वेढणारे हे दलित आता प्रत्यक्ष विद्यापीठात शिरून सबध विद्यापीठ बळकावतात की काय अशी भीती सवर्णांच्या मनात आहे, अशीही प्रतिक्रिया एकाने व्यक्त केली.

रिक्षाने यूथ होस्टेलकडे चाललो होतो. रिक्षावाला गप्पिष्ट होता. पण नामातराचा विषय निघाल्याबरोबर त्याने आधी जात विचारली. तो स्वत: मुसलमान होता, हेही सागून टाकलं. खरंच, कितीही नाही म्हटलं तरी ही जात काही मनातून नष्ट होत नाही. काही जण स्पष्टपणे विचारतात, काहीजण संभाषणातून अंदाज घेत असतात, समोरचा आपल्याच जातीचा आहे हे कळल्यावर काहीजण आपोआप सुखावतात. जातिनिर्मूलनवादी निर्मूलनाच्या उद्देशाने का होईना पण जात-पातीची प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे चौकशी करतातच.

'गेल्या दंगलीत सवर्णांनी आम्हा मुस्लिमाना मध्ये घालून दलित विरुद्ध मुसलमान अशी चकमक लावून द्यायचा प्रयत्न केला. पण कुणाला काहीही मिळालं तरी आम्ही गरीबच राहतो, हे आम्हाला अनुभवातून कळल आहे. गेल्या दगलीत माझ्या रिक्षाच बरंच नुकसान झालं. त्यामुळे यंदा मी पाच तारखेपासूनच रिक्षा बद ठेवणार आहे. सहा तारीख शाततेने पार पडली तर सात तारखेला रिक्षा बाहेर काढीन. काही दंगलबिंगल झालीच तर आणखी चार दिवस घरात बसून राहीन ?

यूथ होस्टेलच्या समोरच विद्यापीठातील रसायन विभागाचे प्रमुख डॉ. कमलाकर ठकार यांचा बगला आहे. विद्यापीठ कार्यकारिणीचेही ते सदस्य आहेत. रात्री त्याच्याकडे गेलो. रसायनशास्त्राचा प्राध्यापक कसा असेल, कसा बोलेल याची थोडी शंका होती. पण गप्पांना सुरुवात झाली आणि सर्व शंका नष्ट झाल्या. केस जवळजवळ पूर्ण पिकलेले डोळ्यावर चष्मा, अंगात झब्बा होता. पुण्यातच महाविद्यालयीन शिक्षण झालेलं. बेचाळीसच्या चळवळीत भाग घेतलेला. नंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघात गेलेले. आजही संघाचा स्वयसेवक असल्याचं अभिमानाने सांगतात. नामांतराच्या प्रश्नाने प्राध्यापकमहाशय त्रस्त. दोन्ही बाजू थोडया थोडया पटणाऱ्या. दोन्ही बाजूचे प्रवक्ते चांगले स्नेही. त्यामुळे अधिक कुचंबणा. विद्यापीठ नामातराच्या या चळवळीचा प्रत्यक्ष विद्यापीठाच्या कारभारावर काय परिणाम झाला आहे असं विचारल्यावर प्रा. ठकार म्हणाले--

## राजकारण जास्त

'आज तरी दोन्ही बाजूना भावनात्मकता फॅनॅटिसिझमच दिसतो. अर्थात दलिताची भावनात्मकता मी समजू शकतो. पण हा वाद विद्यापीठाच्या आवाराबाहेरच माजला आहे. विद्यापीठातल्या वातावरणावर त्याचा काहीही परिणाम झालेला नाही. हा प्रश्न बाहेरच्या लोकांनीच जास्त पेटवलाय. या आरोपातही मला निश्चितच तथ्य वाटतं. विद्यापीठाची नावं बदलू नयेत हे ठीक आहे, पण बदलली गेलेली आहेत ही वस्तुस्थितीही आहे. मी दोन्ही बाजूनी विचार करतोय, पण अजूनही कोणत्याच निर्णयाप्रत येऊ शकलेलो नाही. मागे सवर्ण लोक आंबेडकरांबरोबर गेले नाहीत. तीच चूक ते आजही करणार आहेत का? एखाद्यावेळी थोडं पडतं घेतलं म्हणून काय बिघडतं? शेवटी या सर्व प्रकरणात मला तरी राजकारणाचाच वास जास्त येतो

'माझं असं मत आहे की, प्रदेश जितका जास्त सुपीक असेल तितकी जातीयता जास्त घट्ट असते. नादेड व परभणी हे मराठवाड्यातले सर्वात सुपीक जिल्हे, त्यामुळे त्या भागात जातीयता जास्त आणि म्हणूनच तुम्ही जर पाहिलं तर गेल्या दंगलीत सर्वात जास्त अत्याचार याच दोन जिल्ह्यामध्ये झाले.

'दंगल झाल्यानंतर आम्ही संघात जाणाऱ्या प्राध्यापकांची एक मिटिंग घेतली. दंगलग्रस्तांसाठी पैसेही गोळा करून पाठवले. पण प्रत्यक्ष पुनर्वसनाच्या कामात मात्र संघाने भाग घेतला नाही हे खरं आहे. संघालाही या दलित चळवळीच्या बाबतीत पुष्कळ काही करता येण्यासारखं आहे. अजूनही जेवढया प्रमाणात दलित संघामध्ये यायला हवेत तेवढया प्रमाणावर ते येत नाहीत. ही परिस्थिती बदलली पाहिजे.'

ठकाराशी झालेल्या चर्चेत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली; ती म्हणजे हा मनुष्य प्रत्येक वाक्य पोटातून बोलत होता. मर्यादांची पूर्ण जाणीव होती. देशातील राजकीय सामाजिक परिस्थितीबाबत उद्विग्नता होती, पण निराशा मात्र नव्हती. यातूनच पुढे जाता येईल अशी उभारी मनामध्ये होती. सर्व प्रकारच्या विचारांना, जाणीवाना मन उघड होतं. दोन-चार दलित संघात येतात याची फुशारकी मारण्यापेक्षा नव्वदजण येत नाहीत-- याची खंत अधिक होती. एक दिलखुलास माणूस भेटल्याचं पुण्य पदरी बाधून निघालो. दहा वाजता होस्टेलचं दार बंद होणार होतं.

## थोडा पूर्वेतिहास

विद्यापीठ नामांतराबद्दल अनेकाची अनेक प्रकारची मतं गेले दोन दिवस ऐकत होतो काही बाजूने, काही विरुद्ध, काही तटस्थ, काही उदासीनही! बोलता बोलता विद्यापीठाचा पूर्वेतिहासही सागितला जात होता.

६४५२५ चौ. कि. मी. क्षेत्रफळाच्या मराठवाड्यात एकूण पाच जिल्हे, ४६ तालुके आणि ७३९३ खेडी आहेत. मराठवाड्याची लोकसंख्या ऐंशी लाखाच्या आसपास असून भौगोलिकदृष्टया मराठवाडा महाराष्ट्राच्या एकषष्ठांश आहे. राज्य पुनर्रचनेपूर्वी तो हैद्राबाद राज्याचाच एक विभाग होता आणि या काळात मराठी जनतेची प्रचंड उपेक्षा होत होती. १९४८ साली हैद्राबाद राज्यात लोकशाही सरकार आल्यानंतर मराठवाड्याच्या सर्वांगिण विकासाचे प्रयत्न

सुरू झाले. त्याच उद्देशाने औरंगाबादमधील काही प्रमुख नागरिकांनी १९५०-५१ मध्ये उस्मानिया विद्यापीठाच्या कुलगुरूंना एक निवेदन सादर करून स्वतंत्र मराठवाडा विद्यापीठाची मागणी केली. १९५४ मध्ये मराठवाडा शिक्षण सुसूत्रीकरण समिती कायम करून या मागणीचा पाठपुरावा करण्यात आला. तसंच १९५५ सालच्या एप्रिलमध्ये हैद्राबादला मराठवाड्यातील आमदार खासदार व इतर कार्यकर्त्यांची परिषद भरली होती व परिषदेनंतर काढण्यात आलेल्या निवेदनातही मराठवाडा विद्यापीठाची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर मार्च १९५६ मध्ये भरलेल्या अशाच स्वरूपाच्या दुसऱ्या परिषदेतही ही मागणी पुन्हा करण्यात आली. याच वर्षीच्या जुलैमध्ये आमदार-खासदार, शिक्षणतज्ज्ञ व प्राध्यापक यांचं एक शिष्टमंडळ स्वतंत्र विद्यापीठाच्या मागणीसाठी भेटलं. मुख्यमंत्र्यांनी ही मागणी तत्त्वतः मान्य केली व मराठवाडा विद्यापीठ निर्मितीचा तपशील ठरवण्यासाठी प्रा. एम्. एस्. दोरायस्वामी, प्रा. एन. व्ही. सुब्बाराव, उस्मानिया विद्यापीठाचे कुलसचिव आय. टोपा आणि हैद्राबाद राज्याचे शिक्षण सचिव सेतुमाधवराव पगडी यांची मिळून एक समिती स्थापन केली. समितीनेही या प्रकल्पाला अनुकूलता दाखवली.

१९५६ मध्ये मराठवाडा द्विभाषिक मुंबई राज्यात सामील झाला व विद्यापीठ निर्मितीच्या कामाला वेग आला. २७ एप्रिल १९५७ रोजी मराठवाडा विद्यापीठ स्थापनेसंबंधी विचार करण्यासाठी मुंबई सरकारने एक समिती नेमली. या समितीने एक प्रश्नावली तयार करून सर्वत्र पाठवली. १९८ लोकांनी या प्रश्नावलीची उत्तरे पाठवली. १८३ शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, उद्योगपती, सामाजिक कार्यकर्ते यांच्या समितीने प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या व वर्षअखेरपर्यंत आपला अहवाल सरकारला सादर केला.

शेवटी विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय झाल्यानंतर नाव काय द्यावं हा प्रश्न पुढे आला. त्यावरही बरीच चर्चा झाली. औरंगाबाद, पैठणपासून शालिवाहन, सातवाहनपर्यंत विविध प्रदेशाची व व्यक्तीची नावं सुचवण्यात आली. शेवटी 'मराठवाडा विद्यापीठ' हे नाव संपूर्ण मराठवाड्याच्या भावनांना स्पर्श करणारे व तमाम लोकांच्या हृदयाला जाऊन भिडणारे असल्यामुळे तेच नाव निश्चित करण्यात आलं. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी २३ ऑगस्ट १९५८ रोजी विद्यापीठाचं उद्घाटन केलं. १९५८ ते १९७८ या काळात मराठवाडा विद्यापीठाला संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या ८२ पर्यंत गेली आहे.

विद्यापीठाच्या या पूर्वेतिहासाबरोबरच नामांतराची हवा हळूहळू कशी निर्माण करण्यात आली याचं विस्तृत विवेचन नामांतरविरोधी 'मराठवाडा नागरिक समिती 'तर्फे काढण्यात आलेल्या 'मराठवाडा विद्यापीठच का?' या पुस्तिकेत देण्यात आलं आहे—

८ सप्टेंबर १९७७ रोजी महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मुंबईला एक बैठक बोलावली होती. या बैठकीत श्री. रा. सु. गवई यांचं भाषण झालं. अमरावतीच्या नियोजित विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव देण्याचं जवळजवळ निश्चित झालं होतं अशी माहिती श्री. गवई यांनी आपल्या भाषणात दिली. पण केंद्र सरकार व विद्यापीठ अनुदान मंडळाने अनुकूल प्रतिसाद न दिल्याने या विद्यापीठाच्या स्थापनेलाच मूर्त स्वरूप येऊ शकलं नाही.

अर्थात यापूर्वीच म्हणजे १ मे १९७७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडला केलेल्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. महाड क्रांती सुवर्ण महोत्सव समितीतर्फे तो आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवात मराठवाड्यातील आपल्या सहकाऱ्यांच्या प्रेरणेने दलित पँथर्सच्या कार्यकर्त्यांनी ज्या दहा मागण्या केल्या त्यामध्ये मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबांचं नाव देण्याची मागणी समाविष्ट केली. याच सुमारास मागासवर्गीय प्राध्यापकांची एक बैठक भरली होती. त्या बैठकीतही ही नामांतराची मागणी पुढे करण्यात आली.

१८ जुलै १९७७ रोजी मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीमध्ये 'या विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे नाव देण्याच्या सूचनेस कार्यकारिणीने अनुकूलता दर्शविली आहे,' अशा आशयाचा ठराव संमत करून शासनाकडे पाठविण्यात आला. हा ठराव संमत करण्यासाठी नामांतरवाद्यांनी कार्यकारिणीच्या सदस्यांवर प्रचंड दडपण आणले, तसेच तो विधिसभेमध्ये मंजुरीसाठी गेला तर बारगळेल या भीतीने प्रा. चिटणीसांनी तो विधिसभेपुढे जाऊ दिला नाही असे आरोपही पुस्तिकेत करण्यात आले आहेत.

## जनता पक्षाचा पाठिंबा

२३ जुलै १९७७ ला महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष एस. एम. जोशी मुस्लिम फोरम परिषदेच्या उद्घाटनानिमित्त औरंगाबादला आले होते. त्यावेळी त्यांच्या वास्तव्याच्या काळातच औरंगाबाद जिल्हा जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या संचालन समितीने नामांतराला पाठिंबा देणारा ठराव मंजूर करून घेतला. यानंतर मोर्चे-प्रतिमोर्च्यांना सुरुवात झाली. आरोप-प्रत्यारोप, निवेदनं—प्रतिनिवेदनं काढण्यात येऊ लागली.

अशा परिस्थितीत नामांतराच्या प्रश्नासंबंधी विचारविनिमय करण्यासाठी ८ सप्टेंबर १९७७ रोजी त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मुंबईला एक बैठक बोलावली. पण त्यातून फारसं काही निष्पन्न होऊ शकलं नाही. दोन्ही बाजूंनी आपापल्या आता आहेत त्याच भूमिका मांडल्या व त्यांना ते घट्ट धरून राहिले.

साहजिकच पुन्हा वातावरण तापू लागलं. ११ सप्टेंबर १९७७ ला मराठवाडा विद्यार्थी कृती समितीतर्फे मराठवाड्यातील महाविद्यालयं बंद ठेवण्याचं आवाहन करण्यात आलं. १२ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर या काळात मराठवाड्यातील बहुतांशी महाविद्यालयं बंद राहिली. १९ सप्टेंबरला 'मराठवाडा बंद'ही पाळण्यात आला. २२ सप्टेंबर १९७७ रोजी औरंगाबादला प्रा. म. भि. चिटणीस यांच्या नेतृत्वाखाली 'विद्यार्थी नागरिक समिती' या नामांतरवादी समितीची स्थापना करण्यात आली. दरम्यान कोणताही निर्णय घेण्यापूर्वी आपण मराठवाडा विद्यार्थी कृती समितीला विचारात घेऊ, असं वसंतदादांनी आश्वासन दिल्यामुळे २७ सप्टेंबरपासून महाविद्यालयं पुन्हा सुरू झाली. २ ऑक्टोबर १९७७ रोजी दलित

पँथर्सच्या कार्यकर्त्यांनी चप्पल-मोर्चा काढला. १२ ऑक्टोबर १९७७ रोजी विद्यार्थी-नागरिक कृती समितीतर्फे सत्याग्रह करण्यात आला. १९ ऑक्टोबरला नामातराची मागणी करणारी पत्रकं विधानसभेत उधळण्यात आली. सरकार नामातराच्या प्रश्नात टाळाटाळ करत आहे असा आरोपही नव-बौद्ध नेत्यानी केला. पण एवढ्यात विधान-सभा निवडणुकीचे वारे सुरू झाले. निवडणूक शातपणे पार पडली. वसतदादा–तिरपुडे मंत्रिमंडळ अधिकारावर आलं आणि नामातराच्या प्रश्नाने पुन्हा उचल खाल्ली.

२५ जून १९७८ रोजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यानी औरंगाबादला भेट दिली. आपल्या मंत्रिमंडळाने कोणत्याच शिक्षण-संस्थेच नाव बदलायचं नाही असा निर्णय घेतला असल्यामुळे मराठवाडा विद्यापीठ किंवा सोलापूरच्या डॉ. वैशंपायन मेडिकल कॉलेजच्या नामांतराचा प्रश्नच उद्‌भवत नाही, अशी घोषणा वसंतदादानी या मुक्कामात केली.

यामुळे साहजिकच दलितांमध्ये असंतोष पसरला. २९ जून १९७८ रोजी श्री. म. भि. चिटणीस व इतर दलित संघटनांच्या नेत्याची बैठक झाली. या बैठकीत ९ ऑगस्टपासून महाराष्ट्रव्यापी चळवळ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. याच वेळी दादाच्या मंत्रि-मडळातील रामराव आदिक आणि हिंन्यानी मत्रिमंडळ या प्रश्नाचा पुनर्विचार करत असल्याचं सागितलं. परिस्थितीचा गुता पुन्हा वाढला. पण याच सुमाराला दादाचं सरकार कोसळलं आणि १९ जुलै १९७८ ला शरद पवाराचं 'पुलोद' सत्तेवर आलं.

## 'पुलोद' आले

त्यानंतर दोनच दिवसांनी म्हणजे २१ जुलै १९७८ रोजी विधान परिषदेत नामातराचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. श्री. निहाल अहमद हे मंत्री त्यावेळी सभागृहात उपस्थित होते मंत्रिमंडळ लवकरच या प्रश्नावर विचार करील अस उत्तर देऊन अहमदसाहेब विषय मिटवण्याचा प्रयत्न करत असतानाच शरद पवारानी सभागृहात प्रवेश केला. विरोधी पक्षनेते नाशिकराव तिरपुडयानी लगेच माजी मंत्रिमंडळाने नामातराचा निर्णय घेतला होता, नवं सरकार काय भूमिका घेणार असा सवाल टाकला. त्या मंत्रिमंडळात पवारही होतेच. त्यामुळे थोडंसं अडचणीत आल्यामुळे व निर्णयाच्या परिणामाचा फारसा अंदाज न आल्यामुळे पवारांनी विधानसभेच्या येत्या अधिवेशनात आपण स्वत.च तो ठराव आणणार असल्याचं घोषित करून टाकलं. हे वृत्त कळल्याबरोबर मराठवाडा विद्यार्थी कृती समितीची २३ जुलै १९७८ ला बैठक झाली आणि नामातराचा हा प्रयत्न हाणून पाडण्याचं आवाहन मराठवाड्यातल्या तमाम विद्यार्थ्यांना करण्यात आलं

२६ जुलै १९७८ ला मराठवाड्यातील आमदार, विद्यापीठाचे कुलगुरु व इतर संबंधित व्यक्ती याची एक बैठक मुख्यमंत्र्यानी बोलावली. दोन आमदार वगळता इतर सर्वांनी नामांतराला पाठिबा दिला. या दोन आमदारानी मात्र प्रश्न लाबणीवर टाकण्याची सूचना केली होती. नामातर करण्याचा निर्णय झाला व २७ जुलै १९७८ रोजी तसा ठराव विधानसभेत मांडण्याचं ठरलं.

तावडतोब 'औरंगाबाद बंद' चा आदेश देण्यात आला सारं शहर थावलं. एका मोठ्या उद्रेकापूर्वीची ती शातता होती! याचबरोबर २७ जुलै आणि ३१ जुलैला 'मराठवाडा बंद' ही यशस्वीपणे पार पडला. पण नंतर आदोलन ग्रामीण भागात पसरलं. स्थानिक झगडे, जुने सूड यांनी डोकं वर काढलं. नतर जे काही घडलं ते मानवतेला कलंक लावणारं होतं ! !

४ ऑगस्ट १९७८ ला मुख्यमंत्री शरद पवारांनी विद्यार्थी कृती समितीचे प्रतिनिधी, मराठवाड्यातील आमदार-खासदार,' सामाजिक कार्यकर्ते याची बैठक बोलावली. विधानसभेने केलेला ठराव केवळ शिफारसवजा आहे, सरकारने त्याबाबत अद्याप कोणताच निर्णय घेतलेला नाही व सरकार कोणताही निर्णय मराठवाड्यावर लादणार नाही, इत्यादी बाबी मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केल्या. लगेचच ५ ऑगस्ट १९७८ ला मराठवाडा विद्यार्थी कृती समितीने आंदोलन मागे घेतलं. पण तोपर्यंत पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं होतं !

□

६ डिसेंबर जवळ येत आहे. वातावरणातला तणाव वाढत आहे. पुन्हा मोर्चे–प्रतिमोर्चे, निवेदनं, पत्रकार-परिषदा याला दोन्ही बाजूनी ऊत आला आहे. कदाचित पुन्हा भणवा लागेल, कदाचित शासन वेळीच हस्तक्षेप करेल, कदाचित सत्याग्रह शांततेने पार पडेल, कदाचित सत्याग्रहच होणार नाही. आज कुणीही काहीही अंदाज करू शकतो आणि प्रत्येक अंदाज सारखाच तर्कशुद्ध वाटतो.

औरंगाबादमध्ये दोन्ही बाजूच्या नेत्यांशी कार्यकर्त्यांशी बोललो. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. दोघानीही अतिशय ताठर धोरण स्वीकारलं आहे. आज दोघंहीजण अशा एका वळणावर येऊन उभे राहिले आहेत की, जिथून मागे फिरणं अशक्य झालं आहे.

खरं म्हणजे विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न एवढा प्रतिष्ठेचा का केला जावा हेच समजत नाही. त्यातही नामातरवाद्याची बाजू आपण समजू शकतो. कारण बापूसाहेब काळदातेयानी म्हटल्याप्रमाणे सवर्णांना गेल्या हजारो वर्षांची परंपरा आहे, इतिहास आहे. दलिताची गेल्या हजारो वर्षांची परंपरा म्हणजे गुलामीची परंपरा होती आणि त्याचा इतिहास हा दास्यत्वाचा इतिहास होता. बाबासाहेब आंबेडकर हा त्याची बाजू घेऊन लढ्यासाठी उभा राहिलेला पहिला पुरुष. त्याने दलितांना केवळ धीर दिला असं नव्हे तर नवी जीवनदृष्टी दिली. कोणीही दलिताने अभिमानानं सागावं असं हे पहिलं नाव. साहजिकच त्या नावाचं, त्या व्यक्तीचं मोठेपण दलिताना वाटणारच. त्यामुळे आबेडकराच नाव एखाद्या विद्यापीठाला देण्याचा कोणी जर विचार करत असेल तर सारे दलित तो विचार उचलून धरणंही स्वाभाविकच आहे. शिवाय आबेडकर आणि दलितांचे नेतृत्व या प्रश्नात जरी शिरलं नाही तरी आवेडकर, मग ते कोणत्याही जाती, धर्म किंवा पंथाचे असोत, स्वत: व्यक्ती म्हणूनसुद्धा सर्वमान्य आहेत. आतरराष्ट्रीय कीर्तीचा तो एक बुद्धिमान पुरुष होता. भारताच्या राज्यघटनेचा शिल्पकार म्हणून एकीकडे या माणसाचा उदोउदो करत असतानाच एका विद्यापीठाला त्याचं नाव दिलं जाऊ नये म्हणून जर आपण रणकंदन माजवणार असू तर ते करंटेपण आहे.

## 'अस्मिते'चा फेरविचार

'मराठवाड्याची अस्मिता' हा नामांतर विरोधकांचा परवलीचा शब्द. औरंगाबादमध्येच एका तटस्थ विचारवंताशी बोलत असताना तो म्हणाला, 'गोविंदभाईंना म्हणावं, तुमची अस्मितेची ठिकाणं तरी कोणकोणती आहेत हे एकदा जाहीर करून टाका. म्हणजे कोणत्या प्रसंगी तुम्ही काय भूमिका घ्याल याचा काही अंदाज बांधता येईल.' गोविंदभाईंशी बोलतानाही हेच जाणवत होतं की, कोणत्यातरी आधारहीन कल्पनेनं हा माणूस झपाटलेला आहे.

गेल्या वेळी नामांतराच्या आग्रहापेक्षाही नामांतरविरोधातून दंगल अधिक उसळली हे लक्षात घेता, याही वेळी जर दंगल उसळली तर त्याला तुम्हीच अप्रत्यक्षपणे जबाबदार असणार नाही का, असे विचारल्यावर हे गृहस्थ बेदरकारपणे म्हणतात, 'शासनाला जर लोकक्षोभाची कदर नसेल तर पुन्हा तसंही होईल.'

कोणत्याही नेत्याचं यापेक्षा बेजबाबदार विधान काय असू शकतं ? हे केवळ बेजबाबदार विधानच नाही तर त्यात एक शासनासाठी आणि दलितासाठीही गर्भित धमकी आहे. गोविंदभाईंचं वय आणि अनुभव लक्षात घेता अशा प्रकारचे विधान त्यांच्याकडून अपेक्षित नव्हतं. एकाही व्यक्तीचा बळी किंवा एकाही महिलेवरील बलात्कार किंवा एकादेखील संसाराची उध्वस्तता ही जर गोविंदभाईंना मराठवाड्याच्या तथाकथित अस्मितेपेक्षा मोठी आणि महत्वाची वाटत नसेल, हे सगळं नष्ट झालं तरी चालेल पण मराठवाड्याची अस्मिता टिकून राहिली पाहिजे असा जर त्यांचा आग्रह असेल तर गोविंदभाईंनी आपल्या सबंध तत्त्वज्ञानाचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे असं वाटतं. शेवटी अस्मितेची जाणीव त्या प्रदेशातल्या डोंगर-दऱ्या, नद्या-कपारी, झाडंझुडं-झुडपं, फुलं-वेली यांच्यामध्ये नसते तर ती त्या प्रदेशात राहणाऱ्या माणसांच्या विचारात आणि वर्तनात असते. मराठवाड्याच्या अस्मितेची गोविंदभाईंना चिंता पडली आहे. झोपडीत अर्धपोटी राहणाऱ्याला सुद्धा अस्मिता असू शकते हे त्यांना कधी समजणार ? अस्मिता ही मूठभर मुर्वतखोरांची मक्तेदारी नाही; कोणत्याही माणूस म्हणून जगू इच्छिणाऱ्याची ती स्वाभाविकता आहे. फॅनॅटिसिझमचा भाग नामांतरवादी आणि नामांतरविरोधक या दोघामध्येही आहे. पण नामांतरविरोधकाच्या फॅनॅटिसिझमला बेपर्वाईची, निर्दयतेची, अमानुषपणाची एक छटा आहे आणि ती परवडणारी नाही. नामांतरवाद्यांची मागणी कदाचित अवाजवी असेल, पण किमान एखाद्या वेळी तरी सवर्णांनी मनाचा मोठेपणा दाखवून थोडसं पडतं घ्यायला काय हरकत आहे ?

औरंगाबादमध्ये एका विचारवंतांशी बोलत असताना त्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, खेड्यापाड्यातल्या दलितांना या नामांतर प्रकरणाची काही. कल्पनासुद्धा नाही त्यांना हे खरंच हवं आहे का हे या नामांतरवादी नेत्यांनी विचारलं आहे का? सवाल बिनतोड वाटेल. पण चळवळी अशा तऱ्हेने पुढे जात नसतात. पलटणीतल्या शेवटल्या जवानाचही मत विचारात घेतल्यानंतर जर जनरल आज्ञा सोडायला लागला तर अर्धी लढाई तिथेच हारलेली असेल. आपल्या या अनुयायांना हे हवं आहे की नको हे त्यांना विचारून निश्चित करायचं नसतं. नेत्यानेच सारासार विचाराने ते ठरवायचं असतं आणि तशी पावले उचलायची असतात. यातूनच एखादा चर्चिल महायुद्ध जिंकून देत असतो.

नामांतराच्या या चळवळीमुळे पुरोगामी चळवळीची पीछेहाट होणार आहे अशीही एक भीती व्यक्त केली जाते. कोणतीही सामाजिक चळवळ म्हटल्यावर थोडी आघाडी, थोडी पिछेहाट, पुन्हा थोडी आघाडी हे ओघानेच आलं, कारण अशा चळवळीची गती रंकाळ्याच्या नंदीसारखीच असते. उद्या मराठवाडा विद्यापीठाचं नामांतर झालं न झालं तरी त्यातुन खेड्यातल्या


लोकशाही मूल्य मानणाऱ्या मतदाराने
संग्रही ठेवली पाहिजेत अशी महत्त्वाची पुस्तके.

१. एका अपक्ष खासदाराने आणीबाणीच्या काळात
संसदेत केलेले एक निर्भीड पण जबाबदार विचारदर्शन

**नाही–नाही–त्रिवार नाही !**

पु. ग. मावळंकर : डेमी २४० पृष्ठे : रु. २२–५०

२. अधिकाराच्या बेछूट वापराची एक वर्णनविलक्षण सत्यकथा

**मारुती कारस्थान**

वि. स. वाळिंबे : डेमी २०० पृष्ठे : रु. २०–००

३. स्वातंत्र्य की भाकरी असा चकवा उत्पन्न करणारांना चोख उत्तर

**भाकरी आणि स्वातंत्र्य**

ग. प्र. प्रधान : डेमी १०६ पृष्ठे : रु. ८–००

४. 'इंदिरा–संजय' या प्रवृत्तीचा आलेख

**शहा आयोग – शोध आणि बोध**

पन्नालाल सुराणा, अनिल गोरे, विनय हर्डीकर
डेमी १७४ पृष्ठे : रु. १५–००

रु. ६५–५० किमतीची ही पुस्तके रु. ५०–०० ला मिळतील.
पोस्टेज रु. ३/– सह रु. ५३ /–ची मनीऑर्डर धाडा.
व्यापारी सवलतीसाठी लिहा–

**विश्वकर्मा साहित्यालय** | २०३५ सदाशिव पेठ, टिळक पथ
पेशवे पार्क चौक, पुणे ४११ ०३०

दलिताच्या पदरात व्यावहारिकदृष्ट्या काहीही पडणार नाही याची जाणीव इतरां-प्रमाणेच दलित नेत्यानाही असणारच, पण या चळवळीची उद्दिष्टंच निराळी आहेत. सवर्ण मंडळी दलितांना बरोबरीच्या नात्यानं किती आणि कुठपर्यंत वागवू शक-तात याची नामातर चळवळ ही एक चाचणी आहे. म्हणूनच एका जगन्मान्य बुद्धिवंताचं नाव एखाद्या विद्यापीठाला जोडण्याचा प्रसंग आला असताना केवळ तो बुद्धिवंत खालच्या जातीतून आला म्हणून किंवा त्याचं नाव दिलं तर त्याच्यात जातीचाही सन्मान केल्या-सारखं होईल म्हणून त्याला कडवा विरोध केला जावा, हा प्रकार निश्चितच अतिशय दुर्दैवी आहे.

## लढ्याचं शिक्षण

दलिताला आर्थिकदृष्ट्या बलवान केला पाहिजे हे तर खरंच आहे. पण त्याचबरोबर त्याला नीतीसाठी, तत्त्वासाठी झगडायला शिकवणं आवश्यक आहे. आज नामांतरामुळे त्याला दोन वेळची भाकरी मिळणार नसेल, पण आपल्या साध्या साध्या इच्छा पूर्ण करून घेण्यासाठीसुद्धा आपल्याला कोणाशी आणि कशा प्रकारे लढावं लागणार आहे, याचा अंदाज त्याला यातून निश्चितच येईल. भाकरी मिळायला लागल्यावर सुस्ती किंवा लाचारी निर्माण होण्याची शक्यता आहे. आज अर्धपोटी असलेली ताईबाई मवाडेसुद्धा माझ्या पतीचं बलिदान व्यर्थ जाऊ देऊ नका असं सांगते, हे महत्त्वाचं आहे. धैर्य, त्याग, स्वाभिमान, स्वातंत्र्याची ओढ या गोष्टी दुपारी बारा वाजता कापरासारख्या जळून जातही असतील, पण ती वेळ टळल्यानंतर याच गोष्टींनी माणसाला माणूसपण येत हेही विसरून चालणार नाही.

गेल्या वेळी मराठवाड्यात जी दंगल उसळली त्याचं एक कारण असं सागण्यात येतं की, दलितांसाठी नोकऱ्यांमध्ये ज्या राखीव जागा ठेवण्यात येतात त्याबद्दलचाही बरेच दिवस खदखदत असलेला असंतोष या निमित्ताने व्यक्त झाला. पण हा असंतोष कुणी व्यक्त करावा? सवलतीच्या या धोरणामुळे ज्याना खरोखरच नोकऱ्या मिळाल्या नाहीत, पदवीधर असूनही जे बेकार आहेत व त्यामुळे अतिशय हालात दिवस काढताहेत असे तरुण जर या निमि-त्ताने खवळून उठले असते तर समजू शकलो असतो. वस्तुस्थिती अशी आहे की, जे घरचे भरपूर श्रीमंत आहेत, ज्याची भरपूर मोठी शेतीवाडी आहे व त्यामुळे ज्याना मोटार-सायकली किंवा जीप्स उडवण्यापलीकडे दुसरा उद्योग नाही अशी श्रीमंताची उडाणटप्पू पोरंच या दंगलीमध्ये मोठ्या प्रमाणावर सामील झाली होती. कारण उद्या दलित जर स्वतःच्या पायावर उभे राहिले तर आपली सरंजामदारी कोणावर चालणार? आपल्याकडे स्वत:च्या पोरी–बाळी कोण पाठवणार? आपण टाक-लेल्या भाकरीच्या तुकड्यासाठी लाळ घोटत जोहार कोण म्हणणार? गेल्या वेळी दंगल पेटवणाऱ्यांची मने या चिंतेनं ग्रासली होती. ज्याने आपल्याला सत्तेवरून उडवलं त्याला सत्तेवरून उडवण्याचा प्रयत्नही या निमित्ताने झाला नसेलच याची हमी देणं कठीण आहे. जो खरोखरच बेकार आहे, अतिशय हालात जीवन जगतो आहे त्याची दुसऱ्याची झोपडी पेटविण्याची हिंमतच होणार नाही.

गेली अनेक वर्षं दलिताना ज्या तऱ्हेनं वागवलं गेलं त्याचं प्रायश्चित्त जर घ्यायचं असेल तर थोड्याशा अवाजवीदेखील वाट-णाऱ्या सवलती दलिताना देणे हा एक सामाजिक न्याय ठरेल. आमच्या पूर्वजानी सध्याच्या दलितांच्या पूर्वजांना वाईट वागणूक दिली त्याचं प्रायश्चित्त आम्ही का घ्यायचं असं अनेक जण विचारतील. प्रश्न तार्किकदृष्ट्या अतिशय योग्य आहे. पण त्याला उत्तर एवढंच आहे की, जशी तू तुझ्या बापजाद्याकडून चालत आलेली संपत्ती नाकारत नाहीस तसंच त्यानी केलेल्या चुका सुधारण्याची, अधिक चांगल्या तऱ्हेने सुधार-ण्याची जबाबदारीही तुला नाकारून चाल-णार नाही. तुझी थोडी ओढाताण होईल, तुझ्यावर थोडा अन्याय होईल, कदाचित अपमान आणि अवहेलनाही होईल. पण हे तू स्वीकारलं पाहिजेस अन्यथा तुझ्या पुढल्या पिढ्याही तुझ्याकडे बोट दाखवून म्हणतील, आमच्या पूर्वजानी केलेल्या चुका आम्ही का म्हणून निस्तराव्यात? म्हणून एका महत्त्वाच्या सामाजिक परिवर्तनातलं पहिलं पाऊल या दृष्टीने या सबंध प्रश्नाकडे पाहणं आवश्यक आहे. हे पाऊल उचलायला आधीच विलंब झाला आहे. आता स्वस्थ राहून चालणार नाही.

अर्थात ही सगळी चर्चा करत असताना दलित संपूर्णपणे साधे भोळे, समंजस, निष्पाप आणि सद्गुणाचे पुतळे आहेत असा गैरसमज नाही. त्यानीही त्यांच्यातली अंतर्गत फूट व जातीयता नष्ट करणं आणि इतर समाज व साहित्यापेक्षा स्वत:चा समाज आणि साहित्य फार निराळं आहे असं न मानता त्यातच समरस होऊन जाणं आवश्यक आहे. हे करण्याची जबाबदारी आजच्या दलित नेतृत्वावर आहे. त्यामध्ये ते जर अपयशी ठरले तर भारतातील आजपर्यंतच्या डाव्या विचारसरणीच्या पुरोगामी चळ-वळीच्या शोकातिकामध्ये एकाने वाढ होईल.

तेव्हा विद्यापीठाचे नामातर, ते करण्यात फारसे काही गैर नसल्याने करण्यात यावं. पण नामातरवाद्यानी फार मोठा विजय संपादन केल्याच्या मदात बुडून जाऊ नये. तसंच विरोधकांनीही अतीव खिन्न होऊन नव्या लढाईची तयारी करू नये. हे जर घडलं तरच विसाव्या शतकाची अवघी दोन दशकं राहिली असताना तरी आपण माणूस म्हणून जगायला लागलो आहोत याची ग्वाही देता येईल.

□

# नामांतर नको ! नामांतर हवे !
# प्रमुख व्यक्तींच्या मुलाखती

माणूस प्रतिनिधी

## ‘ मराठवाड्याच्या भावनांना समजून घेतले जात नाही. ’
## –गोविंदभाई श्रॉफ

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराची जी चळवळ गेलं दीड वर्ष चाललेली आहे, तिला मी व माझ्या सहकारी मित्रमंडळींनी आमच्या मार्गांनी परंतु सातत्यानं विरोध केला आहे आणि यापुढेही करणार आहोत. यादृष्टीनं आम्ही आमची बाजू सभा, पुस्तिका–प्रकाशन अशा मार्गांनी स्पष्ट केलेली आहे व आमच्या भूमिकेबद्दल पसरविण्यात येणारे अपसमज निवारण करण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी स्थापन झालेल्या मराठवाडा नागरिक समितीच्या अंतर्गत औरंगाबाद जिल्हा नागरिक समितीनं अलीकडच्या सभेत चार महत्त्वाचे ठराव मंजूर करून नामांतरविरोधकांची भूमिका मांडली आहे. या ठरावांचं स्वरूप थोडक्यात सांगायचं तर–

एक : ‘ लाँग मार्च ’ च्या नावाखाली होणारा तथाकथित सत्याग्रह म्हणजे मराठवाड्याच्या अस्मितेला ठोकरण्याचा मराठवाड्याच्या बाहेरील काही हितसंबंधियांचा डाव आहे. मराठवाड्याच्या अगोदरच दुखावलेल्या भावनांवर मीठ चोळण्यासारखेच हे कृत्य आहे. महाराष्ट्र सरकारने या अविवेकी व आततायी पावलांची वेळीच दखल घ्यावी व मराठवाड्यावर चाल करून येणाऱ्या लाँग मार्चला रोखावे. मराठवाड्यातील जनतेनेही या ‘आक्रमणाची’ गंभीर दखल घ्यावी व आपला स्वाभिमान व मराठवाड्याची अस्मिता कायम टिकविण्याचा निर्धार करावा.

दोन : मराठवाड्यातील लोकांच्या प्रदीर्घ प्रयत्नाने निर्माण झालेले मराठवाडा विद्यापीठ मराठवाड्याच्या अस्मितेचे एक प्रतीक आहे. आता एकवीस वर्षांनंतर मराठवाड्याच्या जनतेच्या इच्छा–आकांक्षांचा व भावनांचा विचार न करता हे नाव बलपूर्वक बदलण्याचा अट्टाहास होत आहे मग ते बल महाराष्ट्र विधिमंडळातील बहुमताचे असो की नामांतरवाद्यांच्या दडपणाचे असो. यामुळे सामाजिक समंजस्व व अभिसरण निर्माण होण्याऐवजी समाजात दुरावा निर्माण होत आहे. या नामांतराला कोणत्याही मानवी हक्काचे किंवा सामाजिक न्यायाचे अधिष्ठान नाही. या परिस्थितीत हा प्रश्न लोकशाही संकेतांना धरून मराठवाड्यातील लोकमताने सोडविणे हाच एक लोकशाही मार्ग आहे. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी व जनतेने नामांतरला असलेला आपला स्पष्ट विरोध वेळोवेळी व्यक्त केला आहे. याबाबतीत अजून काही शंका असल्यास जानेवारीतील लोकसभेच्या निवडणुकीबरोबरच अथवा स्वतंत्रपणे मराठवाड्यातील लोकांचे या प्रश्नावर सार्वमत घ्यावे व त्याचा निर्णय सर्वांनी मानावा.

याखेरीज तिसऱ्या ठरावान्वये आम्ही महाराष्ट्र शासनाच्या या प्रश्नाविषयीच्या धरसोडीचा, चालढकलीच्या व स्वार्थी राजकारणी धोरणावर प्रकाश टाकून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं पर्यायी स्मारक उभं करण्याविषयीच्या आमच्या शिफारशी मांडल्या आहेत. चौथ्या ठरावात ‘ मराठवाडा परिषद ’ भरविण्यासंबंधीची योजना मांडली आहे. निवडणुकीनंतर जानेवारीत आम्ही ही परिषद आयो-

जित करतो आहोत आणि चार महत्त्वाचे मुद्दे त्यात विचारासाठी येणार आहेत.–मराठवाड्याच्या अस्मितेची जपणूक, मराठवाड्याच्या भविष्याचं संरक्षण, डॉ. आंबेडकराचं पर्यायी स्मारक करण्याच्या प्रयत्नाचा पाठपुरावा आणि सामाजिक प्रबोधन व अभिसरण साधण्याचे मार्ग

आमची धारणा अशी आहे, की मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न हा मराठवाड्यातल्या लोकाचाच प्रश्न आहे. त्यात इतरानी हस्तक्षेप करणं बरोबर नाही. प्रत्येक प्रश्न हा उगीचच राष्ट्रीय पातळीवर नेण्याचा प्रयत्न करण्यात काय अर्थ आहे ? हे विद्यापीठ इथल्या लोकानी ध्यास घेऊन चळवळीद्वारा मिळवल, त्याला विचारपूर्वक सध्याचं नाव दिलं आणि ते वाढवलं वीस वर्षातली ही भावानिक गुतवणूक सहजासहजी पुसून टाकता येणार नाही. नामांतर हा त्यामुळेच सामाजिक न्यायाचा, मानवी हक्काचा किंवा नीती–अनीतीचा प्रश्न न ठरता प्रादेशिक अस्मितेचा व लोकभावनेचा प्रश्न ठरतो. अशा प्रश्नाची सोडवणूक करताना त्या प्रदेशातली लोकाची इच्छाच प्रमाण मानली गेली पाहिजे 'लॉंग मार्च'च्या नावाखाली बाहेरून चाल करून येणारे लोक हे आमच्या या भावनाविषयी बेपर्वा आहेत आणि सत्याग्रहाच्या नावाखाली आक्रमण करून ते कळत–नकळत मराठवाड्याची युद्धभूमी बनवीत आहेत. आणि तेही कोणतंही तात्त्विक अधिष्ठान नसताना. आपण सामाजिक प्रबोधनासाठी येत आहोत असा दावा ते करतात, पण प्रबोधन लाखालाखाचे मोर्चे आणून होत असतं की काय ? तुम्ही, नाव काहीही द्या–लॉंग मार्च म्हणा किंवा सविनय सत्याग्रह म्हणा–हे आहे आक्रमणच ! हे बाहेरचे लोक झुंडीनं येऊन आम्हाला सामाजिक अभिसरण शिकवणार आहेत, पण त्यांनी फार नाकानं कांदे सोलू नयेत. जातीयवाद काय फक्त मराठवाड्यातच आहे ? त्याच्या भागात नाही ?

मराठवाड्याच्या अस्मितेचा जो मुद्दा आम्ही मांडतो त्याची थट्टा केली जाते. होऊ द्या. लोकाना भाषा येते, बोलू शकतात, तर करू द्या. पण मराठवाडा मागास झाला म्हणून आम्हाला अस्मिता नसावी की काय ? अस्मिता श्रीमंताला असते आणि गरिबाला नसते ? त्यात थट्टा करण्याजोग काय आहे ? माणसाला वैयक्तिक अस्मिता असते, तशाच कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय अस्मिताही असू शकतात. याच प्रकारे प्रादेशिक अस्मिता असली तर त्यात काय गैर आहे ? या वेगवेगळ्या अस्मिता एकत्रही नांदू शकतात, त्यांचा विरोध यायचं कारण नाही

याठिकाणी विधानसभेच्या आणि विद्यापीठ कार्यकारिणीच्या नामांतरवादी ठरावांचा हवाला दिला जातो. पण त्यातला कार्यकारिणीचा ठराव कशा प्रकारे दडपणाखाली करून घेण्यात आला हे आता उघड झालं आहे, त्यामुळे त्याला किंमत नाही आणि विधानसभेन १९७८ मध्ये राजकीय सौदेबाजीपोटी एकमतान ठराव केला असला, तरी बरोबर वीस वर्षापूर्वी १९५८ मध्ये मराठवाडा विद्यापीठ या नावाने विद्यापीठ स्थापण्याचा ठरावही त्यावेळच्या विधानमंडळानी केलेलाच होता, त्याचं काय ? तेव्हा विधानसभेच्या ठरावाचं नैतिक दडपण आम्ही मानत नाही. शेवटी विधानसभा ही लोकाच्याच इच्छा-आकांक्षाना बांधलेली असते. ( It is subject to the people's will ). या ठरावाचा हवाला देणारे लोक नामांतराचा प्रश्न हा राजकीय प्रश्न बनवताहेत–आपल्या पुढारीपणाच्या सोयीसाठी ते विधानसभेच्या ठरावाकडे पाहतात, मग 'मराठवाड्यातल्या जनतेच्या इच्छेविरुद्ध काहीही लादलं जाणार नाही' अशी आश्वासनं प्रथम वसंतदादा आणि नंतर शरद पवारानी वारंवार व जाहीरपणे दिली आहेत, तिकडे डोळेझाक का करतात ? याच पुरोगामी बुद्धिवंताच्या अहंमन्य समाजकारणातून / राजकारनातून हा प्रश्न बाहेर काढायला हवाय हे तुमचे पुण्यामुंबईचे पुरोगामी विद्वान मध्यंतरी इकडे येऊन गेले, त्यानी शहरात सभा वगैरे घेतल्या आणि त्या शांततेनं पार पडल्याबरोबर सगळीकडे सांगत फिरले, की सगळ्याचं परिवर्तन झालंच. पहा कुठे नामांतराला विरोध म्हणून राहिलेला नाही. म्हणजे आता सयमान राहणं हेही पार झालं, आम्ही याच्या सभा शांतपणे ऐकून घेतल्या तर हे आमची संमतीच गृहीत धरणार ! मग आम्ही आमचा विरोध व्यक्त करायचा तरी कसा ? सभा उधळूनच की काय ?–अर्थात आम्ही तसं काही करणार नाही, कारण त्याची मतं लोकाना समजावून द्यायचा हक्क त्यांना आहेच !

नामांतराचा प्रश्न हा जातीय लढा असल्याचा शोध ज्यानी लावला आहे, त्याना हा प्रश्नच समजलेला नाही. हा लढा सवर्ण हिंदूविरूद्ध दलित–नवबौद्ध असा बिलकुल नाही. दलित विरुद्ध संपूर्ण उर्वरित मराठवाडा असा हा व्यापक संघर्ष आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महार समाजातले होते म्हणून आम्ही त्याच्या नावाला विरोध करतो हे म्हणणं खर नाही. आमचा विरोध कुणाही एखाद्या व्यक्तीला नाही, तर नाव बदलण्याच्या प्रयत्नालाच आहे. बाबासाहेबाविषयी आमच्या कुणाच्याही मनात अनादर नाही. त्याचं स्मारक जरूर व्हावं आणि वादग्रस्त न ठरता व्हावं. पण त्यासाठी नामांतराचीच आवश्यकता आहे असं नाही. आंबेडकराऐवजी दुसऱ्या कुणाचंही नाव सुचवलं गेलं असतं, तरीही आमचा विरोध कायमचा राहिला असता. आंबेडकराची शैक्षणिक Contribution ही आम्ही नाकारीत नाही. पण त्यांचा वारसा सांगणाऱ्या मिलिंद कॅंपसमधल्या मंडळीची वागणूक, विद्यापीठाकडे व समाजाकडे बघण्याची दृष्टी त्याच्यासारखीच आहे का ? ही मंडळी आजवर लोकाशी फटकून वागली, विद्यापीठात दडपशाही करायचा प्रयत्न त्यानी केला आणि वातावरण दूषित केलं. ही माणसे आणि बाहेरचे पुरोगामी बुद्धिवत मोठा आंबेडकरभक्तीचा आव आणतात, तर आंबेडकराचं स्मारक करायला त्याना १९७८ चाच मुहूर्त आणि आमचंच विद्यापीठ का सापडल ? तुमच्या पुण्या–मुंबई–नागपूरच्या विद्यापीठांची नावं नाही बदलायला गेले ते ! आंबेडकर १९५६ मध्ये गेले १९५७ मध्येच, त्याच्या नावाचा विचार करूनही, सर्वानुमते 'मराठवाडा विद्यापीठ' हेच नाव ठेवण्याचा निर्णय झाला आणि १९५८ मध्ये विद्यापीठ स्थापन केल. त्या समितीत असणारे प्रा म भि. चिटणीस त्यानंतर दहा वर्षं याच विद्यापीठाचे रजिस्ट्रार राहिले आणि आता ते नामांतरवाद्याचे पुढारी बनले आहेत. या मंडळीना गेल्या वीस-बावीस वर्षात डॉ. आंबेडकराचं चांगलंसं स्मारक करावयाची आठवण नाही झाली ?

आमच्या मते या प्रश्नावर आता दोनच सोल्यूशन्स निघणं शक्य

आहे– एक: सार्वमत किंवा दोन : डॉ आबेडकराचं स्वतंत्र स्मारक. तिसरा पर्याय नाही. ‘ डॉ. बाबासाहेब आबेडकर मराठवाडा विद्यापीठ ’ हा विधानसभेच्या ठरावाद्वारे सुचविलेला समन्वयात्मक मार्गही आता उपयोगाचा नाही. कारण मध्यतरीच्या काळात मराठवाड्याची इतकी निंदानालस्ती करण्यात आलेली आहे की लोकाची मनं आता तुटली आहेत आणि अशा मध्यममार्गानं ती जोडली जाणं शक्य नाही. गेल्या वर्षी मराठवाड्याच्या काही तालुक्यात जी दंगल झाली, ती दुर्दैवीच होती, पण तो प्रक्षुब्ध जनतेचा उत्स्फूर्त (Spontaneous) असाच ऊद्रेक होता. ती काही पूर्वनियोजित दगल नव्हती. पण याचा विचार न करता, खरी परिस्थिती आणि नुकसानीचा तपशील समजावून न घेता या बाहेरच्या पुरोगामी बुद्धिवंतांनी मराठवाड्याच्या सपूर्ण जनतेला जबाबदार धरून टीकेचा भडीमार केला. आम्हाला रझाकाराची टोळी म्हणण्यात आलं. संपूर्ण मराठवाडाच जातीय विद्वेषानं पेटलेली भूमी आहे, सगळेच लोक गैरसमजूतदार, असहिष्णू आणि दंगलखोर आहेत, असे आरोप झाले. मराठवाड्याच्या लोकाना समजून घेतल जात नाही, बाहेरून त्याच्यावर सगळ्या गोष्टी लादल्या जातात अशी जी भावना आमच्यामध्ये पूर्वीपासूनच होती, तिला यामुळे पुष्टीच मिळाली आहे. त्यामुळे आता हा प्रश्न मराठवाडा विरुद्ध महाराष्ट्र–विदर्भ असा व्हायची शक्यता आहे आणि याला तुमची big brother attitude हीच जबाबदार आहे. असं होऊ नये अशीच आमची इच्छा आहे. तुम्ही लादलेली गोष्ट आम्ही हात जोडून मान्य करणं म्हणजे तडजोड, म्हणजेच सामंजस्य असं जर असेल तर असलं सामंजस्य आम्हाला मंजूर नाही. याचे जे परिणाम व्हायचे असतील, ते होतील. आमच्या गरीब प्रदेशाची युद्धभूमी व्हावी अशीच जर तुमची इच्छा असेल, तर तसं होऊ दे. मग त्यातनं ज्या कुणाचं जे काही नुकसान व्हायच असेल, ते होईल. त्याची जबाबदारी मात्र आमच्यावर असणार नाही. तुम्ही जे शाततेच्या नावाखाली इथे चाल करून येत आहात, तेच याला जबाबदार आहेत. मागच्या दंगलीची जबाबदारीही आमची नाही. लोकभावनेची कदर आपण करणार नसाल तर असाच व्हायलन्स उफाळून येत असतो. आमच्या भावना तुडवून वर शातताभंगाचं खापरही आमच्याच माथ्यावर फोडू नका. या येणाऱ्या आंदोलनात सुद्धा आमच्याकडून आगळीक होऊ नये असा प्रयत्न आम्ही जरूर करू. पण समोरच्या बाजूचा भरवसा नसल्यामुळे पुढची जबाबदारी आक्रमकावर आणि शासनावर राहील. काही विपरीत घडणारच नाही अशी खात्री आम्ही आता देऊ शकत नाही. लोकक्षोभाचं कुणीच नियंत्रण करू शकत नाही. □

# ‘ सगळ्याच प्रश्नाचा संपूर्ण फेरविचार हवा. ’

## –अनंतराव भालेराव

विद्यापीठाचं नाव बदलण्याचा प्रश्न हा सामाजिक न्यायाचा किंवा मूलभूत हक्काचा प्रश्न आहे, हे मला अजिबात मान्य नाही. कुठला मूलभूत हक्क या प्रश्नात गुतला आहे ? हा निव्वळ भावनेचा प्रश्न आहे आणि तो आणखी चिघळू दिला, तर त्यातून महाविदर्भाच्या धर्तीवर स्वतंत्र मराठवाड्याची चळवळ उद्‌भवणं अशक्य नाही. हे होऊ द्यायचं नसेल, तर प्रथम हा प्रश्न राजकारणातून बाहेर काढायला हवा. त्याच्यामागचं हलक्या दर्जाचं राजकारण निपटून काढलं पाहिजे. मला समजत नाही की, नामातर घडवून आणायची एवढी घाई का चाललीय ? हा काय आर्थिक मदत किंवा पाण्याचं दुर्भिक्ष्य दूर करण्यासारखा तातडीचा प्रश्न आहे का ? नामातराचा प्रश्न हा जीवन-मरणाचा संघर्ष आहे, असं मला वाटत नाही. इतका कुणाच्या जीवन-मरणाचा प्रश्न यात गुतला आहे ? वेळ लागला तरी हरकत नाही, पण नामातराची तुमची गरज लोकाना पटवून द्यायचा प्रयत्न करा. दोन वर्षं विद्यापीठ बाजूला राहू दे. नामातराबद्दलचा विधानसभेचा ठराव तेवढा महत्त्वाचा आणि लोकभावनेला काहीच किंमत नाही का ? उद्या बहुसख्य जनतेच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून ठरावाची अमलबजावणी लादली आणि विरोधकाच्या असंतोषाचा स्फोट होऊन माणसं मेली तर त्याला जबाबदार कोण ? डिसेंबरात आदोलनाचा भडका उडाला तर त्यातनं विध्वंस होणार हे मला समोर दिसतंय, म्हणून मी चळवळ टाळावी, चळवळीनं घात होईल अस म्हणतो. पण हे सागितल तर माझ्यावरच जातीयवादाला फूस दिल्याचा आरोप करतात ! ‘ अनतराव आणि गोविंदभाईंना पकडा, फासावर चढवा, ’ अशा घोषणा बाहेर चालल्या आहेत. त्यापेक्षा आपल्या समाजात जातीयता आहेच, हे सत्य समजावून का नाही घेत ? सवर्ण मंडळी कुणी साधुसंत आहेत आणि ते इतराना भडकावून सूड उगवतील अशी भीती मला वाटते, म्हणूनच मी सगळ्यानाच सबुरीचा सल्ला देतो, पण आज कुणी ऐकण्याच्या मनःस्थितीत दिसत नाही !

मी स्वतः नामातरविरोधी आहे हे तर स्पष्टच आहे. माझी भूमिकाही मी वेळोवेळी उघडपणे माडलेली आहे. हा सर्व प्रश्नच माझ्या मते पुन्हा चर्चेला खुला (re-open) करायला हवाय. आम्ही तर असं म्हणतो की, केवळ मराठवाडा विद्यापीठाच्याच नव्हे, तर महाराष्ट्रातल्या सर्वच विद्यापीठाच्या सदर्भात नामातराचा पुनर्विचार करा. फॅक्ट्स तपासा. नामांतरासाठी कोणते निकष लावणार, ते सागा. मराठवाड्यातल्या नामातरवाद्याचे युक्तिवाद या निकषावर टिकतात का ते पहा. औरगाबादमध्ये पहिलं पदवीपर्यंतचं महाविद्यालय बाबासाहेब आबेडकरानी काढलं, हे खरं आहे, पण त्या आधारावर विद्यापीठाला त्याचं नाव द्यायचं, तर त्यांच्याबरोबरच–

त्याच वर्षी—स्वामी रामानंद तीर्थ यांनी नादेडला 'पीपल्स कॉलेज' स्थापन केलं, त्याचं काय ? आणि तसं पाहिलं तर डॉ. आंबेडकरांनी आपल्या शैक्षणिक कार्यातलं पहिलं महाविद्यालय—सिद्धार्थ कॉलेज—मुंबईला काढलं. तेव्हा मुंबई विद्यापीठाचं नाव बदलायला काय हरकत आहे ?

मराठवाडा विद्यापीठात मागासवर्गीय जातिजमातीचे विद्यार्थी फार मोठ्या संख्येनं शिकतात, म्हणून त्याचं नाव बदलावं, असा एक दावा केला जातो. मुळात सख्या विदर्भातून येणाऱ्या दलित विद्यार्थ्यांमुळे वाढली आहे, हे लक्षात ठेवलं पाहिजे. इथे उपलब्ध असणाऱ्या सोयीमुळे आणि डॉ. आंबेडकरानी स्थापिलेल्या सस्थाच्या आकर्षणामुळे हजारो दलित विद्यार्थी विदर्भातून इथे येऊन शिकत असतात. मराठवाड्यातल्या ग्रामीण दलित तरुणाना अजूनही शिक्षणाची सधी सर्रास मिळतेच असं नाही. पण हा प्रश्न बाजूला ठेवला, तरी शिक्षणसंस्थांचं, त्यात बहुसंख्येनं शिकणाऱ्या समाजगटाच्या (community) आधारावर नामकरण करायचं, हाच निकष आपण सगळीकडे लावणार आहोत का ? तसं झालं तर महाराष्ट्रातल्या इतरही विद्यापीठाची नावं विद्यार्थिसंख्येच्या आधारावर बदलायला आपण तयार असणार आहोत का ? असा पायंडा पाडायचा नसेल, तर फक्त मराठवाड्याचाच अपवाद का केला जावा ? आम्ही राजकीयदृष्ट्या दुबळे आहोत आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहोत, म्हणून आमच्यावर हा अपवादात्मक निर्णय लादला जाणार आहे का ? मराठवाड्यातल्या जनतेला काही निर्णयस्वातंत्र्य मिळणार का नाही ? की त्यानी फक्त बाहेरून लादलेले निर्णय स्वीकाराचे ? तसंच पाहिलं तर कोल्हापूरच्या विद्यापीठाला छत्रपती शिवाजीच नाव दिलं, तेव्हा मराठवाड्यातल्या जनतेचं मत कधी विचारात घेतलं होतं ? याच न्यायानं मराठवाडा विद्यापीठाच्या नावाबद्दलचा निर्णय इथल्या लोकांच्या बहुमतावर व्हावा असं म्हटलं तर त्यात काय गैर आहे ? या बहुमताची कदर न करता बाहेरच्यांच्या एकमताचा निर्णय लादून तुम्ही प्रादेशिकतेच्या आणि 'आपण महाराष्ट्राची वसाहत आहोत' अशा भावनेला खतपाणी घालता आहात. आज नामांतराच्या मागणीला मराठवाड्याबाहेरून जो पाठिंबा मिळतो त्यामागे 'आपलं संकट टळलं आणि मराठवाड्यावर गेलं, बरं झालं,' अशीच भूमिका दिसून येते. एरवी पुण्या-मुंबईचे, नागपूरचे लोक आपापल्या विद्यापीठाला आंबेडकरांचं नाव द्यायचा ठराव का नाही करीत ? आंबेडकर तर राष्ट्रपुरुष होते. ते फक्त मराठवाड्यातच महान ठरतात आणि बाहेर नाही असं थोडंच आहे ?

नामांतराला आम्ही विरोध करतो, त्याचा अर्थ डॉ. आंबेडकराबद्दल आम्हाला आदर नाही, असा नाही. प्रचार मात्र तसा केला जातो. डॉ. आंबेडकर हे नि:संशय थोर पुरुष होते आणि त्यांचं स्मारक करायची भावना ज्यांच्या मनात असेल, त्याना आमचा पाठिंबाच आहे. त्यांच्या योग्यतेला शोभून दिसेल, असं मराठवाडा विद्यापीठापेक्षाही भव्य असं स्मारक जरूर उभारलं जावं. सर्वानुमते त्याबद्दलचा निर्णय व्हावा. ते औरंगाबादला व्हायला काहीही हरकत नाही. त्या दृष्टीनं पूर्वीही बौद्ध विद्यापीठ/तांत्रिक शिक्षणाचं विद्यापीठ/आंतरराष्ट्रीय कायदा—अभ्यास संस्था असे विविध पर्याय सुचविण्यात आलेले होते, त्यातला टेक्निकल युनिव्हर्सिटी नव्याने सुरू करून तिला बाबासाहेबांचं नाव देण्याचा पर्याय माझ्या मते अत्यंत व्यवहार्य होता. पण आहे त्याचंच नाव बदलण्याच्या हट्टापायी त्याच्याकडे दुर्लक्ष झालं. शेवटी भक्त मारुतीला असतात, तसे म्हसोबालाही असू शकतात. तुम्ही म्हसोबाशेजारी हवं तर मारुतीचं सुरेख देऊळ बाधा. पण म्हसोबा उपटून तिथेच मारुती बसविण्याचा अट्टाहास कशासाठी ?

नामांतरासाठी विधानसभेच्या ठरावाचा हवाला जे लोक देतात, ते जनतेपेक्षा सरकारला सार्वभौम समजतात का ? हा प्रश्न मराठवाड्यातल्या जनतेच्या सार्वमतावर सोडवायला नामांतरवादी तयार नाहीत, कारण 'समाजसुधारणा सार्वमतावर ठरवता येत नाहीत,' असं त्याचं म्हणणं आहे. पण नामांतरामध्ये कोणती सामाजिक सुधारणा अभिप्रेत आहे ? निव्वळ नावात बदल, ही सुधारणा म्हणायची का ? अशा बदलाला बहुसंख्य लोकांचा विरोध असेल, तर नामांतरवाद्यांवर त्या समाजाला बरोबर घेऊन जाण्याची जबाबदारी नाही का ? त्यांना समजावून सांगायच की त्यांच्या भावना दुखवायच्या ? हिंदू धर्माला आणि देवदेवताना जाहीर शिवीगाळ करीत फिरल्यामुळे कटुता वाढण्यापलीकडे काय निष्पन्न होतं ?

यातनं मार्ग एवढाच दिसतो की, महाराष्ट्रातल्या चार शहाण्या आणि सर्वांना आदरणीय असणाऱ्या व्यक्तींनी पुढाकार घ्यायला हवा. उभयपक्षी विश्वासार्ह असे लोक सुदैवाने आहेत. न्या. छगला आहेत, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि आचार्य दादा धर्माधिकारी आहेत. अशा मंडळींनी पुढे यायला हवं आणि आपणही हा सगळाच प्रश्न, संपूर्णपणे त्यांच्याकडे फेरविचारासाठी द्यायला हवा. दोन्ही पक्षांच्या अस्मिता—भावना सांभाळून काही मध्यममार्ग निघतो का, हे पहायला हवं. या प्रश्नाचं राजकीय भांडवल केलं जाणार नाही, इकडेही लक्ष द्यायला हवं. हे न करता घिसाडघाईनं काही लादलं, तर पेटणारा संघर्ष सगळ्या महाराष्ट्रालाच महाग पडेल, हे आपण एकदा अनुभवलं आहे. आता तरी ते टाळायला हवं. □

## 'हा लढा माणुसकीचा आहे. नागरी हक्कांचा आहे.'

## —प्रा. म. भि. चिटणीस

औरंगाबाद.. नामांतरवादी आणि विरोधक याचे मुख्य केंद्र, दोन्ही बाजूनी डावपेचांची आखणी सुरू झालेली. निवेदन निघताहेत. पत्रकं छापली जात आहेत. भिंतीवर पोस्टर्स चिकटवली जात आहेत. या धामधुमीत आम्ही दोन्ही बाजूच्या लोकाच्या मुलाखती घेण्यासाठी जाऊन पोहोचलेलो. एक नामांतरवादी प्रा. बापूराव जगताप याच्याशी आधीची थोडी ओळख. म्हणून प्रथम त्यांच्याकडे गेलो. घरात

शिरण्यापूर्वीच चर्चेचे सूर कानावर पडतात आत जातो तर तेथे प्रा. म. भि. चिटणीस आणि प्रा. मनोहर गरूड हेही भेटतात. चिटणीस हे नामातरवादी विद्यार्थी-नागरिक कृतिसमितीचे अध्यक्ष, मिलिंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलसचिव. जगताप हे एक दलित कवी आणि वसंतराव नाईक महाविद्यालयातील प्राध्यापक. नामांतरवादी कृतिसमितीचे ते कार्याध्यक्ष आहेत. गरूड हे डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील प्राध्यापक आणि एक कट्टर नामांतरवादी कार्यकर्ते. असे तीन लोक एकत्र भेटल्यामुळे आम्ही एकदम खूष. मोकळी आणि सविस्तर चर्चा झाली. यानंतर दुसऱ्या दिवशी प्रा गरूड यांच्या घरी गप्पा मारायला गेलो. तेथे प्रा. गांगुर्डे आणि प्रा रामचंद्र क्षीरसागर हे त्याचे सहकारीही भेटले. बापूराव आणि गरूड यांच्या घरी झालेल्या चर्चेतले नामातरवाद्यांचे प्रमुख मुद्दे एकत्रितरीत्या असे—

सुरुवातीलाच प्रश्न निघाला चळवळीच्या प्रयोजनाचा. 'डॉ. आंबेडकराचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यायची मागणी नेमकी आत्ताच का? आणि हे नाव मराठवाडा विद्यापीठालाच का द्यायचे?' उत्तर मिळते—

'१९२७ साली झालेल्या दलिताच्या पहिल्या संघर्षाच्या सुवर्णमहोत्सवाचे निमित्त साधून ही मागणी पुढे आली. २७ साली फ्रेंच राज्यक्रातीच्या जाहीरनाम्यातील कलमाच्या धर्तीवर मानवाच्या जन्मसिद्ध हक्काचा उद्घोष होत होता. तेव्हा ज्या तत्त्वांचा उद्घोष झाला त्याच तत्त्वासाठी आता हा लढा आहे. नामांतर हे केवळ निमित्त मात्र आहे. या निमित्ताने दलित आणि दलितेतर या दोघाचाही नागरी हक्कांच्या प्रस्थापनेसाठी लढा सुरू झालेला आहे. आंबेडकर हे राष्ट्रपुरुष होते. त्याची विद्वत्ता वादातीत होती. अशा थोर विद्वानाचे नाव विद्यापीठाला देण्यातच खरे औचित्य आहे. त्यातून पुन्हा आंबेडकरानी मराठवाड्यात केलेले शैक्षणिक कार्य फार महत्त्वाचे आहे. १९५० साली आंबेडकरांनी मराठवाड्यातील पहिले कॉलेज सुरू केले. (मिलिंद कॉलेज) विरोधक म्हणतात की, त्यानी मुंबईत सिद्धार्थ कॉलेज नाही का सुरू केले? मग मुंबई विद्यापीठाला त्याचं नाव का नको? पण येथे एक फरक लक्षात ठेवायला हवा, तो म्हणजे सिद्धार्थ कॉलेज हे अनेक कॉलेजेसपैकी एक होते; पण मिलिंद कॉलेज ज्या भागात एकही कॉलेज नाही अशा भागात सुरू झालेले होते. दुसरा मुद्दा असा की, मराठवाडा विद्यापीठात जास्तीतजास्त दलित विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १९७५ मध्ये या विद्यापीठातील ७५ हजार विद्यार्थ्यांपैकी २२ हजार विद्यार्थी दलित होते. मराठवाड्याचा शैक्षणिक परिसर ही आम्हा दलितांची काशी किंवा मक्काच आहे म्हणा ना! आमचे हे महत्त्वाचे संस्कारकेंद्र आहे आणि एवढे मोठे संस्कारकेंद्र भारतात अन्यत्र कोठेही नाही. मराठवाडा ही संतभूमी आहे असे म्हणतात. मग संतांनी ज्या मानवतेचा आणि समानतेचा मंत्र जपला ती निदान आधी या संतभूमीत तरी येऊ दे! सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने उचललेल्या पावलाला येथे अपशकून होता कामा नये...'

'मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळी ज्या समितीने विद्यापीठाचे नाव निश्चित केले, त्या समितीत आपण होता. तेव्हा आंबेडकर व इतर काही व्यक्तींच्या नावाचा विचार झाला पण शेवटी ही नावे डावलून 'मराठवाडा विद्यापीठ' हेच नाव एकमताने ठरवले गेले. मग तेव्हाची आपली भूमिका आज एकदम बदलली कशी?' प्राचार्य चिटणिसाना आमचा प्रश्न.

यावर त्याचे उत्तर असे की,

'ही गोष्ट खरी आहे, पण तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. तेव्हाही आंबेडकर याचे नाव द्यावे असे मला वाटत होते. पण व्यक्तीची नावे विद्यापीठाना दिली जात नसत हे लक्षात घेऊन समितीने तीच प्रथा पाळली आणि 'मराठवाडा विद्यापीठ' हे नाव दिले. पण आज परिस्थिती बदललीय व्यक्तीची नावे विद्यापीठाना सर्रास दिली जातात. कधी कधी मूळ नावे बदलून दिली जातात. तेव्हा त्यानुसार आंबेडकराचे नाव द्यायला काय हरकत आहे?'

'मराठवाड्याची अस्मिता राखण्यासाठी आमचा विरोध आहे असे विरोधक म्हणतात. आंबेडकराचे दुसरे भव्य स्मारक उभारायलाही ते तयार आहेत. याबाबत आपले काय म्हणणे आहे?'

'प्रश्न मराठवाड्याच्या अस्मितेचाच असेल तर विद्यापीठाच्या नावात तो शब्द असण्याला आमची हरकत कुठे आहे? अस्मितेच्या गप्पा मारणारे मराठवाड्यावर आक्रमण होतेय अशी भाषा करतात. अरे, मराठवाडा हा काय स्वतंत्र सार्वभौम देश आहे की काय? खरं म्हणजे अस्मिता हे फक्त दाखवायचं कारण आहे. खेड्यापाड्यात दलिताची घरे जाळणाऱ्याना 'अस्मिता' या शब्दाचा अर्थ तरी कळतो काय? यापाठीमागे खरं म्हणजे जातीयता आहे. 'महार पुढे चालले' हे वैषम्य यामागे दडलेले आहे. गांधीवधाच्या वेळेला ब्राह्मणाची घरे जाळली गेली तेच आज दलिताबाबत झाले?'

प्रा. गरूड यानी तर सरळच सांगून टाकले की, 'हा मराठा जातीयवाद आहे. फक्त मराठा वर्गाने गोविंदभाईंची ढाल पुढे केली आहे! हे मराठवाडा नाही, तर 'मराठा विद्यापीठ' बनलेले आहे असे दिसते. स्पष्ट मन मांडणाऱ्याचा येथे पंढरीनाथ रानडे होतो! अनेकाना 'नामातर हवे' हे दडपणामुळे सागता येत नाही. येथे ब्राह्मण आणि अस्पृश्य हे दोघेही शूद्रच आहेत. फरक एवढाच की ब्राह्मण हे नुसते शूद्र तर दलित हे अतिशूद्र!'

प्रा. गांगुर्डे यानी गोविंदभाई श्रॉफ याच्या अस्मितेतील पोकळपणावर भाष्य केले, 'गोविंदभाईंची अस्मिता वरवरची आहे. फुग्यासारखी आहे. त्याची अस्मिता मुळात गुजराथची आहे. मुंबई गुजराथला द्यावी अशी मागणी त्यानी केली होती.'

आंबेडकराच्या अन्य स्मारकाबाबत नामातरवाद्याचे म्हणणे असे की, 'ही पळवाट आहे. पूर्वी मंदिर प्रवेशाबाबत, आम्ही दुसरे मंदिर तुम्हाला बांधून देतो, असे काही सवर्ण म्हणाले होते. पण आपल्या मंदिरात प्रवेश द्यायला नको म्हणून दुसरे मंदिर बांधून देण्याला काही अर्थ आहे का? ब्रिटिशाच्या काळात आगगाडीत गोऱ्यासाठी वेगळे डबे आणण्याला विरोध का झाला? कारण प्रश्न फक्त प्रवासाचा नव्हता, तर समानतेचा होता. येथे तसेच आहे वेगळे स्मारक देतो याला काय अर्थ आहे? मराठवाडा विद्यापीठाला आंबेडकराचे नाव का नको याला काही योग्य उत्तर आहे का?'

'बरं, पण हे आंदोलन आत्ताच का? ६ डिसेंबर ही तारीख असण्यामागे राजकीय हेतू आहे असा आरोप केला जातो. यावर आपले म्हणणे काय?'

'अशी काही वस्तुस्थिती खरोखरच नाही. हा निर्णय काही आज घेतलेला नाही. आमच्या २२ जुलैच्या परिषदेतच ६ डिसेंबरच्या आंदोलनाचा निर्णय झालेला होता. तेव्हा निवडणुका जाहीर झालेल्या नव्हत्या. आता लोक म्हणतात हा प्रश्न कदाचित निवडणुकात गोवला जाईल. जाऊ दे की ! यात काही गैर नाही. नाहीतरी भारतात सामाजिक प्रश्नावर कधीच निवडणूक लढवली गेली नाही अर्थात नामातराच्या प्रश्नावर सार्वमत हा तोडगा मात्र अयोग्य आहे कारण सुधारणेला बरेच वेळा बहुसंख्यांचा विरोधच असतो '

' हा प्रश्न सामंजस्याने सोडवायला हवा असे काहीजण म्हणतात एसेम जोशीनी लोकमत तयार करण्याची घोषणा केली. हा दृष्टिकोण तुम्हाला पटतो का ?'

'एसेम याच्याबद्दल आम्हाला आदर आहे. त्याच्या हेतूबद्दल शका नाही. पण आम्हाला हे आदोलन आत्ताच हवे आहे. कारण हा संघर्ष आता अटळ आहे. आणि अटळ संघर्ष पुढे ढकलण्यात अर्थ नसतो. समन्वयवादी भूमिका किती दिवस टिकू शकेल हा प्रश्न आहे ! सामजस्याच्या नावाखाली फक्त कालहरण मात्र होईल. आणि प्रश्न मग कदाचित शतकाच्या भाषेतही जाईल. बालविवाह, सती, अस्पृश्यतानिवारण यासारखे प्रश्न सामंजस्यासाठी भिजत टाकले गेले का ? अहो कसलं आलंय सामंजस्य ? सध्याचे महाराष्ट्र शासन तरी सामंजस्यावर आधारलेले आहे का ?'

' ह्या आदोलनात मागचा अनुभव लक्षात घेता, पुन्हा एकदा जाळपोळ आणि दलितावर हल्ले होण्याचा धोका आहे. खेड्या-पाड्यातील दलिताच्या जीवाला धोका आहे. याची जबाबदारी कोण स्वीकारणार ? या बाबतीत तुम्ही काही विचार केला आहे का ?'

'असं आहे की अत्याचार आम्हाला नवीन नाहीत. पण जर माणूस म्हणून जगायचं असेल तर संघर्षाला तयार राहिले पाहिजे ! प्रतिकाराची भावना कधीतरी निर्माण व्हायलाच पाहिजे. ' रणावीण स्वातत्र्य कोणास मिळाले ?' विरोधकापैकी कोणीतरी म्हणाले की, आता आम्ही तुमची एक झोपडीसुद्धा शिल्लक ठेवणार नाही. मग आम्हीही म्हणतो की, शेवटचा दलित शिल्लक असेपर्यंत आम्ही सनदशीर संघर्ष करू. हा अपरिहार्य त्याग आहे. मानवमुक्तीसाठी हा त्याग आहे. स्वातत्र्यलढ्यात लोक मरतील हा विचार कोणी केला होता का ? इथे लोकाना दोन-दोन स्वातंत्र्ये मिळाली, पण आम्हाला एकही नाही ! तेव्हा स्वातंत्र्यासाठी आता त्यागाला तयार राहाय-लाच हवे. आणि आमच्याकडून तर हा लढा शाततापूर्ण आहे. आम्ही सविनय सत्याग्रह करणार आहोत. आमचा लढा नामातर विरोध-काशी नाहीच. तो फक्त सरकारशी आहे. सरकारने मान्य केलेल्या ठरावाची फक्त अंमलबजावणी बाकी आहे. ती केली जावी म्हणून आम्ही सरकारविरुद्ध लढणार आहोत. पण नामांतर विरोधक मात्र आमच्याशी लढायची भाषा करतात.'

'नामातराने काय साधणार ? मूळ प्रश्न भाकरीचा आहे, तो सोडवला पाहिजे असा एक दृष्टिकोन माडला जातो त्याबाबत तुम्हाला काय वाटते ?'

' खुद्द बाबासाहेबाची चळवळही केवळ भाकरीची नव्हती. तर ती माणुसकीचीही होती. ' अपमानीत जिण्यापेक्षा मृत्यू बरा ' असे ते म्हणत असत हा लढा माणुसकीचा आहे. नागरीहक्काचा आहे.'

'फूट ही दलित चळवळीची एक शोकांतिकाच आहे आणि आजही ती कायम आहे. या संदर्भात ही चळवळ काही साधू शकेल काय ?'

' फूट आहे हे खरं आहे. पण त्यालाही काही काही कारणे दिसतात. एकतर दलितामध्ये फूट पाडायला काँग्रेसने सुरुवात केली. उदाहरणच द्यायचे तर १९३७ च्या असेंब्लीच्या निवडणुकीत आंबेड-कराविरुद्ध पी. बाळू याना उभे केले गेले. पुढेही लोकसभेच्या निवड-णुकीत आंबेडकराविरुद्ध काजरोळकराना उभे केले गेले. तेव्हा काँग्रेसची ही फोडण्याची नीती हे एक कारण दिसते. दुसरे म्हणजे महार बौद्ध झाले आणि इतर दलितापेक्षा वेगळे ठरले. धर्मांतरा-नतर त्याना उपजीविकेचा विशिष्ट धंदा नव्हता स्वाभिमान, स्वाव-लबन आणि शिक्षण ही आंबेडकराची तत्त्वे स्वीकारून ते पुढे आले. त्यामानाने इतर दलित मागे राहिले याचे थोडेफार वैषम्य त्याच्या मनात राहिले. पण हळूहळू हे चित्र बदलतय. परिवर्तनाची गती रोखता येत नाही. आत्मपरीक्षणाला सुरुवात झालीय. ऐक्य वाढू लागलंय. आता हेच पहा ना ! या आदोलनात बंजारा जमातीचे हजारो लोक सामील होत आहेत. हे कशाचे लक्षण आहे ? जाळपोळ अत्याचार यामुळे सर्वच दलितामध्ये असुरक्षिततेची भावना झाली. या भावनेतून तरी ऐक्य निर्माण होतंय हे या आदोलनाचं एक चागलं फलित म्हणायला हवं.'

' मध्यंतरी दलिताच्या घरादाराचा जो विध्वंस झाला, त्यानतर केलेले पुनर्वसन समाधानकारक होते का ?'

' सर्वसाधारणपणे पुनर्वसन समाधानकारक रीतीने केले गेले हे मान्य करायला हवे. पण मूळ प्रश्न उखडून काढण्याऐवजी फुकर घालण्याचा हा प्रयत्न आहे. घरं उभी राहिली, पण मनं कशी उभी राहणार ?'

खरं आहे ! मराठवाड्यातल्या लोकाच्या मनाचे पुनर्वसन कसे होणार, हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे ☐

# दलित पँथरच्या कचेरीत आणि एका झोपडपट्टीवर

अकोला–जालना तालुक्यातलं एक छोटसं खेडेगाव. औरंगाबादपासून वीस-पंचवीस मैलावर वसलेलं मराठवाड्यातल्या इतर अनेक खेड्यांसारखंच हे गाव. सरजामशाही चौकटीत फिट्ट बसलेलं. गावात अर्थातच सवर्णांची झब्बूशाही महारवाडा गावापासून वेगळा .. पण आज जाऊन पहाल तर ही वस्ती उजाड दिसेल. महाराचं एकही माणूस नजरेला पडायचं नाही. दिसतील फक्त त्या उद्ध्वस्त वस्तीचे

पोरके अवशेष... कुठं गेली बरं ही सगळी माणस आपली हक्काची घरं–दारं आणि जमीन-जुमला सोडून ? आपल्या अनेक पिढ्या जिथे नादल्या त्या गावाला रामराम ठोकून ?... ही माणसं गेली आहेत औरंगाबादला. गेली म्हणजे, अक्षरश: पळूनच गेली आहेत ..

नामातरवाद्याशी झालेल्या गप्पामध्ये अकोल्याच्या निर्वासित दलितांची करुण कहाणी ऐकली आणि ठरवलं की प्रत्यक्ष त्यांनाच भेटायचं. एका नामातरवादी कार्यकर्त्याला घेऊन त्याच्याकडे जाणार होता. पण त्या कार्यकर्त्याकडे गेलो तेव्हा कळलं की, तो गावाला गेलाय. आली का पंचाईत ? मग स्मरणशक्तीला ताण देत हिंडत सुटलो. कलेक्टर ऑफिससमोर त्या लोकाच्या झोपड्या आहेत. पण स्मरणशक्तीने दगा दिल्यामुळे जाऊन धडकलो कार्पोरेशनपाशी ! आणि अकोलावाल्याची झोपडपट्टी शोधता शोधता सापडले दलित-पँथरचे ऑफिस ! म्हटलं, चुकलो खरे; पण अगदीच चुकीचे चुकलो नाही ! कारण पँथरवाल्यानाही भेटायचं होतंच. फक्त अनपेक्षितपणे पँथरच्या ऑफिसमध्ये शिरल्यामुळे पुरेशी ' मानसिक तयारी ' झालेली नव्हती ! पँथरबद्दल आत्तापर्यंत जे ऐकलं होतं त्यामुळे नाही म्हटलं तरी मनात थोडीशी धडधड चालू होतीच. हे लोक आपल्यावरच उखडणार नाहीत ना ?' दणादण शिव्या हासडणार नाहीत ना ? पण पँथरवाल्यांनी अगदी उलट अनुभव दिला ! बोलण्यात कुठेही आक्रस्ताळेपणा नाही. आरेरावी नाही. मुलाखत घेणाऱ्याला शिव्या नाहीतच नाहीत, पण ज्याच्या विरोधी बोलत होते त्यांच्याबद्दलसुद्धा एकही शिवी नाही ! शांतपणे दिलेली सरळ उत्तरं, वर पुन्हा चहा–कॉफी.

पँथरचे एक नेते आणि औरंगाबाद नगरपरिषदेचे सदस्य श्री. रतनकुमार पंडागळे आणि त्यांचे इतर काही पँथर–सहकारी यांच्याशी गप्पा झाल्या. लोकशाही मार्गाने सविनय आदोलन करणे पँथरला मान्य आहे. विद्यापीठाच्या नामांतरात डॉ. आंबेडकर या शब्दाबरोबर ' मराठवाडा ' हा शब्द कायम ठेवण्यास त्याची हरकत नाही. हे कळल्यावर आमच्या प्रश्नातली हवाच काढली गेली ! मग पँथरची शिवीगाळ वगैरे मुद्दे काढून पाहिले. वाटलं, हे लोक शिवी-गाळीचं समर्थन करणार. काही तरी जहाल बोलणार. पण पुन्हा एकदा धक्का ! ... ' आम्ही शिवीगाळ करत नाही. आमच्या सभां-मधली टेप केलेली भाषण आमच्याजवळ आहेत. ती ऐकू शकता हवी तर. आम्ही शिवीगाळ आणि जाळपोळ केली नाही. करणार नाही. उलट नामातरविरोधकानीच ती केलीय !' पंडागळे यानी सवर्णांच्या दादागिरीच्या काही घटनाही सागितल्या. उदा. आपेगावला साहेबराव पाखरे या दलिताला घरात बाधून जाळण्याचा प्रयत्न झाला आणि तो विधानसभेसाठी उभा राहिल्याचा राग अशा रीतीने काढला गेला, खुद्द औरंगाबादमध्ये नामातराला पाठींबा दिल्याबद्दल प्रा देसरडा याना मारहाण झाली, गणोरी येथील पगारे नावाच्या शिक्षकाला नग्न करून गाढवावरून फिरवले गेले, वगैरे.

या गप्पांनंतर पंडागळ्याबरोबर अकोल्याच्या दलिताच्या झोपड-पट्टीवर गेलो. मध्येच असणारी एक रिकामी जागा साफसूफ केली गेली. त्यावर एक चादर अंथरली गेली. सगळे जमले. आमच्याभोवती गोलाकार बसले गप्पा सुरू झाल्या. मुख्यतः तरतरीत दिसणारा एक तरुण आमच्याशी बोलत होता. तो अकोल्याचा पोलीसपाटील, काशिनाथ भागाजी बोर्डे हे त्याचं नाव. बोर्डे आणि इतर मंडळींनी त्याची कहाणी सागितली. गप्पांच्या ओघात मध्येच समजलं की, रात्रीच त्याच्या झोपडपट्टीतली एक लहान मुलगी थंडीने कुडकुडून मेलेली... ' हे आत्ताच तर तिला पोचवून आलोय. ' अत्यंत सहजतेने सांगितलं जातं. मेलेल्या मुलीचा बाप आमच्याशी बोलणाऱ्यात होताच. केवढा थंडपणा ! ' आत्ताच बाहेरून आलो ' हे जितक्या सहजतेने सागाव, तितक्याच सहजतेने ' आत्ताच स्मशानातून आलो ' हे सागणे ! या माणसाना दु:ख वगैरे काही नव्हतंच का ? होत तर ! पण ते इतकं प्रचंड होतं की मुलगी मेल्याचं दु:ख त्यात कुठल्या कुठे सामावून जावं ! समुद्रात ओजळभर पाणी कुठल्या कुठे गडप व्हावं तसं ! विलक्षण हादरवून टाकणारा हा अनुभव ! या माणसाना आता घरं–दारं नाहीत, गुर–ढोरं नाहीत, पैसा–अडका नाही, एवढंच काय, बिचाऱ्याजवळ स्वत चे अश्रूही शिल्लक नसावेत ना ? (मराठ-वाडा ही संतभूमी आहे बरं का ! )

अकोल्यातल्या महार लोकांचा छळ गेली अनेक वर्षे चालू होता. आबेडकरांनी धर्मांतर केले आणि महार बौद्ध झाले. मग ते मेलेली ढोरं ओढेनात. जोहार करेनात. याचा राग सवर्णांच्या मनात सतत धुमसत राहिला. ही कामे करणाऱ्या बौद्धेतर दलिताना मात्र तुलनेने बरी वागणूक मिळत आलीय. महार लोक स्वाभिमानाने जगतात म्हणजे काय ? शिक्षण घेतात म्हणजे काय ? चागले कपडे महार-ड्यानी घालावेत ? असे प्रश्न सवर्णांना सतावू लागले. मग निमित्त मिळालं की महारांना मारहाण करायची. त्यांची गुरं मारायची. कोंबड्याना विष घालायचं. यापूर्वी तीन वेळा मोठ्या प्रमाणावर असे प्रकार घडले होते. काळाचा महिमा असा की काशिनाथ भागाजी बोर्डे या महाराला पोलिस–पाटील हे पद मिळाल. त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला गेला. ' काय दहापाच हजार हवेत ते मागून घे, पण हे पद स्वीकारू नको ' अशी लालूच दाखविली गेली. तरीही तो ऐकेना म्हणून धमकीचा प्रयोगही केला गेला. पण हा माणूस ताठ राहिला. पोलीसपाटील झाला. गेली सहा वर्षे तो या पदावर आहे. महाराची दोन–चार पोरं तर कॉलेज शिक्षण घेऊ लागली. (जगदीश दाभाडे हा त्यापैकी एकजण मुलाखतीच्या वेळेला हजर होता.) तेव्हा एकूण अशी परिस्थिती. ' या महाराना एकदा चांगला धडा शिक-वायला पाहिजे ' ही सरंजामी वृत्तीच्या सवर्णांची आकाक्षा होती.

आकाक्षापूर्तीची सधी चालून आली. नामातराच्या निमित्ताने मराठवाडा पेटू लागला होता. असाच एक दिवस...गावाचे सर्व व्यवहार नेहमीसारखे चालू असतात. संध्याकाळी कामं संपवून महार मडळी घरात निवातपणे बसलेली. हळूहळू अंधार वाढत चाललेला. महारवस्तीवर गावातल्या कुठल्याशा मिरवणुकीचे आवाज ऐकू येऊ लागतात. ' शिवाजी महाराजकी जय ' ' जय मारुतीराया ' अशा घोषणा ऐकू येऊ लागतात. कुठली बरं असावी ही मिरवणूक ?

ते लवकरच कळतं ! मिरवणूक महारवाड्याच्या दिशेने येते. आधी बुद्धमंदिराकडे वळते. बुद्धमूर्ती फोडली जाते. शक्य तेवढी नास-धूस केली जाते. मग बुद्धाच्या भक्ताकडे मिरवणूक वळते. महारवाडा एव्हाना सावध झालेला असतो. माणसं जिवाच्या भीतीने पळ काढतात आजूबाजूच्या उसाच्या वावरात लपतात. ' म्हारड्यानो, माजलायत् नाही का ? फार मिरवता ना ? या, मैदानात या...' असे आव्हान

दिले जाते. झोपड्या पेटवल्या जातात. जनावरं मारली जाऊ लागतात. आडरानाने काही महारमंडळी पळून जातात आणि पोलिस स्टेशनवर जाऊन धडकतात. पोलीसपार्टी घटनास्थळी जाते. हल्लेखोर पळ काढतात. महार-मंडळींना संरक्षणासाठी बदनापूर पोलिस-स्टेशनवर नेले जाते. तेथे तीन आठवडे ते राहतात तेथे येऊनही गाववाले त्यांना धमकावतात, 'एकदा वाचलात. पण आम्ही तुम्हाला असे वाचू देणार नाही...'

महारमंडळींना समजून चुकते की, या गावात आता आपण जिवंत राहणे शक्य नाही. आपल्याला कोणी वाली नाही. ही सर्व सदतीस कुटुंबं औरंगाबादच्या आश्रय घेतात कंगाल अवस्थेत झोपड्या उभ्या-करून समाजाच्या दयेवर राहू लागतात. मोलमजुरी करू लागतात. सरकारदरबारी आपल्याला किमान मागण्या सादर करू लागतात. त्यात कुठेतरी कायद्याचा बडगा मागे लागतो. खटल्याना तोंड देण्याची वेळ येते. सरकार त्याच्यासाठी अशी घरे बाधायला घेते की ती पावसाच्या तडाख्यात ढासळू लागतात. लवकरच सरकारने दिलेल्या घरांत ही मंडळी राहायला जातील असे म्हणतात पण सध्या ही माणसं आपल्या झोपडीतच टीचभर संसार थाटून बसलेली कुणी मोलमजुरी करतय कुणाला काम मिळालेलं नाही. कुणी उपाशी आहे. कुणाची म्हातारी अंथरुणाला खिळलीय. कुणाची मुलगी थंडीनी कुडकुडून मरतीय...तरीही ठाम निर्णय आहे गावाकडे परत न जाण्याचा. कारण गाव ही त्याच्यासाठी मृत्यूची गुहा बनलीय.

या उद्ध्वस्त माणसाची मुलाखत घेऊन निघालो. समोरच एका जुन्या इमारतीचे भग्न अवशेष दिसले. जुळ्या भावंडासारख्या समोरा-समोर उभ्या असलेल्या त्या झोपडपट्टीकडे आणि भग्न इमारतीकडे पाठ फिरवली आणि सतभूमीतून चालू लागलो. एका नव्या लढ्या-साठी ती भूमी पुन्हा एकदा सज्ज होऊ लागली होती. □

---

# एका कुटुंबातील दोन भाऊ एक नामांतरवादी एक नामांतरविरोधी

---

मराठवाड्यातील बाधव नामातराच्या प्रश्नावर एकमेकाविरुद्ध उभे ठाकले आहेत...हे वाक्य अलंकारिक अर्थाने तर खरे आहेच; पण अगदी दोन सख्ख्या भावाबाबतही खरे आहे! सुभाष लोमटे आणि मोहन देशमुख हे ते दोन भाऊ होय! दोघाचीही आडनावे वेगळी कशी असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. पण एक जण दत्तक गेल्याने त्याचे आडनाव बदलले आहे एवढेच. अडनावाप्रमाणेच आता विचारही वेगळे झाले!

तर हे दोन सख्खे भाऊ. एकमेकाच्या विरुद्ध युक्रादचा कार्यकर्ता असणारा सुभाष लोमटे हा नामातरवादी विद्यार्थी-नागरिक कृति-समितीचा संघटक आहे, तर मोहन देशमुख नामांतरविरोधी विद्यार्थी कृतिसमितीचा संघटक आहे. दोघांच्या मुलाखती घेण्यासाठी त्याच्या घरी गेलो. आत सुभाष लोमटे आपल्या काही मित्रासमवेत बसलेला. मोहन देशमुख बाहेर गेलेला. घरातलं वातावरण इतक आदोलनमय की, एक छोटी मुलगी तेथे येऊन घोषणा देते, 'मराठवाडा विद्यापीठ झिंदाबाद.' मग कोणीतरी म्हणतं, 'अगं आंबेडकराचं नाव विसरलं' पण ती महावस्ताद! ती फक्त 'मराठवाडा विद्यापीठ'च म्हणणार! त्यावर कोणाची तरी कॉमेंट. 'हा, तुला मोहन काकानी हे शिकवून ठेवलेलं दिसतय!' त्या निरागस छोकरीला सगळ्याचीच गमत वाटत असते या प्रश्नावर गंभीर होण्याचे तिचे वय नसते. 'बाळपणीचा काळ सुखाचा' या विषयावर आम्ही शाळेत असताना हजार वेळेला कोरून कोरून लिहिलेल्या निबंधाचे या प्रसंगाने अवघ्या दोन मिनिटात सार्थक झाले, असे तेव्हा वाटून गेले!

तर या दोन भावाच्या वेगवेगळ्या मुलाखती घेतल्या. दोघांकडून दोन बाजू ऐकल्या. त्यांच्या मुलाखतीमधील काही मुद्दे इतर मुलाखतीत येऊन गेलेले असल्याने ते वगळून त्याच्या मुलाखती थोडक्यात अशा–

सुभाष लोमटे यानी सांगितले, 'मेडिकलच्या जागांचा प्रश्न व इतरही अनेक प्रश्न सोडवण्यासाठी विविध विद्यार्थिसंघटनाची एक कृती समिति तयार झालेली होती. या समितीत आज नामांतरविरोधी असणारे अनेकजण होते. या समितीच्या सभेत डॉ. आबेडकराचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्याची सूचना केली गेली. सर्वांनीच याला मान्यता दिली, हे लक्षात घ्यायला हवे. पण नंतर मग काहीनी ही भूमिका बदलली! आहे की नाही गंमत?

'आंबेडकरांचे नाव विद्यापीठाला द्यायला काय हरकत आहे? त्याचे नाव मूळ नावात जोडले गेले तर ते केव्हाही गौरवास्पद आहे. पूर्वी अशी नावे देण्याची प्रथा नव्हती. पण आता ती रूढ झाली आहे. मग व्यक्तिवाचक नावे देण्याच्या सामाजिक चौकटीत दलितांना आपल्याही नेत्याचे नाव दिले जावे असे वाटणे स्वाभाविक नाही का? हे नाव देण्याऐवजी दुसरे मोठे स्मारक करू, असे म्हणणे दांभिकपणाचे आहे. जे नामातरविरोधक हा पर्याय सुचवतात त्याना मी प्रामाणिक मानले असते. पण केव्हा? जर त्याना ही कल्पना पूर्वीच सुचली असती तर. पण आधी ही कल्पना त्यांच्या डोक्यात आली नाही आणि आजच त्याना ती सुचतीय यावरून ते कितपत प्रामाणिक आहेत हे सिद्ध होते!

'नामातरविरोधक खोट्या प्रश्नावर लढा देत आहेत, हे उघड आहे. नामातराचा प्रश्न, राखीवजागा आणि सवलती यांच्याशी निगडित केला गेला तो यामुळेच. नामातरविरोधकाच्या पुस्तिकेत त्यानी बराचसा भर विकासावर दिलाय पण दलिताना तरी विकास नकोय का? दलितांवर खोटे आरोप केले जातात. नागरी संरक्षण कायद्याचा दुरुपयोग दलित करतात ह्या आरोपात तथ्य नाही. तशी काहीच अपवादात्मक उदाहरणे असतील पण याचा दंगली घडवण्यासाठी उपयोग करायचा? जाळपोळीचं उत्तरदायित्व हे लोक घेत नाहीत पण जाळपोळ करणारे यांच्या मीटिंगला हजर असतात याचा अर्थ काय? १९७४ च्या मोर्चात दगडफेक झाली म्हणून आजचे एक नामातरविरोधी नेते उपोषणाला बसले होते. पण आज लोकाना जिवंत जाळले गेले तेव्हा तुम्ही काय केलेत? दलितावरचे

अत्याचार पाहिले तर दलित पँथरचा स्फोट समजून घ्यायला हवा. त्यांच्या शिव्यांपाठीमागचा राग लक्षात घ्यायला हवा.'

युक्रादच्या या आदोलनातील भूमिकेबद्दल लोमटे म्हणाले, 'युक्राद या आदोलनात पहिल्यापासून आहे. कृतिसमितीच्या स्थापनेतच युक्रादचा सहभाग होता. हा केवळ नावाचा प्रश्न नसून सामाजिक प्रश्न आहे असे आम्ही मानतो. जास्तीत जास्त दलितेतरानाही कृतिसमितीत सामील करण्याचा प्रयत्न आम्ही सतत करत आहो.'

मोहन देशमुख आणि त्यांचे मित्र सुरेश अवचार यांनी आपली नामांतरविरोधी भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, 'नामांतराची सूचना विद्यार्थी कृतिसमितीत आली होती. तेव्हा आम्ही त्याला मान्यताही दिली होती. पण नतर वातावरण बदलले आणि आम्हाला भूमिका बदलावी लागली. दलित पँथरने घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे वातावरण बदलले. पँथरवाले म्हणू लागले की, बाबासाहेबाचे नाव देणारे तुम्ही कोण ? पँथरने बौद्ध विद्यापीठाची मागणी केली. विद्यापीठातल्या जमिनी आमच्या ताब्यात असाव्यात, कर्मचारी वर्ग दलित असावा, सर्टिफिकेटस्वर बाबासाहेबाचा फोटो असावा अशा मागण्या ते करू लागले. नादेडमध्ये सवर्ण मुलीना त्रास देणे, शिवीगाळ करणे असे प्रकार झाले. यातून जातीयतेचे वातावरण वाढू लागले. माळीसमाजाने सावतामाळी याचे, तर मुस्लिम लोकानी मौलाना आझाद याचे नाव विद्यापीठासाठी सुचवले. अशा परिस्थितीत आम्हाला आबेडकराचे नाव देण्याला विरोध करावा लागला. सुमारे १८ वर्षे रूढ असलेले नाव बदलायची गरज काय असाही प्रश्न निर्माण झाला. 'मराठवाडा विद्यापीठ' हेच नाव कायम राहायला हवे. आमचा विरोध आबेडकरांच्याच नावाला आहे असे नाही तर कोणाचेही नाव देण्याला आमचा विरोधच राहील. दुसरे असे की, नाव बदलण्याने असे काय होणार ? आर्थिक वा सामाजिक पद्धतीने दलिताच्या विकासाचा प्रयत्न करायला हवा. त्याला आमचा विरोध नाही. आम्हा नामातर विरोधकापैकी मोहन देशमुख आणि सुधाकर सोनावणे यांनी पूर्वी दलितांच्या शिष्यवृत्तीवाढीसाठी झालेल्या आदोलनाला सक्रिय पाठीबा दिलेला होता, हे लक्षात घ्या. तेव्हा आम्ही दलिताच्या कट्टर विरोधी आहोत असे म्हणणे खोटे आहे. डॉ. आबेडकर याचे मोठेपण आम्हाला मान्य आहे आणि त्यामुळे त्यांच्या एखाद्या स्मारकासाठी काम करायलाही आम्ही तयार आहोत पण मराठवाड्यातल्या जनतेला डावलून कोणताही निर्णय घेतला जाणे आम्हाला मान्य नाही. या प्रश्नावर नामातरविरोधी निवडणुकीत उतरण्याचीही शक्यता आहे.'

'तुम्ही लोकशाही पद्धती मानता ना ? मग ६ डिसेंबरचा मोर्चा अडवणार, बसेस अडवणार अशा घोषणा कशा करता ?'

'या गोष्टी आम्ही करणार नाही. तुमचा चुकीचा समज आहे. आम्ही तसे म्हटलेलेच नाही. आमचा लढा लोकशाही व शांततामय पद्धतीनेच आहे. ६ डिसेंबरला आम्ही मराठवाडा बंद ठेवणार आहोत. औरंगाबादमध्ये आमचा वेगळा मोर्चा काढणार आहोत. कारण आम्हालाही आमचे मत मांडण्याचा अधिकार आहे.'

थोडक्यात, नामातरवादी आणि विरोधी दोघांचाही शाततापूर्ण सविनय सत्याग्रह असणार आहे. सगळेच लोकशाही मानतात. असे असेल तर उत्तमच. दोन्ही बाजूंकडून काही पथ्ये पाळली जाणे आवश्यकच आहे. खरे काय ते ६ डिसेंबरलाच दिसणार नाहे. ☐

---

# "सगळ्यांना माझी विनंती आहे की त्यांनी औरंगाबादला न येता...."

## —बापूसाहेब काळदाते

शनिवारी सकाळी औरंगाबादचे माजी खासदार डॉ. बापूसाहेब काळदाते याची भेट घ्यायचं ठरवलं होतं—दैनिक 'मराठवाडा'चे सपादक अनंतराव भालेराव याचं घर आणि बापूसाहेबाचं घर एकमेकाला लागूनच आहेत. सकाळी गेलो तेव्हा घराबाहेर एक पाढरी अॅम्बॅसेडर उभी होती. टपाला तांबडा दिवा आणि बॉनेटवर तिरंगी ध्वज. गाडीचा शोफरही खाकी वेषांत. निश्चितच बापूसाहेबाकडे कोणी तरी 'सरकारी पाहुणे' आले होते. त्यामुळे त्याच्याकडे जाण्यापूर्वी अनंतरावांकडे गेलो. आदल्या दिवशी नामातरविरोधाची आपली भूमिका जोरदारपणे मांडणारे अनंतराव नातवंडामध्ये रमले होते. त्यांच्याशी पुन्हा एकदा थोडी फार चर्चा झाली. अनंतरावाशी बोलताना कंटाळा कधी येतच नाही. त्यांच्या बोलण्यात आवेश आणि अभिनिवेशही असतो. आणीबाणीतील अनंतरावाची कामगिरी माहीत असल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक निराळीच धार वाटते. भरपूर उंची आणि रुंदी असलेला हा मनुष्य वागण्याबोलण्यात मात्र अतिशय सौम्य. सर्व प्रकारचे साहाय्य करण्यास सदैव तयार, आपलं कोणतंही काम हा माणूस सहज करून देईल असा विश्वास; अनंतरावाबरोबरच्या पहिल्या भेटीतच वाटला आणि नंतर तो अनुभवातून दृढमूल झाला.

विधानपरिषदेचे सभापती रा. सु. गवई बापूसाहेबाकडे आले होते. आम्ही अनंतरावाकडून बाहेर पडलो आणि त्याचवेळी गवईसाहेबाची पाढरी अँबॅसेडर मराठवाडी धुरळा उडवत निघून गेली. निश्चितच राजकारणावर, निवडणुकावर, बापूसाहेबाच्या उमेदवारीबद्दल गप्पा झाल्या असणार आणि हो, मराठवाडा विद्यापीठ नामातराच्या नियोजित सत्याग्रहाबद्दलही !

बापूसाहेब कोचावर बसून काही तरी वाचत होते. समोरच्या बाजूला तीन-चार माणसं बसली होती. आम्ही गेल्याबरोबर बापूसाहेबानी वाचणं बंद केलं. आमचा उद्देश आदल्या दिवशी फोनवर सागितला होताच. त्यामुळे प्रास्ताविकात फारसा वेळ न दवडता बापूसाहेबानी बोलायला सुरुवात केली—

'खरं म्हणाल तर हे 'नामातर' आहे असं मला वाटतच नाही. हे फक्त नाव जोडणं आहे, 'मराठवाडा विद्यापीठ' या मूळ नावाला 'डॉ. बाबासाहेब आबेडकर' हे नाव जोडलं जाणार आहे. पण लोकाना हा फार्म्युला काही एकदम पटला नाही. तसंच या कल्पने-

मागच्या सामंजस्याची देवाण-घेवाण व्हायलाही पुरेसा अवधी मिळाला नाही. परवा गोविंदभाईंनी 'मराठवाड्यावरील आक्रमणा'चा उल्लेख केला. पण प्रश्न आक्रमणाचा नाही, विचाराचा आहे म्हणूनच गेल्यावेळची पुनरावृत्ती होऊ नये ही जबाबदारी दोन्ही बाजूची आहे. अडचण अशी आहे की दोघंहीजण शासनाचे म्हणणे आपापल्या सोईनुसार घेतात. वरवर जरी मराठवाड्याची अस्मिता दिसत असली तरी खालच्या पातळीवर, कुठेतरी दलित-दलितेतरांचा झगडाही या संघर्षात दडलेला आहे. ज्याची घरं जळाली किंवा जाळली गेली त्यांचा मराठवाड्याच्या अस्मितेशी काहीच संबंध नाही का? म्हणून पूर्वीच्या Set arguements नी हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी सामाजिक प्रबोधनाची गरज आहे. घडल्या प्रकाराचे खापर कोणावरही फोडता येईल. पण जे घडलं ते माणुसकीच्या दृष्टीने चांगलं घडलं नाही हे मात्र निश्चित! म्हणूनच या वेळी खेड्यातल्या दलितांची हमी तिथल्या सवर्णांनीच घेतली पाहिजे, शातता आणि अहिंसेचा आग्रह नामांतरवाद्यांपेक्षा विरोधकांनी जास्त धरावा, तसा तो जाहीरही करावा, म्हणजे दलितांना दिलासा मिळेल.'

: गेले काही दिवस मी मराठवाड्याच्या निरनिराळ्या भागामध्ये हिंडत आहे, अनेकांशी बोलत आहे आणि मला विश्वास आहे की, अजूनही माणसे या सबंध विषयाचा विचार करू शकतील. त्यासाठी दलित विरुद्ध बिगर दलित असा प्रश्न न करता सर्वांचा सहभाग हवा. आम्ही कोणाही दलिताला हात लावणार नाही अशी हमी नामांतरविरोधकांनी दिली पाहिजे, परिस्थिती अजूनही स्फोटक आहे, पण दोन्ही बाजूनी समंजसपणा दाखवल्यास तो टाळता येईल.

: ६ डिसेंबरचा सत्याग्रह शांततेने पार पडला तर पुढील चर्चेसाठीही अनुकूल वातावरण निर्माण होऊ शकेल. त्यामुळे सध्या माझ्या डोक्यात लोकसभा निवडणुकीचा विचारही नाही, आधी ६ डिसेंबर शांततेत कसा जाईल याचा मी सतत विचार आणि प्रयत्न करत आहे.

: कित्येक वेळा चळवळ कुठलीही असली तरी त्याचा उपयोग जुने झगडे, जुने सूड काढण्यासाठी केला जातो. हे यावेळी होता कामा नये. मतभेद काहीही असले तरी दलिताचं आम्ही संरक्षण करू असं सवर्णांनी म्हटलं पाहिजे.

: अर्थात सध्या मी नामांतरवादी किंवा विरोधक यांच्याशी फार चर्चा करत नाही. कारण त्यानी त्यांच्या भूमिका पक्क्या केल्या आहेत आणि त्या सोडायला ते तयार नाहीत. कोणत्याच बाजूशी बांधील नसलेल्या तटस्थांशीच मी सध्या बोलतो आहे. सामान्य लोकानाही मी सांगत असतो की, यावेळची निवडणूकही महत्त्वाची आहे. इंदिराजी सत्तेवर आल्या तर सगळं त्यांच्या लहरीनुसार सुरू होईल आणि मग कोणत्याच बाजूला अन्यायाबद्दल तक्रारही करता येणार नाही. शेवटी सत्ता आणि समाजपरिवर्तन परस्परांपासून संपूर्णपणे तोडून चालणार नाही. सामाजिक परिवर्तन निव्वळ सत्तेमुळे होत नाही हे खरे आहे, पण सत्तेच्या मदतीशिवाय ते पूर्ण होत नाही हेही आपण ध्यानात घेतलं पाहिजे आणि त्यासाठी लोकशाही राज्यपद्धतीची आवश्यकता असते.

: विद्यापीठ नामांतराचा प्रश्न राज्यपातळीवर हाताळणे ठीक आहे, पण लोकसभा निवडणुकीचा तो issue होऊ नये. कारण यावेळी त्या निवडणुकीचे प्रश्न फार निराळे आणि मूलभूत आहेत. मी तर लोकांना सागतो की इथे तुम्हाला या प्रश्नावर मोकळेपणाने बोलता यावं, बोलण्याचे स्वातंत्र्य मिळावं म्हणून तुम्ही लोकसभेत योग्य माणूस पाठवा.

: ६ डिसेंबरला काहीही जरी घडलं तरी नुकसान मराठवाड्याचंच होणार आहे आणि त्याचे परिणामही मराठवाड्यालाच भोगावे लागणार आहेत. म्हणून सर्व राजकीय व बिगरराजकीय पक्ष-संघटनानी याबाबतीत जागरूक राहिलं पाहिजे. महाराष्ट्राच्या विविध भागांमधून त्या दिवशी लोक औरंगाबादमध्ये येणार आहेत. त्यामुळे परिस्थितीतील धोका जास्त वाढेल. म्हणून या सर्वांना माझी विनंती आहे की त्यांनी मराठवाड्यात, औरंगाबादला न येता आपापल्या जिल्हे व तालुक्यामध्ये स्वतंत्रपणे निषेध नोंदवावा.

: शेवटी आपण याही गोष्टीचा विचार केला पाहिजे की, दलितांचा इतिहास डॉ. आंबेडकरांपासून सुरू झाला. अभिमानाने सागावं असं दुसरं कोणतं नाव आज त्यांच्याजवळ आहे? बाबासाहेबांनीच दलितांच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून दिला. आपण ही सारी भावना समजावून घेतली पाहिजे.

: शासनाने जे कबूल केलं होतं त्या दृष्टीने आवश्यक ती वाटचाल केली नाही हे कबूल केलंच पाहिजे. या सबंध विषयात काही राजकीय हितसंबंध गुंतले नसतीलच असं ठामपणे म्हणता येणार नाही. पण एक गोष्ट निश्चित की, नामांतरवाद्यांनी या नामांतरासाठी योग्य असं वातावरण तयार करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. मीही सर्वांना एकच गोष्ट पुन: पुन्हा सागत असतो– 'मराठवाड्याचं नाव जाईल अशी कोणतीही कृती करू नका.'

जवळजवळ पाऊण तास बापूसाहेब बोलत होते. त्यांच्या बोलण्यात कळकळ होती, चिंता होती. आर्जवीपणाही होता. बाहेर लोक थांबले होते. रात्री बापूसाहेबांना उस्मानाबाद भागात जायचं होतं. त्या भागातल्या लोकांशी बोलायचं होतं, ६ डिसेंबर शांततेने पार पाडण्याची विनंती करायची होती. निवडणुकीत बापूसाहेबाना शुभेच्छा व्यक्त करून आम्ही त्यांचा निरोप घेतला. □

# "आता निःपक्षपाती त्रयस्थ व्यक्तींच्या प्रयत्नामुळेच हा प्रश्न सुटू शकेल"


## –प्रा. के. रं. शिरवाडकर

प्रपाठक, इंग्रजी विभाग, मराठवाडा विद्यापीठ.


मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराची मागणी मला वाटतं, प्रथम युक्रांदनं माडली असावी. १९७५ च्या सुमाराला. नंतर लगेचच ती दलित पँथर व इतर संघटनांनी उचलली. त्यावेळी त्या मागणी-मागे कोणतं रॅशनल आणि प्रोग्रेसिव्ह रीझनिंग होतं, ते आता कळायला मार्ग नाही. आता ते मागे पडलंय. अर्थात नामातराची ही मागणी फारशी रॅशनल आहे असं मला वाटत नाही हा प्रश्न सुटला आणि नाव बदललं तर मोठं पुरोगामी पाऊल टाकल्यासारखं होणार आहे, असंही नाही. आधीच दलिताचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी मदत करणारी एखादी चळवळ मराठवाड्यात नाही. त्यातच 'एक गाव एक पाणवठा' सारखी जी पुरोगामी चळवळ नुसती रुजत होती, तिची जागा आता नामातरासारख्या निव्वळ प्रतिष्ठेच्या बनलेल्या प्रश्नानं घेतली आहे. दलितांचे कोणते प्रश्न या (नामातराच्या) चळवळीमुळे सुटणार आहेत ?

अर्थात एक गोष्ट खरी, की नामांतरविरोधी चळवळही इतकी रेटायला नको होती. विद्यापीठाचं नाव महत्त्वाचं की महात्मा फुल्यांपासून चालत आलेली सुधारणावादी चळवळ महत्त्वाची ? नामातर-विरोधी चळवळीमुळे या मूळ चळवळीवरच घाव बसणार आहे. गोविंदभाई श्रॉफ आणि अनंतराव भालेरावांचंही इथे चुकलं. अनंतराव तर माझे चागले मित्र आहेत आणि यापूर्वीपर्यंत ते मराठवाड्यातल्या पुरोगामी चळवळीच्याच मागे रहात आले आहेत. फुले-आंबेडकरांच्या ज्या विचाराला आजपर्यंत त्यानी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मदत केली, त्याचाच स्वतःच्या हातांनी असा पराभव करण्यात काय अर्थ होता ?

इथे गोविंदभाईंच्या नेतृत्वाविषयीचा एक मुद्दा मांडलाच पाहिजे. या चळवळीच्या पूर्वीपर्यंत अनेक वेळा मी गोविंदभाईंच्या बरोबर राहिलो आहे, इथे जे काही थोडं काम केलं त्यातलं बरंचसं त्यांच्याबरोबरच केलं आहे. पण आता माझ्या लक्षात असं येतंय् की गोविंदभाईंची एकंदर चळवळ ही मूलतः आणि मुख्यतः प्रादेशिक मर्यादानी जाणीवपूर्वक बाधलेली अशीच आहे; It is basically and essentially a regional movement. आम्ही काही मित्र समजत होतो, तशी ती काही व्यापक पायावरची पुरोगामी समाजवादी चळवळ नाही.

मराठवाड्याच्या अस्मितेचा जो प्रश्न गोविंदभाईंनी उपस्थित केलाय् त्या संदर्भात खरं म्हणजे त्याना असाच प्रश्न विचारायला हवाय् की मराठवाड्याच्या अस्मितेची केंद्रं नक्की आहेत तरी कोणकोणती ? त्यांनी हे एकदा जाहीरच करून टाकावं, म्हणजे पुढेमागे असा प्रश्न आलाच तर उपयोगी पडेल. वस्तुस्थिती अशी आहे, की गोविंदभाई अस्मितेबद्दल वगैरे ज्या भावनिक पातळीवर बोलतात ती, आणि ग्रामीण अस्मितेची भावनिक पातळी या दोन्ही वेगवेगळ्या आहेत. खेडोपाड्यातल्या सवर्ण नामांतरविरोधकांची भावना 'म्हारडे माजलेत, एकदा ठोकून काढायला हवेत,' इतकी सरळ आहे, आणि गोविंदभाईंची शहरी अस्मिता हे त्या ठोकाठोकीला एक निमित्त म्हणून उपयोगी पडते. गेल्या वर्षाच्या दंगलीत हेच घडलं. सवर्ण दंगलखोरानी गोविंदभाई आणि अनंतरावांना सरळ वापरलं. काँग्रेसवाल्यानीही वापरलं. म्हणजे मारणारे ते, मार खायला दलित आणि बदनाम व्हायला गोविंदभाई आणि अनंतराव. होतंय् असं की संघर्षाची भावनिक ठिणगी शहरात पडते आणि जातीयवादी गट ती उचलून खेडी पेटवतात. तिथला दलित बिचारा कारण न कळताच फुकट मार खातो. एका खेड्यात गेलो असताना एक गरीब दलित फिरता व्यापारी भेटला. तो सांगत होता की 'वर्तमानपत्रात या विषयाबद्दलची लहानशी बातमी जरी आली तरी हल्ली आमच्या पोटात गोळा उभा राहतो !'

नामातर आदोलनाच्या संदर्भात वेगवेगळ्या समाजघटकांचा विचार केला, तर असं दिसतं की मुसलमान गट–विशेषतः ग्रामीण मुस्लिम–बहुसंख्य दलितविरोधात आहेत. याचं एक कारण आर्थिक पातळीवरची असूया हेही असू शकेल. राखीव जागाच्या साहाय्यानं दलित तरुण आर्थिक प्रगती साधताना दिसतात, तेवढ्या प्रमाणात तशी संधी मुस्लिम तरूणाना मिळू शकत नाही. आणि गावात एवढं निमित्त पुरेसं असत, अर्थात अशी असूया फक्त मुसमानानाच वाटते अस नाही. इतरही सवर्णीयाना वाटते. व्यापारीवर्ग आणि त्यांची मुलं नामांतरविरोधात दिसतात. प्राध्यापकवर्गात पुष्कळ नामांतरवादी आहेत, तसे पुष्कळ उदासीनही आहेत, नामांतरविरोधी मात्र फार थोडे. विद्यार्थी मात्र बहुसंख्येने नामांतरविरोधी आहेत. राजकीय पातळीवर बोलायचं तर औरंगाबाद जिल्हा आणि एकंदरीतच मराठवाडा आजपर्यंत मुख्यतः काँग्रेसच्याच वर्चस्वाखाली असत. जागृत दलितवर्ग ही काँग्रेसनतरची दुसरी प्रभावी राजकीय शक्ती होती व आहे. आज नामातर आंदोलनाच्या निमित्तानं एकापरीनं या दोन शक्तीचीच टक्कर Confrontation घडून येतेय. कारण काँग्रेसजन बहुसंख्येनं नामातरविरोधात सक्रिय आहेत. आर्थिक-प्रादेशिक दृष्टिकोणातून पाहिलं तर असं दिसतं की नांदेड आणि परभणी हे दोन जिल्हे शेतीप्रधान आहेत, त्यामुळे तिथे जुनं फ्यूडल स्ट्रॅक्चर (सरंजामशाही समाजरचना) अजूनही भक्कम आहे. साहजिकच नामांतरविरोधाचं खरं उग्र स्वरूप तिथेच दिसतं. गेल्या वर्षीच्या दंगलीतही जास्तीतजास्त नुकसान या दोन जिल्ह्यांतच दलितांचं झालं होतं, हेही इथं लक्षात घेतलं पाहिजे.

या एकंदर चळवळीबद्दलचं एक निरीक्षण इथे नोंदवायला हवं. By and large या संपूर्ण काळात दलितांनी आपला तोल जाऊ दिला नाही. क्वचित एखादा प्रक्षोभक प्रसंग त्यांच्यामुळे उद्भवला असेल. एरवी मात्र नामांतविरोधकानीच संयम सोडला आणि वेळोवेळी दहशत निर्माण केली. आजही असं काही घडू शकेल.

आता हा प्रश्न ( Third party intevention ) निःपक्षपाती त्रयस्थ व्यक्तीच्या प्रयत्नामुळेच सुटू शकेल, असं मला वाटतं. बॅ. तारकुंडे हे असं एक नाव. अशा विविध क्षेत्रातल्या चारसहा आदरणीय व्यक्तीनी दीर्घकाळपर्यंत इथं राहून सर्वांना समजावून घेणं आणि मार्ग सुचवणं, हाच उपाय यावर दिसतो. एरवी संबंधिताची ज्वलंत समस्या आणि बाहेरच्यांचा कुतूहलाचा विषय अशी या प्रश्नाची अवस्था झाली आहे ! □

# पुरोगामी चळवळीची पिछेहाट

· शिरीष सहस्रबुद्धे

मराठवाडा विद्यापीठाचं नामांतर आणि तदनुषंगिक इतर प्रश्नाचा मागोवा घेण्यासाठी औरंगाबादला गेलो, तो विषण्ण होऊनच परतलो.

कारणं अनेक झाली. नुसता रिपोर्टिंगचाच उद्देश ठेवून गेलो असतो, तर असं व्हायचं प्रयोजन नव्हतं. या समस्याची माडणी करणं, विश्लेषण वगैरे करणं यात तसं अवघड काही नव्हतं. खरी गुतागुत उद्भवली आणि खिन्नता आली, ती ‘ पुढे काय ?’ हा प्रश्न समोर आल्यानंतर. नामांतरवादी आणि नामातरविरोधक अशा दोन स्पष्ट फळचा आणि त्याच्या भूमिका माडणं फारच सोपं होतं, पण त्यातली कुठलीही एक बाजू पूर्णपणे अथवा अंशतःसुद्धा पटवून घेणं त्रासाचं ठरलं. मुद्दे बिनतोड आणि युक्तिवाद चलाख असले, तरी त्याचा अर्थ लगेच ते सर्वमान्य होतात, असा नाही. एखादा कट्टर नामातरवादी किंवा कडवा नामांतरविरोधक तुम्हाला भेटतो आणि आपल्या कन्व्हिक्शन्स (धारणा ?), तळमळ, जरूर तो ऐतिहासिक तपशील आणि मधूनमधून आकडेवारी व कागदोपत्री पुराव्याद्वारा होणारा तर्कशुद्धतेचा आभास या सगळयाच्या साहाय्यानं आपली कैफियत तो तुम्हाला अशी ऐकवतो की, एकाचं ऐकताना या प्रश्नाला दुसरी बाजू असावीच असा तुमचा ग्रह व्हावा. त्यात भर तुमच्या, कळत–नकळत बरोबर घेऊन गेलेल्या, ग्रह–पूर्वग्रहाच्या गाठोडयाची त्यातही पुण्या–मुबईकडे नामातरविरोधाची फळी जवळजवळ अस्तित्वात नाहीच. उलट नामातरवाद्यांना डॉ बाबा आढावासारखं प्रभावी आणि प्रसिद्ध नेतृत्व लाभलेलं. ‘ लॉंग मार्च ’-सारखे, यापूर्वी वेगळया असोसिएशन्स असलेले शब्द, हवा निर्माण करण्यासाठी दक्षतापूर्वक वापरले गेलेले गेल्या वर्षीच्या दंगलीमुळे लोकाच्या सहानुभूतीचं (थोडंसं का होईना, पण) झुकतं माप नामातरवाद्याच्या पारडयात, तर नामांतरविरोधक त्याच दंगलीमुळे बदनाम झालेले. दोन्ही बाजूकडून रोज नवी आक्रमक निवेदनं. आगामी निवडणुकीच्या संदर्भात या धुमसत्या तेढीचा राजकारण्यां-कडून होणारा थड हिशेब.

या सगळया गलक्यातून बाहेर पडून आता मी थोडं तटस्थपणे त्याच्याकडे पाहू शकतो आणि माझ्या लक्षात येतंय की, या प्रश्नाच्या दोन्ही बाजूंचा तत्त्वाभासाचा शेंदूर खरवडला की खाली एकच गोष्ट उरते–फॅनॅटिसिझम, एकातिकता. दोन आत्यतिक आग्रही–एकातिक–अशा मनोवृत्तीमधला हा प्रतिष्ठेचा संघर्ष आहे. नामातराचा प्रश्न हा तत्त्वाचा वैचारिक संघर्ष नाही, तो जातीय आहे तोही मर्यादित अर्थानेच. किंबहुना त्यातला विद्यापीठाच्या नावाचा प्रश्न आता उघडपणे गौण ठरला आहे. तेव्हा हा लढा नामांतराचाही नाहीच. नामांतर हे निमित्तमात्र. दोन्ही बाजूंच्या अध्वर्यूंचा अहंकार खरा. दोन्ही बाजूंच्या अनुयायांची कडवी आणि आंधळी निष्ठा खरी. ‘ (दुसऱ्याला) मोडू पण वाकणार नाही, ’ हा बाणा खरा. मग या सगळया गुत्याला लेबल्स कुठलीही लावा.

असं एक लेबल आहे, ते मराठवाडयाच्या अस्मितेचं. दुसरं त्याच्या विरोधात आहे, ते सामाजिक न्यायाचं. मानवी हक्काचं. दलितमुक्तीचं. किंबहुना मानवमुक्तीचं वगैरेसुद्धा. आपण शब्द खूप सैलपणे वापरतो. त्यालाही हरकत घेतली नसती-त्यांच्यामागे भलतेच अर्थ दडलेले नसते तर. मराठवाडयाची अस्मिता हे एक बहुचर्चित प्रकरण. अशी प्रादेशिक अस्मिता कोणत्या मर्यादेपर्यंत समर्थनीय ठरते हा प्रश्न तर आहेच, पण एकंदर आदोलनात या अस्मितेच्या प्रश्नाला वजन किती हाही प्रश्न तपासण्याजोगा आहे. अस्मिता प्रकरण नामातरविरोधक नेतात तसं चेष्टेवारी नेण्यासारखं नाही, कारण औरगाबादमधून पत्रकं आणि पुस्तिका काढून अशा अस्मितेचं ऐतिहासिक आधारासह स्पष्टीकरण व समर्थन करणाऱ्या वयोवृद्ध गोविंदभाई श्रॉफना तुम्ही थट्टावजा प्रतिआव्हानं देऊन बाजूला काढू शकाल, पण खेडोपाडयात ज्यानी दलिताच्या झोपडया पेटवल्या आणि इतर अत्याचार केले, त्याच्या लेखी मराठवाडयाची अस्मिता म्हणजे मराठयाचीच अस्मिता होत असते. अशा शब्दच्छला-पेक्षा शस्त्रबळावर जास्त विसंबून राहणाऱ्याची ना थट्टा करता येते, ना त्याच्यावर काही कारवाई करता येते. तेव्हा एकीकडे भावनिक एकातिकता आणि दुसरीकडे मराठवाडयात फोफावणारा मराठा जातीयवाद असा दुहेरी अर्थ घेऊन वावरणारी ही अस्मिता नामक ‘ मिथ् ’ म्हणजे नामातरविरोधकाच्या फॅनॅटिसिझम्चं एक नामी प्रतीकच. मराठवाडा नागरिक समितीतर्फे गोविंदभाई श्रॉफ, बाबा-साहेब परांजपे, बाळासाहेब पवार इत्यादींनी ‘ मराठवाडा विद्यापीठच का ?’ ही एक पुस्तिका प्रसिद्ध करून नामातरविरोधी बाजू माडली आहे मराठवाडयाची वेगळी अशी अस्मिता जोपासून तिची ‘ मिथ् ’ बनविण्याचा पद्धतशीर प्रयत्न या जाणत्या मडळींनी पुस्तिकेतली चार–साडेचार पानं खर्चून कसा केला आहे, हे मुळातूनच पाहण्या-सारखं आहे. ‘ मराठवाड्याचा इतिहास, तेथील संत व कवी, तेथील जनतेच्या समाईक व्यथा व त्याचा समाईक त्याग, त्यासाठी करावा लागलेला संयुक्त सघर्ष व त्यातून मिळविलेले यश या सगळयातून मराठवाडयाची अस्मिता निर्माण झाली, त्याचे व्यक्तिमत्त्व घडत गेले व विकसित होत गेले ’ असं निवेदन अस्मितेबाबत त्यानी केलं आहे. प्रश्न आहे तो असा की, मराठवाडा ही प्रामुख्याने भौगोलिक व व्यावहारिक संज्ञा नसून भावनिक सज्ञा आहे की काय ? मराठ-

वाडा हा भूप्रदेश एकोणीस वर्षांपूर्वी उर्वरित महाराष्ट्रात विलीन अथवा एकरूप झाला की, जनता पक्षातर्गत घटकांसारखा घाटावरच्या आणा-शपथापुरता एकत्र आला ? तो स्वेच्छेनं आणि विनाअट वगैरे विलीन झाला असेल, स्वभाषिकांमध्ये मिळून जाण्याची ओढ त्यामध्ये असेल, तर अजूनही त्याची स्वतंत्र 'आयडेन्टिटी' राखण्याचा खटाटोप कशासाठी ? महाराष्ट्रावेगळी अशी मराठवाड्याची अस्मिता कशी आणि किती मर्यादेपर्यंत असू शकते ? मराठवाडा हा मागास प्रदेश असल्याची व्यथा यामागे असेल, तर त्यावरचे तोडगे आर्थिक आणि राजकीय अभिक्रमात सापडतील, की भावनिक प्रक्षोभामध्ये ? तथापि या देशात वैचारिक/तात्त्विक आवाहनापेक्षा भावनिक आणि जातीयवादी आव्हानच अधिक परिणामकारक ठरतं, ही वस्तुस्थिती या चळवळीचे एकांतिक शहरी नेते आणि त्याचे एकातिक ग्रामीण अनुयायी यांच्या अचूक पथ्यावर पडते. त्यात पुन्हा सनदशीर, शब्दशूर नेते वेगळे आणि प्रत्यक्ष व ज्वलंत कृतीवरच विश्वास ठेवणारे नेते वेगळे–आणि तरीही, मर्ढेकर स्वातंत्र्यकालीन धार्मिक दंगलीच्या संदर्भात म्हणाले होते तशी, 'परि हुल्लडीचा नियंता । कोणी नाही ।।' ही अवस्था आहेच. उद्या सहा डिसेंबरच्या सुमाराला काही घडलं तर ही सगळी नेतेमंडळी हात झटकून नामानिराळी होणारच आहेत. जाळणारे जाळतील, जळणारे जळतील. जबाबदार कुणी नाही.

नामातराला प्रामाणिक विरोध असणे मी समजू शकतो. याच अंकातली श्री. अनंतराव भालेराव याची मुलाखत समंजस विरोधाचा एक नमुना म्हणून पाहण्यासारखी आहे. अशा विरोधामागे विविध घटकांचा प्रभाव असू शकेल. सहवासानं आपलेपणा निर्माण होतो, तो 'मराठवाडा विद्यापीठ' या नावाबद्दल असणं शक्य आहे. विद्यापीठाशी काही ना काही मार्गानं संबधित असणाऱ्यांची त्याच्याशी व त्या नावाशी अॅटॅचमेंट असणार. सामान्यजनामध्ये एकूणच परिवर्तनाविषयीची नाराजी असणं स्वाभाविक. आपले लोक प्रामुख्यानं जैसे थे वादी आहेत आणि (कुठल्याही क्षेत्रातला) एखादा बदल अगदीच अपरिहार्य झाल्याशिवाय आपल्याकडे स्वीकारला जात नाही, हाच न्याय विद्यापीठ नामातराला लागू झालेला असणंही समजून घ्यायला हवं. पण खरी अडचण येते ती विरोधाचं रूपातर दुराग्रहात व्हायला लागतं तेव्हा. श्री. अनंतराव भालेरावांच्या मुलाखतीकडून श्री. गोविंदभाई श्रॉफ याच्या मुलाखतीकडे किंवा 'व्हाय मराठवाडा युनिव्हर्सिटी अलोन ?' या मूळ इंग्रजी पुस्तिकेकडून तिच्या सुधारून वाढविलेल्या मराठी आवृत्तीकडे आपण गेलो, तर उत्तरोत्तर वाढती एकातिकतेची धार बोचल्यावाचून रहात नाही. 'मराठवाड्याचं नुकसान हे सगळ्या महाराष्ट्राचं नुकसान आहे, हे समजल्यावाचून ते थांबणार नाही,' असा इशारा गोविंदभाईंनी मुलाखतीच्या अखेरीस दिला खरा, पण मराठवाड्याचा हा प्रश्न सगळ्या महाराष्ट्राचाच आहे, हे मान्य करायला मात्र त्याची तयारी नव्हती. तिथे आक्रमणाची आणि युद्धभूमीची भाषा येते. ही तर्कविसंगती की दुटप्पीपणा ! त्याच्या हिशोबानुसार मग मराठवाड्याच्या मागासलेपणाचा प्रश्नही मराठवाड्यातल्याच लोकानी स्वतंत्रपणे सोडवायला नको का ? स्वयंपूर्णतेच्या, स्वायत्ततेच्या या कल्पना चमत्कारिकच म्हणायला पाहिजेत. गोविंदभाईंसारख्या समाजकार्यात हयात घालवलेल्या कार्यकर्त्याला या गोष्टी एरवी लक्षात आल्या नसत्या, असं नाही पण दुर्दैवानं या विषयापुरती विवेकशक्तीची सर्व कवाडं त्यानी त्याच्या सहकाऱ्यांनी बदच करून घेतलेली आहेत, हे त्याच्या बोलण्यालिहिण्यावरून जाणवतंच. तिथं आता देवाणघेवाणीला वावच उरलेला नाही. असे एकान्तिक नेते आणि अविवेकी, उसळत्या (जातिवंत !) रक्ताचे, क्वचित अल्पशिक्षित (आणि अल्पसंस्कृतसुद्धा !) अनुयायी याच्या मिलाफातून हिंसाचारापलीकडे काय काय निष्पन्न होणार आहे ?

## नामांतर आघाडीवरचे चित्र

नामातरवाद्याच्या आघाडीवरचं चित्रही यापेक्षा फार वेगळं आणि समाधानकारक आहे असं नाही. या प्रश्नाला आज आलेलं अवाजवी महत्त्व प्राप्त करून देण्यात त्यांच्या एकातिकेतचा वाटा कमी नाही. दलिताच्या एकूण समस्येबद्दल हार्दिक सहानुभूती बाळगणाऱ्या माणसालाही मराठवाड्यातल्या युयुत्सू दलितांचा या प्रश्नाबाबतचा अभिनिवेश समजावून घेणं जड जातं. आपल्याला पाठिंबा देऊ न शकणाऱ्या सर्वच व्यक्तीची संभावना 'प्रतिगामी, संकुचित, जातीयवादी, पूर्वग्रहदूषित,' इत्यादी शेलक्या विशेषणानी करून मोकळे होण्याची आत्मसतुष्टता नामांतरवादी दाखविणार नाहीत, अशी आशा करून मला हे नमूद केलच पाहिजे, की नामातर ही आपल्या कोणत्या स्वरूपाची निकड आहे (उदा. सामाजिक की भावनिक ?) याचा समाधानकारक व बुद्धिगम्य खुलासा आजपर्यंत नामातरवाद्याना करता आलेला नाही. मराठवाड्यातल्या जनतेला ही गरज ते पटवून देऊ शकले नाहीतच, तथापि तिथल्या वा बाहेरच्या नि:पक्षपाती विचारकानाही (ज्यात सामान्य लोकही आलेच.) नामातरानं दलित जनतेचं नक्की कोणत्या प्रकारचं हित साधाणार आहे, स्पष्ट झालेलं नाही. नामातराचा ठराव होण्यापूर्वीही हीच अवस्था होती आणि आज हा प्रश्न दुसऱ्यादा पेटत असतानाही तीच आहे. साहजिक आज ही मंडळी 'आमचा संघर्ष नामातर विरोधकाशी नाहीच, तर ठरावाची अमलबजावणी न करणाऱ्या सरकारशी आहे,' अशी भूमिका घेतात. युक्तिवाद म्हणून हे ठीक. अ ला व शी भाडायचं नाही, पण अ आणि क च्या वादात ब चे हितसंबंध गुतल्यामुळे तो अगावर धावून यायच्या पवित्र्यात असेल तर काय करायचं ! बहुसंख्याकाचा पाठिंबा नसताना, किंबहुना विरोध असताना, एखादा मुद्दा, एखादी मागणी तुम्ही किती मर्यादेपर्यंत आणि कुठल्या मार्गानं रेटू शकणार याला मर्यादा आहेत. (सुदैवानं बहुसंख्य जनता नामातरविरोधात असल्याची वस्तुस्थिती तरी नामातरवादी नेते मान्य करतात.) आता या बहुसंख्याकाशी संघर्ष छेडणं जरूरच असेल, तेव्हा तो अशाच मुद्द्यावर छेडायला नको का की जेणेकरून आजवर नागवल्या गेलेल्याच्या पदरात काहीतरी पडेल ? विद्यापीठ नामांतरातून असं काही घडणार आहे का ? यातून फार तर दलितांची अस्मिता चेतवली जाईल, पण आर्थिक सामर्थ्यावाचून ती किती दिवस तग धरून राहील ? आर्थिक पाठबळ आणि निव्वळ अस्मिता वेगवेगळे काढणं कितपत शक्य आणि व्यवहार्य आहे ? हे आंदोलन संपल्यानंतरही जर गावोगावच्या दलित भूमिहिनाना मोठ्या प्रमाणावर सवर्णांच्या शेतीवर मजुरी मागायला जावं लाग-

णार आहे, तर त्या उभयतांत भावनिक कारणांनी वितुष्ट आणणे म्हणजे एकीकडे त्या दलिताचा स्वाभिमान जागवतानाच दुसरीकडे त्याला उपासमारीच्या किंवा जाळपोळीच्या तोंडी मरायला सोडण्या-सारखंच आहे, असं मला वाटतं. हे चित्र आदर्श नाही, रामराज्याचं नाही, पण वास्तव आहे तर तसं उमजून वागायला काय हरकत आहे ? या संदर्भात मी अनेकांच्या मुलाखतीत त्यांच्यासमोर पाच प्रश्न ठेवत होतो–

एक : गेल्या वर्षीच्या दंगलीनंतर पोलिसांच्या संरक्षकतेचा भरवसा वाढला आहे काय ?

दोन : सवर्णांच्या पवित्र्यात सदसद्विवेकाची टोचणी लागल्याने अथवा अन्य कारणाने पूर्वी पेक्षा अधिक सहिष्णुता आली आहे काय ?

तीन : खेडोपाडीच्या गरीब व असंघटित दलितामध्ये प्रतिकार क्षमता निर्माण झाली आहे काय ?

चार : मागच्या दंगलीची पुनरावृत्ती यापुढील काळात होणार नाही अशी हमी वाटण्याजोगी अन्य एखादी तरी गोष्ट घडली आहे काय ?

आणि पाच : या सर्वांची उत्तर नाही अशी असल्यास सहा डिसेंबरचं आंदोलन आपण कशाच्या आधारावर उभारणार आहात ? असंघटित व असुरक्षित दलिताच्या जीववित्ताची काय हमी आपण देऊ शकाल ?

बहुसंख्य–किंबहुना सर्वच–मंडळींनी पहिल्या चार प्रश्नाची उत्तरं नकारार्थी देऊनही पाचव्याचं ठाम व साधार उत्तर देण्याबाबत असमर्थता दाखविली. जहाल मंडळीची प्रतिक्रिया 'जे नामर्द असतील, प्रतिकारक्षम नसतील, ते मरतील. अशांनी मेलंच पाहिजे,' अशी होती, असं समजलं. यातल्या उथळ बेजबाबदारपणावर भाष्य कर-ण्याची जरुरी नाही. काहींनी संरक्षणाची जबाबदारी शासनाची असल्याचा कायदेशीर हवाला दिला, तथापि त्यातला पोकळपणा त्यानाही जाणवला असेल. 'आम्ही शांततामय सत्याग्रहच करणार. त्यात जे सोसावं लागेल ते सोसू, पण शेवटचा दलित शिल्लक असे-पर्यंत संघर्ष करीत राहू,' असा वरकर्णी तर्कशुद्ध, नैतिक व धैर्य-संपन्न पवित्रा काही नेत्यानी घेतला. त्यांच्यावरचा प्रा. शिरवाड-कराचा ( ज्याची मुलाखात अंकात स्वतंत्रपणे आलीच आहे. ) शेरा या सगळ्याच भूमिकामधली एकान्तिकता पुरेशी अधोरेखित करणारा होता. त्यानी एवढंच विचारलं की 'हे सगळं ठीक, पण हे कशाच्या आधारावर बोलताय् ? त्या शेवटच्या दलितापर्यंत सगळ्याना विचारलय का त्याची मरायची इच्छा आणि तयारी आहे का ते ? ज्याना विद्यापीठ म्हणजे काय तेही माहीत नसेल, अशानी तुमच्या संघर्षात काय मिळविण्यासाठी मरायचं ?'

प्रश्न मार्मिक आणि भेदक आहे, महत्त्वाचाही आहे पण नामांतर हाच जणू आताचा सामाजिक न्यायाचा आणि मानवी हक्काचा एकमेव आणि अंतिम प्रश्न आहे अशा भ्रमानं भान हरपलेले नेते अशा काही मूलगामी प्रश्नांची शांतपणे चिकित्सा करण्याचा मन.-स्थितीत आहेत, असं वाटत नाही. हा प्रश्न सामाजिक न्यायाचा किंवा मानवी हक्काचा कसा, पटवून द्या, असं म्हणणंही फोल ठरतं. बुद्धीला पटेल असं साधार विवेचन ऐकायला मिळत नाही. आज-वरच्या अन्याय–अत्याचाराच्या हकीकती मिळाल्या, तरी नामांतर हा या चरत जाणाऱ्या विषावरचा तोडगा कसा, हे कुणी सागू शकत नाही. वृत्तपत्रातून लाँग मार्चच्या आणि इतर नेत्यांची निवेदने वाचायला मिळतात, त्यांचा सूर मात्र चढा लागत चालला आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' ही तडजोड नाकारण्यात नामांतरविरोधकाना इतकाच अटीतटीचा पुढाकार नामांतरवादी मंडळी घेताना दिसतात, ह्यांचीही कवाडं नामांतर-विरोधकाइतकीच घट्ट बंद आहेत. हाराकिरीने हौतात्म्य लाभत असलं तरी एकंदर चळवळीचा फायदा फारसा होत नाही, क्वचित तोटाच होतो, हे त्यांना कळत नसेल का ? की कदाचित या प्रश्नावर प्रथमच एकत्र आलेल्या दलितामधल्या फळ्याना एकविचारानं चळवळीची उद्दिष्ट ठरवणं आणि एकाच समग्र 'पर्स्पेक्टिव्ह' मधून तिची वाटचाल आखणं शक्य होत नसावं ?' एक गाव एक पाणवठा सारख्या किचकट व दीर्घसूत्री पण भविष्याचा वेध घेणाऱ्या चळवळी-पेक्षा डॉ. आंबेडकराच्या नावाचा प्रश्न प्रतिष्ठेचा आणि भावनेचा करून रान उठवणं सोपं असेल, पण दूरदृष्टीचंही आहे का ?

नामांतराचा लढा हा अखेरीस दोन एकांतिक अस्मितामधला लढा आहे आणि त्यामुळेच तो दुर्दैवी आहे, असं मी प्रारंभापासूनच म्हणतो आहे, ते या प्रश्नाच्याच आधारावर.

## असमर्थ शासन

शासनाच्या या प्रश्नातल्या भूमिकेबद्दलही दलित–नामांतरवादी नेत्यांची भूमिका समजावून घेणं जड जातं. शासनाला कोंडीत पकडून यात खंबीर हस्तक्षेप करायला लावण्याइतपत तणाव उभा करण्याचा चतुर हिशेब काही आंदोलनधुरंधराच्या डोक्यात असणं स्वाभाविकच आहे, पण अशा हस्तक्षेपाबाबतची सर्वसामान्य कल्पना मात्र काहीशी भाबडी वाटते. मराठवाड्याच्या बहुसंख्याक जनतेच्या इच्छेविरुद्ध कितपत ठाम कारवाई कुठलंही शासन करू शकेल ? सरकार शरद पवारांचं असो की वसंतदादांचं, त्यांची पाळंमुळं याच बहुसंख्याकात रुजलेली असतात आणि त्याना सरसहा डावलणं म्हणजे आपण जिच्यावर बसलोय तीच फांदी कापायला जाण्यासारखं आहे. हा धोका सहजासहजी कुणी पत्करील असं मानणं निदान निवडणुकीच्या तोंडावर तरी, अवघड आहे त्यातही शरद पवारांच्या-इतकं डगमगतं विघटनसन्मुख सरकार कुठलीही एक बाजू घेऊन अथवा उभयमान्य माध्यममार्ग शोधण्याचा प्रयत्न करून प्रश्न कायमचा सोडवू शकेल असा विश्वास वाटायला मनुष्य भलताच आशावादी असायला हवा. आजवरचा या प्रकरणातला शासकीय 'परफॉर्मन्स' लक्षात घेतला तर प्रश्न सोडविण्यापेक्षा चिघळू देण्या-चाच कर्तेपणा त्याच्या खाती जमा आहे. दुसरीकडे, ऐन निवडणु-कीच्या मोक्यावर आंदोलन उभारणाऱ्याना, राजकीय पक्षांना ओलीस धरणं शक्य असलं, तरी निवडणुकाच्या निकालावर काही निश्चित परिणाम घडवून आणणं अवघड दिसतं. तसा उद्देश असलाच तर नामांतरविरोधकांनी याच प्रश्नावर निवणुका लढवायचं आव्हान या अगोदरच देऊन ठेवलं आहे.

अर्थात हा सगळा अगदी वरवरचा विचार झाला. मूळ प्रश्न असा आहे की नामांतर ही खरोखरीच एवढी मोठी समस्या होती का ?

किंबहुना ती सुटणं– न सुटणं, सुटल्यास एखाद्या विशिष्ट बाजूनं सुटणं हा आपल्या समाजापुढचा अग्रक्रमाचा प्रश्न होऊ शकतो का? जातियतेविरुद्धच्या लढयात सामाजिक व मानवी न्यायाच्या दृष्टिकोनातून एखादं पाऊल पुढे टाकलं गेलं, अशी या संघर्षाची नोंद इतिहासात होऊ शकेल का?

या संघर्षानं पुरोगामी चळवळीची निश्चित पीछेहाट होणार आहे, असं उत्तर मला दिसतं. नामांतर ही दलित समाजापुढची अग्रक्रमाची समस्या होती असं मानण्याजोगा काही पुरावा अद्याप पाहण्यात नाही. उलट खऱ्या समस्यांची आणि त्यांवर तोडगा शोधण्यासाठी करायच्या चळवळीची जागा, निव्वळ एकातिकतेतून मोठ्या झालेल्या या खोड्या, बांडगुळी चळवळीनं घेतली आहे असं दिसतं.

या खऱ्या समस्या चळवळी आर्थिक स्वरूपाच्या असायला हव्यात, असं मला वाटतं. आर्थिक ताकद उभी केल्याशिवाय दलित वर्गाला राजकीय-सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात स्थैर्य आणि नवी संधी लाभेल असं मानणं कठीण आहे. खेडोपाड्यातल्या दलिताला दुसऱ्याच्या (विशेष सवर्ण जातीयतावाद्यांच्या) मर्जीवर जगणं हे परंपरेच्या 'बलुत्या'मुळेच नव्हे, तर आर्थिक हलाखीमुळेही जोपर्यंत अपरिहार्य आहे, तोपर्यंत दलितमुदतीच्या चळवळी या काही पुढारलेल्या, जागृत, शिक्षित दलितांना सवर्णांविरुद्ध लढवून सुप्रतिष्ठित करण्यापुरत्या मर्यादित राहतील. व्यापक, आर्थिक पुनर्रचनेचा एक मार्ग म्हैसाळच्या स्वयंसमर्थ दलितांनी दाखवूनही दिला आहे. संघर्षाचा मार्ग चोखाळणारी मंडळी. असं आर्थिक पाठबळ उभं न करताच सामाजिक पुनर्निर्माण कसं साधणार, हे चित्र स्पष्ट होत नाही. किंबहुना यासंबंधी पद्धतशीर विचारच पुरेसा झाल्याचं दिसत नाही. महाराष्ट्राच्या एकंदर समाजवादी पुरोगामी चळवळीच्या प्रवर्तकांनी (अपवाद : आदिवासी क्षेत्रात एकांडेपणानं कार्यरत असलेल्या संघटना। व्यक्ती) चळवळीच्या पायाभूत बलस्थानाविषयी आणि ती सातत्याने प्रयत्न करून खंबीर व मार्गप्रवृत्त करण्याबाबत जी उदासीनता आजवर दाखवली आणि ज्यामुळे त्यांचं काम खुरटत जाऊन शहरी नेत्यांच्या प्रभावळीपुरतंच उरलं, ते ग्रहण सामाजिक अभिसरणाचं नवं आशास्थान असणाऱ्या दलित चळवळीलाही लागणार आहे का? तसं असेल तर अल्पसंख्य परंतु संघटित कामगारांच्या सौदेबाजीच्या क्षमतेवर तात्पुरते लाभ पदरात पाडून घेणारा आणि शक्तीच्या व समाजाच्या दूरगामी व सखोल प्रगतीकडे दुर्लक्ष करणारा ट्रेड युनियनिझम (ऊर्फ भारतीय साम्यवाद?) आणि दलित आंदोलनात काय फरक राहील?

आर्थिक तणावाची बीजं तर या सध्याच्या संघर्षातही नाहीत, असं नव्हे, पण ती विधायक उद्देशाकडे वाटचाल करणारी नाहीत, त्याची भूमिका जातीय तणावाला बळकटी आणणारी असली तरी चळवळीच्या प्रवर्तकांना–अनुयायांना काय, किंवा सरकारला काय, जी 'सोल्यूशन्स' अपेक्षित आहेत, ती आर्थिक स्वरूपाची नव्हेत. 'मराठवाडा विद्यापीठ का?' ही मागे उल्लेखिलेली पुस्तिका, या प्रश्नामागचे आर्थिक ताण स्पष्ट करते. मराठवाड्यातला मागासलेपणा त्यामुळे अधिकच उग्र झालेला बेकारीचा प्रश्न, आणि राखीव जागांच्या साहाय्याने दलितांना अत्यल्प व्यक्ती–गटांची होणारी थोडीफार आर्थिक उन्नती, याबद्दलची असूया गतवर्षीच्या दंगलीतल्या हिंसाचाराच्या रूपानं प्रकटली, ही पुराव्यासह सिद्ध झालेली गोष्ट आहे. फार काय, 'अस्मिता' (मग ती मराठवाड्याची असो की आंबेडकरवाद्यांची!) नावाची जी 'मिथ्' उभी करण्याचा प्रयत्न चालतो तोही, एकंदर आर्थिक दैन्यातून उद्भवणाऱ्या वर्गीय तणावाचाच एक आविष्कार आहे असं मला वाटतं. मुद्दा असा की, स्वत:ला फसविण्याचा प्रयत्न प्रत्येक मागास आणि अपयशाच्या भावनेनं घेतलेला समाज करीत असतो. खऱ्या व मूलभूत प्रश्नांना हात घालण्याची–सामोरे जाण्याची–धडका देण्याची ताकद हलाखीनं पिचलेल्या मनगटात कमी असते. अशा वेळी येणारी मरगळ आणि हताश दूर करण्यासाठी एखादे आत्मगौरवात्मक लेबल असलेलं टॉनिक गांजलेल्यांना पाजून उठवण्याची खटपट सर्वच समाजधुरीण करीत असतात. अस्मिता ही अशाच तऱ्हेची एक फसवणूक आहे असं मला वाटतं. दीर्घकालीन व्यावहारिक प्रगती मागासलेल्यांच्या पदरात टाकायची तर शासन आणि समाजघटक (नेते + अनुयायी) यांना विशिष्ट अर्थव्यवहाराची चौकट आणि विकासाचे अग्रक्रम ठरवून जी तपश्चर्या करावी लागेल, ती निवडणूक समझोत्यात सर्वस्व मानणाऱ्या व्यवस्थेला परवडण्यासारखीच नसते. तेव्हा अस्मिता आणि नामांतरसारख्या भट्टचा पेटवून (आणि त्यातल्या ठिणग्यांनी कंगालांच्या झोपड्या जळत असतील तर, दुर्लक्ष करून) आपल्यापुरती ऊब घेणं किंवा सरळ नामानिराळं होणं, बहुसंख्याक अप्रामाणिकांना सोयिस्कर असतं. एरवी, ज्या मराठवाडा विद्यापीठाची निव्वळ बजबजपुरी झालीय, हे (निरनिराळ्या कारणासाठी का असेना, पण) नामांतरवादी व नामांतरविरोधी असे दोन्ही पक्ष मान्य करतात, तेच विद्यापीठ मराठवाडा हा भूप्रदेश व डॉ. आंबेडकर-दलितसमाज या सर्वांचाच अस्मितेचं केंद्र व्हावं, असा धिक्षिप्त, विसंगत योगायोग का पहायला लागावा?

आपल्या कल्पनाशक्तीतही बसणं अवघड, इतक्या दुर्धर एकातिकतेनं घेरलेल्या मराठवाड्याचं चित्र हे मला असं दिसतं.

आणि आपल्या मोठ्या समाजघटकांना इतक्या महत्त्वाच्या वाटणाऱ्या समस्याशी आपण एकरूप तर होऊ शकत नाहीच, पण त्यांच्याशी स्वत:ला relevant सुद्धा करू शकत नाही, हा अनुभव विषाद वाटावा असाच होता. □

---


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# नामांतर व्हावे; पण पुढचा प्रवास अधिक महत्त्वाचा

राजा दीक्षित

विद्यापीठाच्या नामातराच्या निमित्ताने मराठवाड्यात पेटलेला संघर्ष हे आपल्या घाणेरड्या सामाजिक परिस्थितीचे एक दुर्दैवी फलित आहे, असे मी मानतो. नामातराच्या प्रश्नावर मराठवाडा दुभंगला आहे. नामातर हे आता फक्त निमित्त राहिलेले आहे आणि दोन गट एकमेकांविरुद्ध ठाम कडवेपणाने उभे राहिले आहेत. या दोन्ही बाजूच्या माणसाचे म्हणणे ऐकल्यावर मला असे जाणवले की, दोघाचे युक्तिवाद आता बरेचसे पूर्णत्वाला पोहोचले आहेत. आपलेच म्हणणे पूर्णपणे खरे आणि विरोधकाचे म्हणणे पूर्णपणे बाष्कळ अशी समजूत दोन्ही गटात पक्की झालेली आहे. आता त्याच्यात समझोता होणे नाही; त्याची मते बदलणे शक्य नाही, अशी चिंता वाटू लागली आहे. एकंदरीत ही स्टेलमेटच होऊ घातलीय ! पण तशी ती होऊ देता कामा नये. तेव्हा प्रश्न एवढाच आहे की, ही कोंडी फुटणार कशी ? आणि फोडणार कोण ?

दोन्ही बाजूचे तात्त्विक मुद्दे मुलाखतीमध्ये दिलेलेच आहे. सध्या जरा ते बाजूला ठेवून काही व्यावहारिक गोष्टीचा विचार करू. नामातराच्या मागणीसाठी निघालेले लॉंग मार्च ६ डिसेंबरला औरंगाबादला पोहोचणार आहेत. त्याना प्रत्युत्तर म्हणून विरोधक 'मराठवाडा बंद 'चा कार्यक्रम अमलात आणून प्रतिमोर्चा काढणार आहेत. सगळेच लोकशाहीवादी आणि शाततापूर्ण मार्गांवर विश्वास ठेवणारे म्हणवतात. पण खरोखरच शाततापूर्ण रीतीने हे सगळे होणार आहे का ? नक्कीच नाही ! दोन्ही बाजू इतक्या हट्टाला पेटल्या आहेत की, मराठवाड्यात विध्वंसक भडका उडाल्याशिवाय राहणार नाही. मागच्या वर्षी जे झाले तेच आता अधिक तीव्रतेने होण्याचा धोका आहे. मारामाऱ्या होणार, शिवीगाळ होणार, जाळ-पोळ होणार, दंगली होणार. या सगळ्यात अनेक निरपराध माणसाचे संसार उद्ध्वस्त होण्याचा धोका आहेच. थोडक्यात, विचाराच्या लढ्यापायी विकाराचा डोंब उसळणार (बाबा आढाव मात्र आपल्या 'साधना 'तल्या मुलाखतीत असा विश्वास व्यक्त करतात की, मराठ-वाड्यातील वातावरण नामातराला अनुकूल आहे आणि दंगली उसळणार नाहीत. स्वप्नाळूपणा म्हणतात तो हाच !) तर, हे सगळे अटळ आहे यात मला तरी काहीही संशय वाटत नाही. अर्थात यावर एकच उपाय दिसतो. तो म्हणजे सरकारने हे टाळण्यासाठी जागरूक राहणे. महाराष्ट्र सरकार याबाबतीत खंबीर उपाययोजना करेल असे वाटते. कदाचित असाही संभव आहे की सरकारी हस्तक्षेपामुळे दोन्ही बाजूची आदोलने सुरुवातीलाच थोपवली जातील. अनेकाना अटक होईल. शातताभंग करणाऱ्याना दंडुकेशाहीने गप्प केले जाईल. पोलिसपहाऱ्याखाली मराठवाड्यात स्मशानशातता राखली जाईल.

पण अशी बंदुकधारी किंवा लाठीधारी शांतता टिकाऊ स्वरूपाची असूच शकत नाही. तेव्हा, पेटलेला मराठवाडा शांत करायचा असेल तर या प्रश्नाचा योग्य तऱ्हेने निकाल लागणे आवश्यक आहे. निकाल सरकारने लादला तर कोणत्या तरी बाजूने असतोष खदखदतच राहणार. मुळात राजकारण्यानीच हे प्रकरण नासवले आणि नासवत राहणारही आहेत ! दुसरे असे की, लोकसभेच्या निवडणुकापूर्वी सरकार या बाबतीत ठाम निर्णय घेणार नाही, हे उघडच आहे. राजकीय पक्षही याबाबतीत 'आळीमिळी 'च राखतील. मग हा प्रश्न सोडवायचा कोणी ? माझ्या दृष्टीने जे आदोलनासाठी अस्तन्या वर सारून उभे आहेत त्या लोकांनीच. हे अवघड आहे खरे. पण सामं-जस्य, विवेक या गोष्टी दाखवल्या तर ते सोपे व्हायला मदत होणार आहे या बाबतीत विशेषतः नामातर-विरोधकाची जबाबदारी जास्त वाढते. त्यांनी जर मनाचा मोठेपणा दाखवून आपली दुराग्रही भूमिका बदलली तर हा प्रश्न चुटकीसरशी सुटेल. यावर नामातरविरोधी म्हणतील की, आमची भूमिका दुराग्रही कशी ? आणि मोठेपणा आम्हीच का दाखवायचा ? आधी या दोन्ही प्रश्नांची उत्तरे देणे मला आवश्यक वाटते.

नामातराला विरोध केला जातो तो मुख्यत. मराठवाड्याच्या अस्मितेच्या मुद्द्यावर. हे लोक एक प्रमुख प्रश्न वारंवार विचारतात. तो म्हणजे, 'इतकी वर्षे कायम असलेले 'मराठवाडा विद्यापीठ ' हे नाव आता बदलायचे कशासाठी ?' – या प्रश्नातही अस्मितेचाच गर्भित सूर असतो. हे अस्मिता-प्रकरण एकदा तपासायलाच हवे.

आपण काही भंपक कल्पना उराशी बाळगून त्याच्यावर नको इतके प्रेम करत असतो. 'प्रादेशिक अस्मिता ' ही अशीच एक भपक कल्पना. भारताला झालेला हा एक सामाजिक रोग आहे असे मला वाटते. ज्या शहरात किंवा विभागात आपण राहतो, त्याबद्दल थोडे-फार प्रेम वाटणे हे स्वाभाविक आहे. पण प्रेम किती करायचे याचा विवेक बरेच वेळा सुटलेला दिसतो. माणसाच्या निष्ठा विविध प्रकारच्या असू शकतात हे मला मान्य आहे. पण या निष्ठांमध्ये आपण काही प्रतवारी लावणार की नाही ? कोणत्या निष्ठेला केव्हा आणि किती महत्त्व द्यायचे हे ठरवणार की नाही ? प्रादेशिक अस्मि-तेचे भलतेच खूळ माजवले जाते आणि ते आपल्या राष्ट्रीय भावनेला आणि प्रगतीला मारक ठरते. मराठवाड्यात अस्मितेचे इतके स्तोम माजले आहे की, जणू काही तो एक स्वतंत्र सार्वभौम देशच वाटावा ! 'पुण्या–मुंबईच्या सुधारकानी आमच्या प्रश्नात दखल देऊ नये ' असे म्हणणे हे अपरिपक्वतेचे लक्षण आहे, सुधारकांना जात आणि प्रदेश याची कुंपणे नसतात ! किंबहुना अशा कुंपणांविरुद्धच त्याचा लढा

असतो, हे या लोकाना कसे समजावे ? 'आमच्यावर आक्रमण होत आहे' हे असेच एक भोगळ विधान. तुम्ही कोण रे बावा ? आणि आक्रमण म्हणजे तरी काय ? तर एकूण असा आनदीआनंद आहे ! बरं, तरीही हे मान्य करू की, 'मराठवाडा' ह्या शब्दावरच्या ह्याच्या प्रेमाचा आदर राखायला हवा. तसे केले की हा प्रश्न सुटेल पण हेही होत नाही ! कारण नामातरवाद्यानी सुचवलेल्या नावात 'मराठवाडा' हा शब्द आवर्जून कायम ठेवलाय. ज्या थोडचा लोकानी प्रथम या शब्दाला विरोध केला त्यानीही आज आपला आग्रह मागे घेतला आहे. तेव्हा अपेक्षित नामातरात मराठवाडयाच्या अस्मितेचा आदर राखला जातो आहे. ही खरं म्हणजे सन्माननीय तडजोड आहे.

*मग प्रश्न उरतो कुठे ? जर आपण तपासू लागलो तर आपण* दुसऱ्या एका सामाजिक रोगापाशी येऊन पोहोचतो. तो म्हणजे जातीयता. नामातर हे निमित्त होऊन या लढयाला जातीय वळण लागले आहे, हे स्पष्टपणे जाणवते आपला समाज अजून बऱ्याच बाबतीत मध्ययुगीन आहे. खेडयापाडयात तर सरजामी चौकट घट्ट आहे. डॉ. आबेडकरानी हिंदू समाजाला जिने नसलेल्या मनोऱ्याची उपमा दिली होती आजही ती बऱ्याच प्रमाणात खरी ठरते ! खालच्या जातीतल्या. माणसाला वर येऊ द्यायचे नाही ही वृत्ती आजही कायम आहे. दलित लोक शिकू लागले, त्याना नोकऱ्या मिळू लागल्या, राखीव जागांमुळे कधीकधी आम्हाला डावलून त्या मिळू लागल्या, स्वाभिमानी बनून हे लोक आमच्या गुलामीत राहीनासे झाले, ह्याची एक मळमळ नाही म्हटलं तरी सवर्णाच्या मनात आहेच. ही मळमळ नामातरविरोधाच्या रूपाने बाहेर पडतीय. नामातराच्या निमित्ताने दलिताना झोडपलं जातय. याच अंकात अकोल्याच्या दलिताची कहाणी दिलीय. त्या एका उदाहरणावरूनही ह्या जातीय भावनेतली भयानकता स्पष्ट होते. मला एक प्रश्न पडतो तो असा की, जर आबेडकराच्या नावाऐवजी शिवाजीमहाराज किंवा महात्मा-गाधी याचे नाव विद्यापीठाला द्यायचा प्रश्न निघाला असता तर आज होतोय तेवढा विरोध झाला असता का ? नक्कीच नाही ! आम्ही एवढं शिकायचं आणि आबेडकराचा फोटो असलेली सर्टि-फिकेटस् मिळवायची म्हणजे काय ? हा प्रश्न अनेकाना सतावतोय. हे बौद्ध विद्यापीठ तर बनणार नाही ना अशी भीतीही लोकाना वाटतीय. वास्तविक तसे घडू शकणार नाही, कारण नाव बदलले तरी माणसे तीच राहणार आहेत ना ? पण ही खोटी भीती लोकाना सतावतीय एवढं मात्र खरं ! येथेही एक गमत बघण्यासारखी आहे. बौद्ध विद्यापीठ ही नुसती कल्पनाही आमच्या अगावर शहारे आणते. पण जर बौद्ध विद्यापीठ ही एक मूर्ख कल्पना असेल तर बनारस हिंदू विद्यापीठ आणि अलिगढ मुस्लिम विद्यापीठ ही तितकीच मूर्ख वास्तवता नव्हे काय ? ती आम्ही का स्वीकारतो ? शिक्षण धर्माच्या दावणीला बाधणे मुळातच चुकीचे आहे. मग तो धर्म कोणता का असेना.

नामांतर विरोधकांच्या काही मुद्यामध्ये तथ्य जरूर आहे. नामातर-वाद्यानी काही बाबतीत अतिरेक जरूर केलाय. पण यामुळे प्रश्न टागता ठेवून मराठवाडा जळता ठेवायचा का हा प्रश्न आहे. नामातर विरोधकापैकी बऱ्याचजणाचा (विशेषत. युवक नेत्याचा) आधी नामातराला विरोध नव्हता. पण म्हणे दलित पँथर किंवा इतर काही जणाच्या अतिरेकामुळे त्यानी भूमिका बदलली. 'भूमिका' या शब्दात एवढा कच्चेपणा असावा का ? दुसरे कसे वागतात यावर आपली तात्त्विक बैठक बदलणे कितपत योग्य आहे ? दुसऱ्याच्या आचाराच्या तालावर आपले विचार नाचणार असतील तर ही मोठी गंमतच आहे म्हणायची ! नामांतर विरोधकांना हे पटावे की, आबेडकर ही काही अशी व्यक्ती नव्हती की विद्यापीठाला तिचे नाव देण्यात लाज वाटावी. ज्या समाजाने हजारो वर्षे खूप काही भोगले त्याच्यासाठी आपले काही किरकोळ आग्रह मागे घेण्याचा मोठेपणा दाखवायला काय हरकत आहे ? बरं, तुम्ही त्याना असं काय फार देताय ? आपणा सर्वांच्याच असणाऱ्या त्याच्या एका *महापुरुषाचे नाव एका संस्थेला देण्यात असा मोठा त्याग तो काय* आहे ? पण साधी त्यालाही तयारी नसणं ह्याला दुराग्रह म्हणायचं नाहीतर काय ? आपल्या काही किरकोळ आग्रहापोटी ज्या प्रदेशाची अस्मिता आपण बाळगतोय त्या प्रदेशाचे केवढे नुकसान आपण करतोय ह्याचा विचार करायला नको का ? त्या प्रदेशातील समाजाच्या प्रतिष्ठेला धक्का आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान हे शेवटी कोणाचे नुकसान आहे ? चारसहा दलितानी शिवीगाळ केली याची शिक्षा असंख्य निरपराध दलिताना का ? आणि जे शिवीगाळ करतात त्याचा राग थोडातरी समजावून घ्या. अहो साधी दुसऱ्याने एक शिवी दिली तर आपण, त्यावर दुसरी शिवी देतो ! मग बायकाची अब्रू लुटली आणि माणसं जिती जाळली म्हणून पँथरच्या पोराचं तरुण रक्त उसळलं तर ते अगदी अस्वा-भाविक म्हणायचं का ? त्यांच्या अतिरेकी वागण्यावर तुम्ही जरूर टीका करा, पण उठसूठ सगळया दलितांना झोडपलं जातंय ह्यात आनद मानू नका किंवा तटस्थपणे ते पाहूही नका. मराठवाडा ही संतभूमी आहे असे मोठया अभिमानाने सागितले जाते. रेडयाला मारले असता ज्ञानेश्वराच्या पाठीवर वळ उमटले ही दंतकथा मोठया भाविकतेने ऐकली आणि ऐकवली जाते. मग मराठवाडयात माणसा-सारखी माणसं बेघर होतात, त्याना मारहाण होते, काहीचा जीव घेतला जातो, ह्या साऱ्याचे वळ संतभूमीच्या सुपुत्राच्या मनावर का उमटू नयेत ? माणुसकी दाखवून, थोडा मोठेपणा दाखवून आपल्या दुराग्रहाना जरा मुरड घालण्यानेच सतभूमीशी खरे इमान राखले जाईल. बहुसंख्याकानी अल्पसंख्यांकासाठी हे एवढे करावे आणि 'डॉ. आबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नाव देण्यात आपण होऊन पुढाकार घ्यावा असे मला वाटते. अर्थात हे सहजासहजी होणे कठीणच दिसते ! तेव्हा ह्या बाबतीत समाजातल्या काही आदरणीय व्यक्ती लोकाची मनं वळवू शकतील. राजकीय नेते असूनही सर्वांना आदरणीय असणारे एसेम जोशी, एक विवेकशील विचारवंत आणि मराठी साहित्य समेलनाचे नवे अध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार, *सारा महाराष्ट्र ज्याना मानतो* ते पु. ल. देशपाडे आणि प्रा. बापूसाहेब काळदाते, श्री. अनंतराव भालेराव यांसारखे मराठवाडयातले लोक, अशा व्यक्तीनी याबाबतीत पुढाकार घेऊन प्रश्न सामंजस्याने मिटविण्याचा प्रयत्न करावा. पेटवणे सोपे, पटवणे अवघड असते. दंगलीत पडलेली घरे बाधणे सोपे असते, पण दुभंगलेली मने साधणे कठीण असते. मराठ-

वाड्यातील जनतेची मने साधायला हवीत, आमच्या विचारवंताना आणि समाजसुधारकाना हे एक मोठं आव्हानच आहे.

तेव्हा मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर व्हावे असे माझे स्पष्ट मत आहे. अर्थात माणुसकीच्या भावनेतून आणि एक व्यावहारिक तडजोड म्हणून मी ते माडलेले आहे. पण याचा अर्थ असा नाही की, मी नामातरवाद्यांचा पक्षपाती आहे आणि त्यांच्या सर्वच गोष्टी मला मान्य आहेत. नामातरातून काय साधणार आणि नामातरानंतर काय याची चर्चा म्हणूनच मला आवश्यक वाटते.

नामातराने प्रचंड असे काही साधणार आहे या भ्रमात मी तरी नाही. दलितांना नामांतराने थोडासा दिलासा मिळेल, त्यांच्या एका महापुरुषाचे महत्त्वाचे स्मारक होईल व तो त्याना स्फूर्ती देत राहील. पण यापलीकडे काय साधणार हे मात्र त्यांच्यावरच अवलंबून राहील. या आदोलनाच्या निमित्ताने दलितामधले ऐक्य वाढले असेल तर ते टिकायलाही हवे, दलित चळवळीने काही एक निश्चित दिशा घ्यायला हवी, ती घेताना प्रथम आत्मपरीक्षण करायला हवे. नाहीतर नामांतर नावापुरतेच राहील ! आंबेडकराचे नाव एकदाचे विद्यापीठाला मिळाले की पुन्हा चळवळ थंडावण्याची भीती नाकारता येत नाही. हा लढा मानवी हक्कांचा आहे, माणुसकीचा आहे, असे सांगितले जाते. जर तसे असेल तर सवर्णांविरुद्ध लढणाऱ्या दलितानी आपल्यातल्या जातीयतेविरुद्ध आणि दाभिकतेविरुद्धही लढायला हवे. आंबेडकरानी वर्णन केलेला बिनजिन्याचा मनोरा दलित समाजातही उभा आहे महार चांभाराला किंवा मांगाला कमी लेखणार असेल, तर त्याने मराठ्याला किंवा ब्राह्मणाला शिव्या देणे हे विसंगत ठरते ! जातीयता, फूट, व्यक्तिपूजा ह्या सामाजिक रोगांपासून दलित समाज मुक्त आहे असे मानण्याचे कारण नाही. दलित साहित्यिक स्वत:ला क्रातीचे दूत म्हणवत असतील तर त्यांनी प्रथम आपली दांभिकता आणि मध्यमवर्गीय संतुष्टता झटकली पाहिजे. आत्मप्रतिष्ठेसाठी आणि न्यायासाठी लढताना दलित चळवळीने दारिद्र्याविरुद्धही लढणे आवश्यक आहे. लढा नुसता भावनात्मक असून भागणार नाही. भाकरीचेही महत्त्व नाकारून चालणार नाही. म्हैसाळला मधुकरराव देवल यांनी आर्थिक उन्नतीलाही महत्त्व देऊन ज्या सर्जनशील रीतीने तिथल्या दलितांसाठी काम केले, त्यातून खूप काही शिकण्यासारखे आहे दलित चळवळ भक्कम पायावर उभी राहायची असेल आणि समाजातल्या इतरही घटकांबरोबर घेऊन तिला पुढे जायचे असेल तर तिने साधनाचाही थोडा विचार करायला हवा. उर्वरित समाजाला विनाकारणच भडकवणारी अशिष्टच भाषा, स्वतंत्र दलितस्थानाची भडक मागणी, थुका-मुता मोर्चासारखे बीभत्स प्रकार, विरोधी बोलणाऱ्याला दमदाटी या गोष्टी काही समर्थनीय नव्हेत. त्यातून दलित चळवळीचाच तोटा होईल, हे ओळखायला हवे. वास्तविक पाहता हा सगळा स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकतो; पण येथेच या गोष्टी नोंदवणे आवश्यक वाटले म्हणून विस्तार न करता त्याचा निदान निर्देश केला आहे.

शेवटी आणखी एक प्रश्न उपस्थित करावासा वाटतो. आपली समाजव्यवस्था अजूनही खूपच मध्ययुगीन अवस्थेत आहे. नामातर प्रकरण हे तिचेच दुर्दैवी फलित आहे. अशी अनेक फलिते आपण नेहमी सोसतो. आपण हे सोसणे आता किती दिवस चालू ठेवणार ? दलित आणि दलितेतर ह्या सर्वांनीच ह्या समाज व्यवस्थेला सुरुंग लावायला हवा. प्रांतिक अस्मिता, धर्मांधता, जातीयता, अवास्तव व्यक्तिमहात्म्य, नीतिभ्रष्टता, अंधश्रद्धा, अव्यवहार्य भंपक चालीरीती हे सगळे सपवायला हवे. आधी राजकारण का आधी समाजकारण हा आपल्याकडचा सनातन वाद आहे. राजकारण आपण फार केले, आणि समाजकारण दूरच राहिले ! डॉ. आंबेडकरानी या संदर्भात सुरेख भाष्य केले होते. त्यांच्या मते इथल्या लोकाना 'राजकीय बाबतीत घोड्यांच्या शक्तीप्रमाणे धावायला पाहिजे आणि सामाजिक व धार्मिक प्रश्न निघाला की, गोगलगाईपेक्षा सावकाश !' आमच्या राजकारणाचा घोडा खूपच धावला नाही, तर उधळला आणि भरकटू लागला. जयप्रकाशावर 'सारा बाग उजड गया' असं म्हणायची वेळ आली ! यातून आम्ही काही शिकणार की नाही ? राजकारणाच्या बेफाम घोड्याला लगाम घालणार की नाही ? लोकशाही राज्यपद्धती स्वीकारली, पण जीवनपद्धतीचे काय ? जयप्रकाशाची 'संपूर्ण क्राती' हे स्वप्नच राहणार का ? अजूनही आमचे राजकारण गोगलगाईच्या गतीनेच पुढे सरकणार का ? □


## मान्यता पावलेला चरित्रग्रंथ

# टॉलस्टॉय – एक माणूस

दुसरी आवृत्ती

लेखिका : सुमती देवस्थळे

मूल्य : पंचावन्न रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०